मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

कै. गणेश नारायण परांजपे




वर्ष २५ अंक ३

जुलै १९७०

' उद्यान ' मासिक आणि प्रेस, बलवंत संगीत मंडळी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, श्रीसरस्वती मंडळ इत्यादि संस्थांचे आश्रयदाते आणि निर्माते रसिकश्रेष्ठ कै. तात्यासाहेब परांजपे यांच्या स्मृतीला अभिवादन.

अनुक्रमणिका

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचे हस्ताक्षर



'वधूपरीक्षा' नाटकाचे हस्तलिखित आणि प्रयोग यासंबंधी कै. कोल्हटकर यांनी श्री. पु. रा. लेले यांना लिहिलेल्या पत्राचा हा ठसा आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] जुलै १९७० [अंक ३

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर-१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

११४ बौद्ध धर्माची वैदिक पार्श्वभूमी : आरण्यक आणि औपनिषदिक विचार (पूर्वार्ध)
डॉ. सर भवानीशंकर नियोगी

१२३ बौद्धांच्या प्रेम-गाथा : स्वतंत्र व भाषांतरित
प्रा. भवानीशंकर पंडित

१३२ एलकुंचवारांच्या एकांकिका
सदाशिव त्र्यंबक कुल्ली

१३५ गणेशपुराण : अध्याय १ व २
संपादक : डॉ. अ. ना. देशपांडे

१४३ रसिकश्रेष्ठ श्री. तात्यासाहेब परांजपे
शं. बा. शास्त्री

१४९ ग्रंथसमीक्षण
प्रा. भवानीशंकर पंडित

१५१ पुस्तक परिचय
चंद्रकांत कुळकर्णी

१५३ देवा !—
विदेही, अमरावती

१५९ पाय-वाट
प्रभाकर पुराणिक

१६२ कै. तात्यासाहेब कोल्हटकरांच्या आठवणी
डॉ. वि. भि. कोलते

१६५ संपादकीय
संघवार्ता

बौद्धधर्माची वैदिक पार्श्वभूमी

आरण्यक आणि औपनिषदिक विचार

तत्त्वचिंतकांचे युग (पूर्वार्ध)

—डॉ. सर भवानीशंकर नियोगी

यज्ञसंस्था शोधून काढणारा वेदांतील जो भाग आहे, त्यासंबंधीचा ऊहापोह मी आतापर्यंत केला. "वेदप्रतिपादितो यागादिरेव धर्म:" अशी ह्या मताची व्याख्या नंतरच्या काळात करण्यात आली. ह्या मताला उतरती कळा लागली ह्याची कारणे दोन. एक कृषि-प्रधान अर्थव्यवस्था वाढीला लागली, हे. दुसरे कारण, समाजातील सुबुद्ध वर्गाला पशुहत्येसंबंधी किळस वाटे, हे. रंतिदेवाच्या नावावर ज्याचा उल्लेख केला जातो अशाच एखाद्या यज्ञ–यागामुळे हा तिटकारा निर्माण झाला असावा. हा रंतिदेव अतिशय पवित्राचरणी आणि उदारवृत्तीचा होता असे म्हणतात. शूद्रांचा आणि चांडालांचाही समावेश असलेल्या आपल्या असंख्य अतिथींना भोजन देऊन तृप्त करण्यासाठी त्याने दोन लक्ष स्वयंपाकी पदरी बाळगले होते. चर्मण्वती नदीच्या काठी दशपूर येथे त्याची राजधानी होती असे मेघ-दूतात म्हटले आहे. बळी दिलेल्या पशूंची रक्ताळलेली कातडी त्या नदीत फेकून दिली जात. त्यामुळे तिचे पाणी रक्ताने लाल झालेले दिसे. म्हणूनच त्या नदीला 'चर्मण्वती' असे नाव दिले होते. आता त्या नदीला चंबळ असे म्हणतात.

हा पशुबलीचा प्रकार कितीही किळसवाणा असला तरी, तो वैदिक अथवा आर्य सभ्यतेचा आणि संस्कृतीचा पाया बनला हे नाकारता येत नाही. प्रारंभीच्या वैदिक काळात, ज्या ठिकाणी यज्ञ केले गेले, त्या ठिकाणी गाव–खेडी आणि नगरे वसविली गेली. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तीन वरिष्ठ वर्गातील लोकांची गोत्रे आणि प्रवर ह्या यज्ञ–धर्माने निश्चित केली. शेती करणे आणि निरनिराळ्या जातीच्या पशूंना माणसाळविणे अशासारख्या उद्योगांना त्या धर्माने चालना दिली. शिल्पशास्त्र त्यामुळेच पुढे आले. नृत्य आणि वाद्य–संगीताचा अंतर्भाव असलेल्या संगीतकलेची त्यामुळेच अभिवृद्धी झाली. अनार्यांना आर्यांच्या समाजाने आपल्यात समाविष्ट करून घेतले होते हे 'निषाद सभापति यजत' अशासारख्या वचना-वरून स्पष्ट होते. विश्वामित्राने शंभर जमातींना आपली मुले म्हणून मानले होते असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे. यज्ञविधीतील निरनिराळ्या कर्मकांडावर आणि ब्रह्मवाद्यांनी रचलेल्या मंत्रांवर चर्चा होत असे आणि प्राचीन काळच्या कल्पितांचे आणि कथांचे निरू-पणही चालत असे. पुत्रप्राप्तीसाठी, युद्धात किंवा नातलगांमधे संपत्तीवरून निर्माण झालेल्या भांडणात यश मिळवण्यासाठी, समाजात मान–मान्यता मिळण्या-साठी, राक्षस व इतर शत्रूंचा नाश होण्यासाठी, अन्न-धान्य व इतर सुख–साधनांच्या समृद्धीसाठी वगैरे निरनिराळ्या क्रियाकर्मांचे आयोजन करण्यात आले होते. ह्या युगाचे वैशिष्ट्य थोडक्यात नमूद करायचे तर ह्या काळात तीन ह्या संख्येला फार महत्त्व प्राप्त झाले होते असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, ऋग्, यजु: आणि साम अशी वेद–त्रयी. ह्या तीन्ही वेदांत पारंगत ते त्रैवेद्य. गार्हस्पत्य, दाक्षिणात्य आणि आहव-नीय असे तीन अग्नि, पितृ–ऋण, ऋषि–ऋण आणि देव–ऋण अशी तीन ऋणे; धर्म, अर्थ आणि काम अशी जीवनाची तीन ध्येये म्हणजे पुरुषार्थ; ह्या तीनही विषयांसाठी तीन शास्त्रे,–धर्मशास्त्र, अर्थ-

शास्त्र आणि कामशास्त्र – निर्माण झाली. त्यानंतर, पुरोहितांचा एक, युद्ध करणाऱ्यांचा दुसरा आणि व्यापार–उद्योगाला वाहिलेला तिसरा, असे समाजाचे तीन प्रमुख वर्ग, – म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य. सर आर्नाल्ड टोयनबीच्या (Sir Arnold Toynbee) पुढील विधानावरून ह्या तीन वर्गांचे महत्त्व लक्षात येईल. तो म्हणतो, "The peoples of Africa and Asia will remind him (the Western Inquirer) that the Western Missionaries, Traders and Soldiers from across the seas have been pushing into their country."

पुढे आपण जीवनासंबंधीच्या वैदिक दृष्टिकोणापासून वेदांतिक दृष्टिकोणाकडे वळतो. ऑगस्ट कॉम्ट आणि आल्बर्ट स्वाइत्झर यांच्या म्हणण्याप्रमाणे आपण धर्मशास्त्रापासून, म्हणजे संसार आणि जीवन यांना स्वीकारणाऱ्या शुद्ध प्रवृत्तिमार्गाच्या विचारापासून अतींद्रियस्वरूपी म्हणजे संसाराचे आणि जीवनाचे अस्तित्व नाकारणाऱ्या शुद्ध अशा निवृत्तिमार्गाच्या विचाराकडे वळतो. वेदांताचे फार मोठे आणि महत्त्वाचे वैशिष्टय असे की त्याने जीवनाचे ध्येय म्हणून 'मोक्ष' किंवा 'अमृतत्त्व' हा चवथा पुरुषार्थ मनुष्याला दिला हे एक; आणि आजवर दुर्लक्षिल्या गेलेल्या, तिरस्कृत अशा शूद्र वर्गाला त्याने सन्मानाचे स्थान दिले.

Comparative Religion (तौलनिक धर्म) च्या कल्पनेचे स्पष्टीकरण करणाऱ्या विद्वानांनी म्हटल्याप्रमाणे, उपनिषदकालीन मुनींच्या स्वतंत्र विचारपद्धतीतूनच बुद्धाचा धर्म उत्क्रांत झाला. ए. सी. बॉकेटने म्हटले आहे, – Goutam began with the Upanishidic background, but that he altered the scheme of it in certain important respects

सुझुकीचे म्हणणे आहे की, 'बुद्धधर्माची उभारणी प्राचीन हिन्दु धर्मावरच केली गेली आहे. त्यातूनच हा धर्म उत्क्रान्त झाला. वेद, ब्राह्मणग्रंथ आणि उपनिषदे हा ह्या बुद्धधर्माचा पाया आहे. बुद्धधर्म हा अ–ब्राह्मण पक्षाचा आहे, पण तरीही, ब्राह्मणत्वात जे जे उत्कृष्ट विचार आहेत त्या सर्वांचा समावेश त्यात आहे.' मॅक्स मुल्लर म्हणतो, 'अतींद्रिय ज्ञानक्षेत्रातली काही नवीन तथ्ये हुडकून काढणारा अशी काही बुद्धाची थोरवी नाही, तर उपनिषदांच्या नैतिक बाजूवर त्याने विशेष भर दिला, हेच त्याचे खरे मोठेपण आहे. ही गोष्ट त्याने, शुष्क अशा बाह्य आचारांनी आणि गुंतागुंतीच्या आणि अवघड अशा कर्मकांडाने जेव्हा हिंदु धर्मातील प्राणच शोषून घेतला होता अशा काळात केली, हे विशेष. Creed of Buddha ह्या ग्रंथाचा प्रख्यात लेखक एडमंड होम्स् म्हणतो, 'उपनिषदांचे अतींद्रिय ज्ञान जेव्हा आत्म–प्राप्तीच्या नैतिक रूपात पुढे आले त्यावेळी त्याने मनुष्याच्या आध्यात्मिक गरजेची पूर्ती केली. तशी पूर्ती ते आजही करीतच आहे. उपनिषदांच्या आशयाशी इमान राखणाऱ्या बुद्धाने पंचवीसशे वर्षापूर्वी आपला आध्यात्मिक उत्क्रांतीचा संदेश दिला. आजही जग, त्याच तत्त्वज्ञानाच्या आशयाला अनुसरून त्याच संदेशाच्या प्रकटीकरणाची वाट पाहात आहे.' (१) I and my Father are one; व (२) Be perfect even as your Father who is in Heaven is perfect. ह्या येशू ख्रिस्ताच्या दोन मूलभूत वचनांचा हवाला देऊन तो पुढे म्हणतो, 'ह्यातले पहिले वचन उपनिषदांच्या आध्यात्मिक आदर्शाशी समानार्थी असे आहे, आणि दुसरे वचन बुद्धाच्या नैतिक ध्येयवादाचीच री ओढणारे आहे.' डॉ. राधाकृष्णन् म्हणतात 'बुद्धाच्या नैतिक अनुशासनाची न्याय्यता सिद्ध करू शकेल असे अतींद्रिय शास्त्र एकच, ते म्हणजे उपनिषदांच्या मुळाशी असलेले अतींद्रिय ज्ञान.. तोपर्यंत काही मोजक्या व निवडक अशा विचारवंतांपर्यंतच मर्यादित असलेले जे उपनिषदांचे तत्त्वज्ञान, ते बहुतांपर्यंत पोचविण्याच्या आणि ते त्यांच्या पचनी पडण्याच्या कार्यात बुद्धाने मदत केली. हे करताना, सर्वसाधारण जनसमुदायाला ज्यांचे आकलन होणे दुष्कर अशी गूढ तत्त्वज्ञानविषयक सत्ये दुर्लक्षिणे आवश्यकच होते. उपनिषदांचा ध्येयवाद स्वीकारायचा आणि आपल्या दैनंदिन स्वरूपाच्या गरजा भागविण्यासाठी तो मानवमात्राला उपलब्ध करून द्यायचा हे एवढेच बुद्धाचे अंगीकृत कार्य होते. ऐतिहासिक भूमिकेवरून बुद्धधर्माकडे पाहिले तर, आमजनतेत उपनिषदांच्या तत्त्वांना प्रचार करणे असेच म्हणावे लागते अशा रीतीने आजतागायत जिवंत असलेली परंपरा निर्माण करण्यास त्याने मदत केली.'

बुद्ध धर्माविषयी संबंधात डॉ सर हरीसिंग गौर यांची स्वत:विषयी कशी दृष्टी होती ते आता आपण पाहू.

ते म्हणतात, 'आपल्या धार्मिक श्रद्धांच्या आणि आचारादिकांच्या बाबतीत साधारणपणे हिंदू माणसाचा कल आपल्या मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणे वागण्याचा असतो ....बुद्धिझम, जैनिझम, सिखिझम, ब्राह्मणिझम् किंवा आर्य समाजासारख्या संबंधितच पण उघड उघड विरोधी असणाऱ्या अनेक पंथांत जरी तो गेला तरी त्याचे हिंदुत्व काही नष्ट होत नाही. कारण असे की, ह्या सर्व मतांची अथवा पंथांची सत्ता किंवा त्यांचे अस्तित्व एक तर हिंदू धर्मशास्त्रे किंवा हिंदु तत्त्वज्ञान ह्यापासूनच आलेले आहे. तसे पाहिले तर हिंदू धर्म आणि हिंदू दर्शन ह्या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत असे कधी मानलेच गेले नाही. 'धर्म' म्हणजे कर्तव्य. या एकाच नावाने त्या दोहोंचा उल्लेख केला जातो. विवेचनात्मक ज्ञान आणि विहित कर्म या उभयतांचा त्यात अंतर्भाव आहे. एकंदरीने, वैदिक साहित्य अधिक विशुद्ध धर्मश्रद्धा निर्दिष्ट करते यात शंका नाही........प्रथमावस्थेत त्यात आपल्याला काहीसा विलक्षण असा द्विधा भाव दिसतो. एक भाग दिसतो तो व्यक्तिगत अनुभूतीतून उत्पन्न झालेला बुद्धिप्रामाण्यवाद, आणि दुसरा, बहुजनासाठी असलेला कर्मकांडाचा भाग, आणि त्या दोहोंची सांगड आपल्याला दिसून येते. त्यानंतर नास्तिकवाद आला, आणि त्याचे सर्वोत्कृष्ट रूप आपल्या बुद्धधर्माच्या रूपाने पुढे आलेले आढळते. या मतात समाज–नीतीचे अधिष्ठान धर्मापेक्षा रूढी आणि नियम हेच अधिक होते.'

उपनिषदांत जी अनेक एकमेकाशी न जुळणारी अनुमाने बांधून तर्क काढलेले आहेत त्यांचा आपण विचार करू या. 'उपनिषद' शब्दाचा अर्थ आहे श्रवण करण्यासाठी जवळ बसणे.' ह्याचा अर्थ, कोणत्या तरी गुह्यज्ञानाची शिकवण असा झाला. 'उपनिषद' शब्दाच्या अर्थाची फोड करताना शंकराचार्यांनी 'रहस्य' शब्द वापरलाहे. हे रहस्य–ज्ञान फक्त पुत्राला किंवा शिष्यालाच द्यायचे असे होते. ते गुह्य ज्ञान ब्रह्मचने प्रथम प्रजापतीच्या स्वाधीन केले. प्रजापतीने ते मनूच्या हवाली केले आणि मनूने आपल्या वंशजांना. आपला ज्येष्ठ पुत्र जो उद्दालक अरुणी त्याला त्याच्या पित्याने सांगितले. कोणाही मनुष्याने हे गुह्य ज्ञान आपल्या ज्येष्ठ पुत्राव्यतिरिक्त अथवा योग्य शिष्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही सांगू नये. कोणी समुद्रवलयांकित आणि संपत्तीने भरलेली ही पृथ्वी जरी मोबदल्यात देऊ केली तरी मनुष्याने त्याला सांगावे, 'हे ज्ञान त्या पृथ्वीपेक्षाही अधिक मोलाचे आहे, हे त्या पृथ्वीपेक्षाही अधिक मोलाचे आहे (छांदोग्योपनिषद, III ११–४–५) ज्याला परब्रह्माची ओळख पटली तो स्वतःच ब्रह्म झाला म्हणून समजावे. ज्याने आपले मुंडन करून मुंडक व्रत घेतले असेल त्यालाच हे ज्ञान सांगावे (मुंडकोपनिषद III–२–१०). वेदांताचे हे श्रेष्ठातिश्रेष्ठ गुह्य आहे. जो सवचित्त झालेला नाही त्याला हे ज्ञान देऊ नये (श्वेताश्वतर उप. VI २२–२३). जो आपल्या गुरूची पूर्णपणे भक्ती करतो आणि जो याला पात्र झाला आहे अशा शिष्यालाच हे ज्ञान द्यावे (मैत्री उप. VI. २९). स्वतः बुद्धानेही 'उपनिष' शब्दाचा प्रयोग केला आहे. तो म्हणतो, सम्म समाधि देस्सिस्सामि, सउपनिषम्, सपरिष्कारम् (महा छत्तारि सुत्तान्त मज्झिमा निकाय, क्र. ११७)

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या तत्त्वज्ञानाचे मनन–चिंतन आणि संवर्धन क्षत्रियांकडून झाले. श्वेतकेतु हा ब्राह्मण होता. तो प्रवाहण जैवालि या क्षत्रियाकडे जेव्हा ज्ञानप्राप्तीसाठी गेला व म्हणाला, 'मी आपल्याकडे शिष्य म्हणून आलो आहे.' त्या वेळी प्रवाहण जैवालि त्याला म्हणाला, 'हे ज्ञान यापूर्वी कोणाही ब्राह्मणाला कधीही दिले गेले नाही. म्हणून तू आणि तुझ्या पूर्वजांनी आमची हानी करू नये.' ह्यावरून औपनिषदिक क्षत्रियांच्या विरुद्ध ब्राह्मण वर्गाच्या मनात आढी असावी असे दिसते (छा. V, ३–७). त्याचप्रमाणे अजातशत्रूही म्हणाला होता, 'त्याच्याकडून आपल्याला ब्रह्म–ज्ञान होईल अशा समजुतीने ब्राह्मणाने क्षत्रियाकडे यावे हे विपरीत आहे' बृह. उप. II. १–१५). अशीच, दुसरीही उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, 'एवं परंपराप्राप्तं इमं राजर्षयो विदुः' ह्या ज्ञानाचे 'राजविद्या', 'राजगुह्यम्' असे वर्णन आहे (भगवद्गीता IV. २२, IX. २).

ब्राह्मण वर्ग आणि क्षत्रिय वर्ग ह्यांची समाजात आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी आपापसात चढाओढ चालू होती असे म्हटले जाते. कदाचित् तसे असेलही – पण दुसरेही कारण ह्या परिस्थितीच्या बुडाशी असू शकते. मूळच्या आदिवासी अनार्यांशी उद्भवणारे रक्तरंजित संघर्ष विचारवन्त क्षत्रियांना पटत नसल्यामुळे त्यांचा त्या गोष्टीला विरोध होता; शिवाय पशुहत्येबद्दलही त्यांना तिरस्कार वाटे. म्हणून

कदाचित् ब्राह्मण-क्षत्रियांमध्ये अशा प्रकारची विरोधाची भावना असावी.

औपनिषदिक परिभाषेत 'ब्राह्मण' शब्दाचा अर्थ आणि आशयच मुळी बदललेला आढळतो. पुढे दिलेल्या वर्णनावरून धर्म हा क्षत्रियांचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी कसा वापरला गेला ते स्पष्ट होईल :- अगदी प्रारंभीच्या काळात हे जग ब्रह्म होते. ते ब्रह्म एकच असल्याकारणाने त्याची वाढ काही झाली नाही. तेव्हा त्याने दुसरे एक क्षत्रियत्वाचे रूप निर्माण केले, – जसे देवांमध्ये इं , वरुण, सोम, ईशन्. तेव्हा, क्षत्रियांपेक्षा श्रेष्ठ असे काही नाही. म्हणून राजसूय यज्ञाचे वेळी ब्राह्मणाला क्षत्रियाच्या खालचे स्थान ग्रहण करावे लागते. पण क्षत्रियाला असे श्रेष्ठत्व मिळाले तरी, आपल्या क्षत्रियत्वाचा मूळ स्रोत म्हणून त्याला ब्राह्मणांवरच अवलंबून राहावे लागते. अशाच रीतीने ब्रह्म हे वैश्यांच्या आणि शूद्रांच्या रूपानेही प्रगट झाले (बृह. उप. १, ४, ११, १२). पुरुष-सूक्तात म्हटले आहे त्याप्रमाणे, शरीरावयवनिष्ठ काटे-कोर पृथक्करण ह्या ठिकाणी केलेले नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, एकाच वैश्विक मुळा-पासून ब्राह्मणांप्रमाणेच उत्पन्न झालेला शूद्रही आवश्यक असलेली पात्रता मिळवून घेतल्यानंतर ब्राह्मणपदाला प्राप्त होऊ शकत होता. ह्या अर्थाने पाहिले तर मग ब्राह्मण कोणाला म्हणायचे ? क्षुधा, तृषा, जरा आणि मृत्यू यांच्या पलीकडे असणाऱ्या आत्म्याला ज्याने जाणून घेतले, तो ब्राह्मण (बृह. उप. III, ५-५). सत्यकाम जाबाल हा ब्राह्मण नव्हता. पण ज्यावेळी तो हरिद्रुमत गौतमापुढे जाऊन उभा राहिला आणि त्याचे शिष्यत्व पत्करण्याची इच्छा त्याने प्रगट केली, त्यावेळो त्याला विचारण्यात आले, 'तुझे गोत्र कोणते ?' उत्तर देण्यात आले, 'मला ते ठाऊक नाही. माझी आई सांगते, मला कोणापासून जन्म मिळाला ते तिलाही सांगता येत नाही. तिने मला सांगितले आहे, – कोणी तू कोण म्हणून विचारले तर सांग, माझे नाव सत्यकाम जाबाल आहे. जाबालाचा मी पुत्र आहे.' गौतमाने ताबडतोब सत्यकामाला आपला शिष्य म्हणून स्वीकृत करून घेतले. म्हणाला, तू सत्यापासून ढळला नाहीस ! (छांदो. IV, ४). नारद आणि सनत्कुमार या दोघांमध्ये जो संवाद झाला त्यात ब्राह्मण आणि तत्त्व-चिंतक यामधील भेद फार चांगल्या प्रकारे स्पष्ट केला आहे. नारद फार विद्वान होता. वेदांचे अध्ययन त्याने केले होते. गणित, न्याय, राज्यशास्त्र वगैरे विषयांत तो पारंगत होता. आपल्याला उपदेश करावा म्हणून त्याने सनत्कुमाराची प्रार्थना केली व म्हटले, 'भगवन्, पुण्यपावन पवित्र अशा वचनांचा मी ज्ञाता आहे. मी मंत्रविद् आहे, पण मी आत्मविद् नाही. आत्म्यासंबंधीचे ज्ञान मला नाही. आत्म्याचे ज्ञान झाल्याने मनुष्य सर्व दुःखाच्या पलीकडे जातो असे मी ऐकले आहे. असा मी दुःखी आहे (मंत्रविदहम् । नाऽहमात्मविद् । सोऽहम् भगवः शोचामि ।). तेव्हा त्याला सांगण्यात आले, – तू जे काही शिकला आहेस ते नुसते नाममात्र आहे. त्याच्याही पलीकडे वाचा आहे, मन आहे, कल्पना आहे, विचार आहे, ध्यान आहे, ज्ञान आहे, शक्ती आहे, अन्न आहे, जल आहे, उष्णता आहे, अवकाश आहे, स्मरणशक्ती आहे, आशा आहे, जीवन आहे आणि शेवटी आहे श्रद्धेचे आणि सत्याचे चिंतन कर-णारा आणि बोलणारा. एवढे कळले की मग माणसाला भूमाचे (जे काही खरोखरी आहे त्याचे) ज्ञान होते यातच अति श्रेष्ठ प्रकारचा आनंद आहे (भूमा वै सुखम् ।). मग त्याला कळते, की मीच हे सर्व काही आहे (अहमेव इदं सर्वम् ।). आणि मग त्याल' आत्म्यातच आनंद आहे हे दिसू लागते, आणि तो पूर्ण-पणे मुक्त आत्मनियंत्रित (स्वराट्) झाला असे म्हणता येते.' – याचा आशय असा की, आपल्या संकुचित अहंकाराच्या चाकोरीतून जो बाहेर पडला आणि जो वैश्विक जाणीवेशी एकरूप झाला, तोच खरा 'स्वराट्' (ब्रह्मविद्) (छांदो. उप. VII, १-२५). सिद्धार्थ गौतमाच्या जीवनाचे निरीक्षण करते वेळी हा विचार आपण प्रामुख्याने मनात ठेवणे आवश्यक आहे.

उपनिषदांच्या अध्ययनाचा अर्थ ह्यावरून स्पष्ट होतो. शब्द नुसते तोंडपाठ करण्याला काही महत्त्व नाही, त्या शब्दांद्वारा व्यक्त झालेल्या सत्याचा प्रत्यक्ष जीवनात अनुभव घेतला पाहिजे, हीच मुख्य गोष्ट आहे. माणसाने अनेकानेक शब्दांच्या मननावरही मन एकाग्र करू नये, कारण त्यांत नुसती वाणी शिणविली जाते असे म्हटले आहे (नानुध्यायात् बहून्) शब्दान् वाचो विग्लापनम् तत् ।) ही (बृह. उप. IV. ४. २१).

अशा रीतीने मंत्रांचेच निरर्थकत्व दाखवून दिल्यानंतर यज्ञ-व्यवस्थेचा फोलपणा आपोआपच

सांग, – तुला काय दिसते ?' 'अगदी लहान बिया दिसतात, महाराज.' 'तर मग आता त्यातील एका बीजाचे विभाजन कर', 'केले, महाराज', 'आता सांग, तुला काय दिसते' 'काहीही नाही, महाराज !'

मग तो म्हणाला, 'माझ्या प्रिय पुत्रा, जे तुला गोचर नाही असे जे अतिसूक्ष्म सारभूत तत्त्व आहे, त्या सारभूत तत्त्वापासूनच हा महान न्यग्रोध वृक्ष असा निर्माण झाला आहे. माझ्या प्रिय पुत्रा, माझ्यावर विश्वास ठेव. हे जे अतिसूक्ष्म सार–तत्त्व आहे तेच या विराट जगताच्या आत्म्याच्या ठिकाणी आहे. तेच सत्य आहे. तेच आत्मा आहे. श्वेतकेतो, तूही तेच आहेस.' – या ठिकाणी जे इंद्रियांना अगोचर आहे त्या सारभूत तत्त्वाला सत्य म्हटले आहे (छांदो. ६, २–१२).

'तत् त्वम् असि' (ते तू आहेस) या तत्त्वाचे निरूपण करणारा हा संवाद आहे. हे वचन आणि यावरोबरच 'अहं ब्रह्मास्मि', 'अयमात्मा ब्रह्म' आणि 'प्रज्ञानम् ब्रह्म' ही वचने म्हणजे औपनिषदिक विचाराने गाठलेली पराकोटी होय. यांना 'महावाक्य' असे म्हणतात.

वैश्विक स्वरूपाविरुद्ध व्यक्तित्वाचा उल्लेख करणारी ही 'अहम्' आणि 'त्वम्'ची कल्पना कशी विकास पावत गेली ते पाहणे मोठे रोचक आहे. एके ठिकाणी म्हटले आहे, "व्यक्तिरूपाने आत्माच प्रथम होता. तो म्हणाला, 'प्रथम मी आहे.' त्यापासून 'मी' हे नाम उत्पन्न झाले. तो एकटाच होता. त्यामुळे त्याला भय वाटू लागले आणि आपल्याला पत्नी असावी अशी त्याने इच्छा केली. मग त्याने सर्व सृष्टीला जन्माला घातले. सर्व देवांसकट सर्वांना त्याने स्वतःमधून उत्पन्न केले. अशा रीतीने तो स्वतःच सर्व देव बनला (बृह. उप. १, ४–९).

दुसराही एक सिद्धांत आहे. तो असा. प्रारंभी जगत् अव्याकृत (ज्यात वेगवेगळेपणा नाही, एकस्वरूपी) असे होते. नाम–रूपामुळे त्यात निरनिराळेपणा आला. अग्निकुंडात ज्याप्रमाणे अग्नी किंवा वस्तऱ्याच्या म्यानात ज्याप्रमाणे वस्तरा असतो त्याप्रमाणे त्याने यात प्रवेश केला. त्याच्या श्वासोच्छ्वासाला 'श्वसन' असे नाव मिळाले. त्याच्या ऐकण्याला 'श्रवण' आणि विचार करण्याला 'मन' असे नाव मिळाले. तो करीत असलेल्या क्रियांची ही केवळ नामे होत (बृह. उप. I, ४, ७).

आणखीही एक सिद्धांत होता, तो असा. प्रारंभी ब्रह्म होते. ते म्हणाले, 'मी ब्रह्मन् आहे.' तेच सर्व काही बनले (बृह. उप. १, ४, १०). या ठिकाणी अ–प्रत्यक्ष अशा विश्वरूपाने प्रत्यक्ष असे विश्वरूप धारण केले असे म्हटले आहे. पुरुषसूक्तात म्हटल्याप्रमाणे यज्ञासाठी स्वतःच स्वतःचे रूप बदलल्याप्रमाणेच हे (ऋग्वेद ०९, ९०).

व्यक्तिगत जीवात्म्याची अनंत अशा ब्रह्माशी एकरूपता सिद्ध करण्यात आली ती येणे प्रमाणे :— हे सारे विश्व म्हणजे ब्रह्मच होय. निर्द्वंद्व मनाने माणसाने त्याची पूजा करावी. त्यातूनच तो बाहेर आला, त्यातच तो विलीन होणार आहे आणि त्यातच तो श्वासोच्छ्वास करीत आहे हे त्याने जाणावे. जीवनातील उद्दिष्ट म्हणजेच मानवी जीवन (क्रतुमयः). या जीवनात जसे माणसाचे उद्दिष्ट कार्य असेल तसा तो परलोकात प्रवेश केल्यानंतर बनतो. त्याचा आत्मा अंतःकरणात असतो, तो मनोरूप आहे; त्याचा देह प्राणरूप आहे, त्याचे रूप तेज आहे, त्याची धारणा सत्यरूप आहे, त्याचा आत्मा अवकाशरूप आहे, त्यात सर्व कर्मे, सर्व इच्छा, सर्व गंध, सर्व रस, संपूर्ण जग सामावलेले आहे आणि तरीही तो तांदुळाच्या, यवाच्या, मोहोरीच्या दाण्यापेक्षाही लहान आहे. माझ्या अंतर्यामात वसणारा हा माझा आत्मा ब्रह्म आहे (छांदो. उप. ३, १४). या ठिकाणी इच्छेसंबंधीची कल्पना (क्रतु) पहिल्याने आपल्यासमोर येते. नासदीय सूक्तात हीच इच्छा निर्मितीची प्रेरक, सतत कार्यान्वित असणारी, अवस्थांतराची कारक म्हणून वर्णिली आहे. या क्रियापद्धतीचे वर्णन करण्यात आले आहे ते असे – मनुष्य जसे कर्म करतो, ज्याप्रमाणे मनुष्य वर्तन करतो, तसा तो होतो. सत्कर्म करणारा चांगला होतो आणि दुष्कृत्य करणारा दुष्ट बनतो. पण लोक म्हणतात, – मनुष्य कर्मांनी बनलेला नाही, तो इच्छांचा बनलेला आहे. याला उत्तर म्हणून गुरु म्हणतो, – जशी इच्छा, तसा संकल्प; जसा संकल्प तशी क्रिया मनुष्य करतो. मनुष्य जे कर्म करतो, त्याचेच रूप माणसाला प्राप्त होते. एका श्लोकात हेच म्हटले आहे, – जेथे मन जडले असेल तेथेच क्रियान्वित झालेला आतील आत्माही

अनुक्रमणिका

जातो आणि आपल्या कार्याचे फळ प्राप्त करून घेतो. या जगात माणसाने जसे कर्म केले असेल त्याप्रमाणे तो परलोकातून पुन्हा या कर्मलोकात रूप घेऊन येतो. इच्छा धारण करणारा मनुष्यही तसाच.

जो मनुष्य कशाची इच्छा करीत नाही, जो इच्छेच्या बंधनातून मुक्त झाला आहे, आत्मा हीच ज्याची इच्छा, त्याला मृत्यू नाही. तो प्रत्यक्ष ब्रह्मच असल्या कारणाने ब्रह्माप्रत जातो.

यदा सर्वे प्रमुच्यंते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्मसमश्नुते ॥

(ज्ञानपूर्व–मनुष्याच्या हृदयात ज्या ज्या इच्छा दडल्या होत्या त्या सर्व जेव्हा नाश पावतात, तेव्हा तो मृत्युरहित होतो (व) तो याच देही ब्रह्मरूप पावतो बृह. उप. ४. ४–७ कठ २–३–१४).

ज्याला प्राचीन संकीर्ण मार्ग म्हणून म्हटले आहे, तो मार्ग हाच होय. बुद्धाच्या नगरसुत्ताच्या आणि भगवद्गीतेच्या संबंधी विचार करताना आपण पुन्हा या विचाराप्रत येतो.

अशा रीतीने 'क्रतुमय' अथवा 'काममय' पुरुषाची यात्रा एका मृत्यूपासून दुसऱ्या मृत्यूपर्यंत (मृत्योः स मृत्युम्) सारखी सुरू असते. तो जन्माला येतो, मरतो आणि पुन्हा जन्माला येतो. परंतु मनुष्याच्या हृदयात दुसऱ्या एका शक्तीचा निवास आहे हे आपण पाहिले आहे. ही शक्ती वैश्विक स्वरूपाची आहे आणि ती इच्छातीत आहे. ही गोष्ट पुढे दिलेल्या श्लोकात विशद करून सांगितले आहे.

द्वासुपर्णा सयुगा सख या, समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलस्वाद्वत्यनश्नन्न्यो अभिचाकशीति ॥
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यति अन्यसीशम् अस्य महिमान-
मिति वीतशोकः ॥

सर्वदा एकत्र असणारे व एकमेकांचे मित्र असे दोन पक्षी (जीव व ईश्वर) एकाच शरीररूपी वृक्षाला चिकटून राहिले आहेत. त्यांपैकी एक (जीव) स्वादांनी युक्त असे फल भक्षण करतो व दुसरा पक्षी पाहात असतो. दोघांनाही समान असणाऱ्या त्या (शरीररूपी) वृक्षाचे ठिकाणी संलग्न झालेला (एक) पुरुष (जीव) आपले स्वामित्व नाही, अशा भ्रमाने दुःख करतो, व (अनेक जन्मांनंतर) ईश्वर व त्याचा महिमा मीच आहे असे प्रत्यक्ष पाहतो तेव्हा तो शोकरहित होतो (मुंडकोपनिषद ३) परंतु 'आत्मा' शब्दाच्या निश्चितार्थासंबंधी काहीसा गोंधळच दिसतो. बृहदारण्यकोपनिषदाच्या सुरुवातीला ज्या ठिकाणी यज्ञ–अश्वाचे रूपक आलेले आहे तेथे, वर्ष हा त्याचा आत्मा (शरीर या अर्थाने) असे म्हटले आहे. पुढे जगतोत्पत्तीचे वर्णन करीत असताना त्याच उपनिषदात असेही म्हटले आहे— 'प्रारंभी काहीच नव्हते. सर्व काही क्षुधेने मृत्यूने आवृत होते, कारण क्षुधा म्हणजे मृत्यूच होय. मग त्याने इच्छा केली–मी देही (आत्मान्वित्) झालो तर बरे. हाच शब्द व्यक्तिगत जीवात्मा म्हणूनही वापरला गेला आहे. उदाहरणार्थ हे वचन पाहा,– 'मृत्यू पावलेल्या मनुष्याचा स्वर (शब्द) अग्नीत जाऊन मिसळतो. त्याचा श्वास वायूंत, त्याचे नेत्र सूर्यात, त्याचे मन चंद्रात, त्याची श्रवणशक्ती आकाशाच्या दिशांत त्याचे शरीर मातीत, त्याचा आत्मा अवकाशात, त्याच्या मस्तकावरील केस वनस्पतीत, त्याच्या शरीरावरील केस वृक्षात आणि त्याचे रक्त व वीर्य जलात मिसळते.' त्यावर आर्तभाग याज्ञवल्क्याला म्हणाला, 'तर मग या व्यक्तित्वाचे (पुरुष) काय होते?' तेव्हा तो म्हणाला, 'आर्तभागा, माझा हात हातात घे. ही गोष्ट आपण सार्वजनिकपणे बोलू नये.' आणि मग ते दोघे तेथून दुसरीकडे निघून गेले आणि त्यांनी चर्चा केली. त्यांनी निष्कर्ष काढला तो हा की शिल्लक उरले होते फक्त कर्म (बृह. ३५, ३ २. १३). ह्यूमने म्हटले आहे त्याप्रमाणे हे अगदी स्पष्टपणे बुद्धाने सांगितलेले तत्त्व आहे. बुद्धाने स्पष्टपणे असेच म्हटले आहे की मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कर्मांचा विपाकच काय तो शिल्लक उरतो. 'आत्मा' शब्दाच्या निश्चित अर्थाबद्दल त्या काळात एकमत नसावे असे दिसते. एकीकडे याज्ञवल्क्य अगदी निःसंदिग्धपणे म्हणतो, आत्मा हा विश्वरूप आहे; आणि दुसरे मत असे की नाम–रूपाप्रमाणे आत्माही वस्तुनिष्ठ जडरूपी वस्तू आहे.

याज्ञवल्क्याने आपली पत्नी मैत्रेयी हिला सांगितले, मला गृहस्थाश्रम सोडायचा आहे. ह्यासाठी जवळच्या संपत्तीची शेवटची व्यवस्था करावयाची आहे. त्यावर मैत्रेयीची जी प्रतिक्रिया व्यक्त झाली ती फार

अभिनव स्वरूपाची होती. ती म्हणाली, 'संपत्तीने भरलेली ही संपूर्ण पृथ्वी जरी माझी झाली तरी त्यामुळे मी अमर होईन का?' त्यावर याज्ञवल्क्याने उत्तर दिले, 'नाही, नाही. तसे झाले तर तुझे आयुष्य संपत्तिमानाचे होईल, एवढेच. संपत्तीच्या साहाय्याने अमरपदाची प्राप्ती होण्याची काही आशा नाही.' आणि मग याज्ञवल्क्याने उदात्त आणि वक्तृत्वपूर्ण वाणीने आत्म्याचे तत्त्वज्ञान स्पष्ट करून सांगितले. तो म्हणाला, पती, पत्नी, पुत्र, संपत्ती, पशु, ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व, हे जग, देव, वेद, यावर मनुष्य प्रेम करतो ते त्यांच्यासाठी नाही. जे काही सर्व माणसाला प्रिय असते ते त्यांच्यासाठी नाही, तर आत्म्याच्या प्रेमामुळे सर्व प्रिय होते! दर्शन घ्यायचे ते आत्म्याचे, श्रवण करायचे ते आत्म्याचे, मनन करायचे ते आत्म्याचे, निदिध्यास करायचा तो आत्म्याचा. हे मैत्रेयी, तसे केल्याने या जगाचे, सर्वांचे ज्ञान होते. ते ज्ञान झाले की त्यात सर्व वस्तूंचे, सर्व कल्पनांचे पृथकत्व विरून जाते. 'नेति, नेति' (ते हे नाही, ते ते नाही) अशा शब्दांनीच त्याचे वर्णन करता येणे शक्य आहे, कारण ते हस्तगत करता येत नाही की त्याचे आकलन करता येत नाही. जाणणाऱ्याला कोण जाणणार? (बृह. ३५. ४. ५. १५), ह्या श्वासोश्वसनापेक्षा अधिक श्रेष्ठ दुसरे काही नाही. प्राणिमात्र सत्य आहेत. आणि तो त्यांचे सत्य आहे (बृह. उप. २ ३.६). त्याचप्रमाणे सारेचे सारे तीन हजार तीनशे सहा देव त्या एकाच ब्रह्मापर्यंत आणून पोचविले जातात, आणि हे तथाकथित देव म्हणजे त्या आत्मब्रह्माचा महिमा आहे (बृह. उप. ३. ९. १. २.).

आत्म्याच्या संबंधात एकीकडे वर दिल्याप्रमाणे म्हटले जात होते तर दुसरीकडे त्यासंबंधी निराळाच विचार पुढे येत होता. या मताप्रमाणे, सत्य, ज्ञान आणि अनंत अशा ब्रह्माशी आत्म्याचे एकरूपत्व मानले गेले आहे. यातूनच आकाश, वायु, अग्नी, जल आणि पृथ्वी ही पंच आदितत्त्वे आकारास आली. त्यातूनच वनस्पती, अन्न, वीर्य आणि पुरुष यांचीही उत्पत्ती झाली. पुरुषाची एकापेक्षा दुसरा श्रेष्ठ अशी पाच रूपे कल्पिली गेली (१) अन्नमय, (२) प्राणीमय, (३) मनोमय, (४) विज्ञानमय आणि या सर्वांच्याही वर (५) आनंदमय. या ठिकाणी या सर्व पुरुषांचे वर्णन 'शरीरात्मा' असे केले आहे. एकाच परमात्म्याची ती व्यक्तिगत रूपे असून तो परमात्मा अशरीरी म्हणजे 'अनात्म्य' आहे असे म्हटले आहे. पुढे असेही म्हटले आहे की, प्रारंभी 'नसणे' (असत्) होते; मग 'असणे' (सत्) निर्माण झाले.

त्याने स्वतःच पुरुष (आत्मा) निर्माण केला (स्वयं अकुरुत) म्हणून त्याला 'चांगले केलेले' (सुकृत) असे म्हणतात. अदृश्य, अशरीरी (अनात्म्य), अव्याकृत, निराधार अशाच्या ठायी आधार मिळाला की मग निर्भय अवस्था प्राप्त होते (तैत्ति. उप. वल्ली २).

बींच्या प्रेम-गाथा : स्वतंत्र व भाषांतरित

—प्रा. भवानीशंकर पंडित

प्रेम या विषयावर बींच्या काही स्वतंत्र आणि काही भाषांतरित कविता आहेत. त्या सर्वांचा विषय प्रेम हा एकच असला, तरी त्यात त्याच्या विविध रूपांचे दर्शन आहे. त्यामुळे तो रुचिर आणि आस्वाद्य झाला आहे. प्रेम हा विषयच नित्यनूतन आहे. बींच्या प्रतिभेच्या स्पर्शाने तो सुवर्णमय झाला आहे. त्याचे तोलमोल वाढले आहे. बींच्या प्रतिभेचा विहंग तेजोमय आकाशात आपले विशाल पंख पसरून भराऱ्या मारणारा आहे. त्याच्या पंखांना जमीनीवरील धुळीचा ओझरताही स्पर्श ठाऊक नाही. त्यामुळे त्यांच्या कवितांतले प्रेम सर्वत्र उदात्त आहे.

'प्रणयपत्रिका' ही त्यांची पहिली कविता. ती त्यांनी दिनांक चौदा सप्टेंबर अठराशे एक्क्याण्णव रोजी वऱ्हाडात चिखलदरा येथे रचिली व तिला प्रसिद्धी मिळावी या हेतूने ती 'करमणुकी'कडे पाठविली. तिचे संपादक हरिभाऊ आपटे यांनी तिला तावडतोब तीन आक्टोबर अठराशे एक्क्याण्णवच्या 'करमणुकी'त प्रसिद्धी दिली आणि आपल्या स्वभावसिद्ध मार्मिकतेची व रसिकतेची प्रतीती पटविली. आचार्य अत्रे 'फुलांच्या ओंजळी'च्या प्रस्तावनेत सांगतात,—" खुद्द कवींना जरी ही आपली पहिली कविता आता 'ओवडधोवड' वाटत असली, तरी त्यावेळी ती हरिभाऊंना फारच आवडली." वस्तुतः ही कविता रसिकांना आज देखील भुरळ पाडील. कारण तिच्यातील भावनेची माधुरी कालातीत आहे.

बींची ही प्रेमकविता नाटचात्म आहे. पती दूर गावी गेला आहे. त्याचे कुशलपत्र नाही. म्हणून पत्नीने त्याला पाठविलेली ही 'प्रणयपत्रिका' आहे. पत्रिकेच्या रेशिमात त्या मालिनीने बारा फुले गुंफिली आहेत. ती सर्व सारखीच सुंदर व सुवासिक नाहीत. कारण ही कविता रचिली, त्यावेळी बींचे वय अदमासे एकुणवीस वर्षांचे होते. साहित्याच्या क्षेत्रातील त्यांचा अनुभव अजून समृद्ध व संपन्न नव्हता. त्यामुळे या कवितेच्या आरंभाचा व अंताचा बराच भाग पत्रलेखनातील सांप्रदायिक मायन्यांनी व्यापला आहे. कविता नाटयात्म आहे. नाटय म्हटले म्हणजे कला आलीच. तशी कला पत्राच्या स्त्रीस्वभावसुलभ भाषेत आणि पत्र लेखिकेच्या मनोलेखेत साधण्याचा प्रयत्न बींनी केला आहे. तो पुष्कळ प्रमाणात यशस्वी झाला आहे. पत्रलेखिका विरहिणी आहे. दूरस्थ पतीला ती तिच्या लीलालोलुपतेची आठवण करून देते;——

> **क्षणभर अपुल्या मी दृष्टिच्या आड होतां**
> **करमत नव्हतें ना आपल्या थोर चित्ता !**
> **विविध मिष करावें काम कांहीं करीतां**
> **मजविण मग कैसा कंठितां काळ आतां ?**

तिच्या या प्रश्नात 'थोर' या विशेषणात बारीक खोच आहे; आणि एकूण प्रश्नात पुरुषजातीच्या लंपटते वर हळुवार बोट आहे. तिचे पतीवर प्रेम आहे. ती त्याचे 'मानस' पूर्ण जाणणारी आहे. पण या प्रेमामुळेच ती शंकाकुल होते. 'अतिस्नेहः पापशंकी' हे काही खोटे नाही. पुरुषाच्या भ्रमरवृत्तीची तिला भीती वाटते. पुरुष वेड पांघरतात आणि पेडगावला जातात ही लोकोक्ती तिच्या मनाला स्वस्थ बसू देत नाही. पत्राच्या ओघात ती आपली मनोव्यथा प्रकट करते;—

> **तरल मन नराचें राहतें ऐकतें मी**
> **विसर बघुनि पावे अन्य 'पात्रा'स नामी**
> **कमलिनि भ्रमराला नित्य कोशांत ठेवी**
> **अविरत म्हणुनी तो पंकजीं प्रेम दावी**

बींनी येथे संस्कृत साहित्यातील एका कविसंकेताचा 'दृष्टांत' म्हणून उपयोग केला आहे. परंतु त्यामुळे कविता ध्वन्यर्थक झाली आहे. कमलिनी भ्रमराला

कोंडून ठेवते, म्हणूनच तो तिच्या पाशात अडकून राहतो, त्याचप्रमाणे स्त्रीने पुरुषाला बंधनात ठेवले पाहिजे अशी त्या 'दृष्टांता'त सूचकता आहे.

स्त्रीपुरुषांच्या मनोविज्ञानाच्या दृष्टीने ही कविता विचारणीय आहे. स्त्रीची शंकाकुलता आणि पुरुषाची भ्रमरवृत्ति यांच्यातील विरोधाभासावर ही कविता आधारल्यामुळे ती विशेष रमणीय झाली आहे.

ह्याच कवितेसंबंधी आचार्य अत्रे आपल्या प्रस्तावनेत पुढे सांगतात; –"ह्या कवितेला 'मधुकर' नावाच्या कोणी एका कवीने काव्यमय उत्तरही दिले होते. ही कविता एकोणिसशे एकवीस साली श्री. विरकुड याच्या 'महाराष्ट्र साहित्या'त पुनर्मुद्रित झाली." परंतु ही कविता पुनर्मुद्रित झाली तेव्हा तिच्याबरोबर विरकुडांनी 'मधुकरां'चे काव्यमय उत्तरही पुनर्मुद्रित केले होते.* ह्या कवितेच्या पुनर्मुद्रणावर बींची टीप आहे; —

['करमणूक पत्रात पहिल्यानेच प्रसिद्ध झालेली ही माझी पहिलीच कविता. 'मधुकरा'ने (हे कोण?) तिला पांघरविलेल्या पहिल्याच बहुमोल शालीसह प्रकाशित करण्याचा योग श्रीयुत श्री. गो. देशपांडे यांच्या अकारण स्नेहामुळे मला लाभला आहे. या उगमस्थलाकडे पाहून आजही मनाला आनंद होत आहे. ही कविता पुनः प्रकाशित करण्यात भासमान होणाऱ्या 'अहं'भावाबद्दल साहित्यवाचकांची 'दळदार' अंतःकरणे मला क्षमा करतील अशी आशा आहे.'–Bee]

बींची ही टीप महत्त्वाची आहे. 'मधुकर कोण?' हे जाणण्याची त्यांना उत्सुकता होती. मधुकरांच्या काव्यमय उत्तराला त्यांनी आपल्या 'कवितेला पांघरविलेली बहुमोल शाल' म्हणून त्याचा गौरव केला आहे. यावरून त्यांना ते 'उत्तर' आवडले होते हे उघड आहे. 'फुलांच्या ओंजळी'च्या प्रकाशनाच्या वेळी त्यांना आपली ही कविता 'ओबडधोबड' वाटली, तरी ती देखील त्यांच्या आवडीची होती. ते निरहंकारी होते आणि रसिकांबद्दल त्यांना अत्यंत आदर होता.

बींची पुनर्मुद्रित कविता आणि 'मधुकरां'चे उत्तर यांच्या शेवटी विरकुडांची संपादकीय टीप आहे; –

['तीस वर्षांपूर्वी' करमणूक' पत्रात प्रसिद्ध झालेली आपली ही कविता आज पुन्हा प्रसिद्ध करण्याची परवानगी देऊन परमपूज्य कविमित्र श्री. Bee यांनी 'महाराष्ट्र साहित्या'ला अत्यंत ऋणी केले आहे. श्री. Bee यांची ही पहिलीच कविता या दृष्टीने तिच्याकडे पाहण्यात साहित्याच्या वाचकांना कौतुक व आदर वाटेल. 'प्रणयपत्रिके'स उत्तरादाखल 'करमणूक' पत्रात छापलेली कविताही बरीच सरस आहे. तथापि मूळ कवितेतील व या उत्तरातील सूक्ष्म फरक चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्षात येईल.' सं. म. सा.]

एकोणिसशे चौतीसच्या जुलैत 'फुलांची ओंजळ' प्रसिद्ध झाली. तिच्यात बींच्या या पहिल्या कवितेचा समावेश झाला आहे. प्रस्तावनेत अत्र्यांनी 'मधुकरां'चा आणि त्यांच्या 'काव्यमय उत्तरा'चा निर्देश केला आहे. पण तोपर्यंत 'मधुकर कोण?' हे जाणण्याची बींची जिज्ञासा पूर्ण झाली नव्हती. तेव्हा या बाबतीत मी 'प्रतिभे'चे संपादक व संचालक श्री. हरिभाऊ मोटे यांना दहा सप्टेंबर एकोणिसशे पस्तीस रोजी एक खुलाशाचे पत्र पाठविले, ते त्यांनी 'प्रतिभेचा पत्रव्यवहार' या सदरात 'कविवर्य Bee व मधुकर' या शीर्षकाने प्रसिद्ध केले आहे.*

त्याचा सारांश असा; –

'मधुकर म्हणजे दिवाणबहाद्दुर कृष्णरावलक्ष्मण पावणस्कर, एम्. ए., सी. आय्. ई. ते अनेक वर्षे राजस्थानात किशनगढ संस्थानचे दिवाण होते आणि पुढे सेवानिवृत्त झाल्यावर अजमेरला स्थायिक झाले होते. ते मूळचे सागरदमोहचे राहणारे. त्यांचे शिक्षण जबलपूरच्या रॉबर्टसन् कॉलेजात झाले होते. विद्यार्थीदशेत त्यांना कविता रचण्याचा छंद होता. त्यांनी पंचवीस तीस कविता रचल्या असून त्या बहुधा इंग्रजी किंवा संस्कृतावरून घेतल्या आहेत. परंतु त्यांची ही भाषांतरे मूळास लाजवतील अशी सरस व सुंदर साधली आहेत. रे. टिळकांनी संपादन केलेल्या 'अभि-

---

* महाराष्ट्रसाहित्य सं. श्री. विरकुड, सप्टें. आक्टो. १९२१.

* 'प्रतिभा' २० सप्टेंबर १९३५.

नवकाव्यमाले'च्या दुसऱ्या भागात 'कृ. ल. पा.' या नावातील आद्याक्षरांनी 'समुद्रवर्णन', 'बाळपण' 'विरही विलाप' आणि 'मृत्युभय' या त्यांच्या कविता संगृहित करण्यात आल्या आहेत. 'काव्य-रत्नावलि' आणि 'विविधज्ञानविस्तार' यांच्या अन्या अंकांत 'मधुकर', 'कृ. ल. पा.' आणि K. L. P. या नावांनी त्यांच्या कविता आढळतात. विविधज्ञान-विस्ताराच्या ज्युबिलीनिमित्त प्रकाशित झालेल्या 'विविधकाव्यमाले'त 'विरह हा कडू किती बाहे। हे युवतीलाच पुसावे' हे त्यांचे गीत संगृहित करण्यात आले आहे. पावणस्करांनी बीच्या 'प्रणयपत्रिके'ला जे उत्तर दिले, ते हरिभाऊ आपटयांनी पंचवीस ऑगस्ट अठराशे चौऱ्याण्णवाच्या 'करमणुकी'त प्रसिद्ध केले आहे; आणि पुन्हा 'घटकाभर करमणुकी'च्या तेवीसाव्या पुस्तकात त्याचा अंतर्भाव केला आहे. या 'उत्तरा'वर पावणस्करांची टीप आहे, 'करमणुकी'च्या ३–१०–९१ च्या अंकात 'प्रणयपत्रिका' या नावाची सुरस कविता छापून आली होती. 'उत्तर' म्हणून खालील कविता आहेत.* पावणस्करांनी 'मधुकर' हे काव्यनाम घेतले. कारण 'बी' या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'भृंग' असला, तरी तो शब्द 'मधमाशी' या अर्थानेही रूढ आहे. त्याकाळी टिळक पतिपत्नींचा कविकवयित्री म्हणून नुकताच लौकिक पसरत होता. तेव्हा ही 'प्रणयपत्रिका' एखाद्या कवयित्रीची असावी व तिने ती काव्यमय नावाने दिली असावी अशा कल्पनेने पावणस्करांनी आपल्या उत्तराखाली 'मधु-कर' हे काव्यमय नाव दिले.'

बींनी हा खुलासा 'प्रतिभे'त वाचला होता; आणि माझ्याकडूनही त्यांना पुढे ही माहिती कळली होती.

विरकुडांनी आपल्या टीपेत 'बींची मूळ कविता व पावणस्करांचे 'उत्तर' यांतील सूक्ष्म फरक चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्षात येईल' असे जे म्हटले आहे, ते यथार्थ आहे. बींच्या कवितेत भावनेचा संचार आहे. पावणस्करांच्या 'उत्तरा'त बुद्धीचा प्रभाव आहे. पण एका दृष्टीने ते योग्य आहे. स्त्रीच्या भावनावेगाला अनेक वेळा युक्तिवादाने बांध घालण्याशिवाय पुरुषाला दुसरा उपाय नसतो. पण तो युक्तिवादही काव्यमय आहे; —

विरह म्हणुनि होता कोणता पदार्थ
विदित न अपणांला आजपर्यंत सार्थ
जरि उभयजनीं तो सारखा आजि आला
प्रिय सखि ! तरि आता स्नेह आहू तयाला.
स्मरत न तुजला ती काय आता सुवेळ ?
बसत अपण होतो आटपोनी कराळ !
पठन करित काव्ये सत्कवींची रसाळें
अपरिमित न झाला काय आनंद ? बाळे !
सुतनु कितिक वेळां सांग दोघे बसोनी
सुरस पद मिळोनी गाइलें सुस्वरांनी
करित अमित गोष्टी गायने गात गात
न कळत कितिदा ती सांग झाली प्रभात ?

'उत्तरा'त भवभूती–कालिदासादिकांच्या अभिजात काव्यकृतींचा अस्फुट सूर प्रतिध्वनित झाला आहे, त्यात परिचित उदात्ताच्या पुनर्मीलनाचा अनिर्वचनीय आनंद आहे.

बींच्या कवितेचे सौभाग्य असे की, या पहिल्या कवितेपासूनच तिला काव्यमर्मज्ञ व रसज्ञ प्रशंसक लाभले. या कवितेला पावणस्करांनी 'उत्तर' दिले, तर 'वेडगाणे' वाचून रे. टिळकांना 'टू बी' हे काव्य स्फुरले. तांब्यांनी 'आधुनिक चिंतनपर काव्ये' या आपल्या लेखात 'वेडा', 'अश्रुगुच्छ', 'तू काय पाहिले सांग', 'वेडगाणे' इत्यादी तत्त्वचिंतनपर कवितांबद्दल आपला विरोध प्रकट केला असला, तरी तो भाग रुचिभिन्नतेचा किंवा काव्यविषयक दृष्टि-भेदाचा आहे. बींच्या 'नावात काय आहे', 'विचार-तरंग' आणि 'अनुकार' या कवितांवर आनंदराव टेंकाडे यांनी हल्ला चढवला होता. त्याचे कारण बींचा आशय व रोख आनंदरावांच्या लक्षात आला नव्हता. त्या दोघांना परस्परांविषयी प्रेम व आदर होता हे मी स्वतः डोळयांनी पाहिले आहे. गणेश विठ्ठल कुळ-कर्णी यांनी मात्र 'आधुनिक कवी' या आपल्या लेखात गोविंदाग्रज, ठोंबरे, नागेश, बी इत्यादी तत्काळीन प्रमुख कवींवर 'ट ला ट प ला प । काव्य जुळे आपो-आप' या शब्दात अकारण निरर्गल टीका केली होती. पण काळाच्या ओघात आज तिला विनोदाचे रूप आले आहे.*

* 'युगवाणी'च्या वाचकांसाठी पावणस्करांचे 'उत्तर' अन्यत्र देत आहे. भ. श्री. पं.

* ज्ञानांजन. सं. आजगावकर, डिसेंबर १९१३.

बींची 'प्रमिला' ही कविता प्रेमपरच आहे. परंतु तिचा आविष्कार संस्कृत साहित्यातील श्रृंगार रसाच्या घाटणीवर नसून इंग्रजी साहित्यातील 'लव्ह पोएम्' किंवा 'लव्ह लिरीक्'च्या शैलीवर आहे. 'प्रमीला' हे वस्तुतः स्त्रीनाम आहे. पुराणांतरी स्त्री-साम्राज्याच्या सम्राज्ञीचे नाव 'प्रमीला' होते. परंतु अर्जुनाने आपल्या पराक्रमाच्या बळावर तिचे प्रेम जिंकले व तिला वश करून घेतले अशी कथा आहे. 'प्रमीलित नेत्रांची युवती' असा या शब्दाचा दुसरा अर्थ आहे. येथे 'बीं'ना तोच अर्थ अभिप्रेत आहे. या कवितेत बींनी एका निद्रित रमणीचे 'शब्दचित्र' अतिशय चातुर्याने चितारले आहे.

काव्यमय चित्रात आणि रंगीत चित्रात अंतर आहे. काव्यमय चित्र बोलके असते. रंगीत चित्र मुके असते. काव्यचित्र हृदयाला स्पर्श करते. रंगीत चित्र केवळ दृष्टीला सुख देते. काव्य पाठांतरात असेल, तर मनात येईल, त्यावेळी त्या काव्यातील शब्दांच्या आवृत्तीने ते चित्र अंतःश्चक्षूंसमोर साकार करता येते. रंगीत चित्राची वस्तू प्रत्यक्ष पुढे हवी. त्याशिवाय तिचे दर्शन होत नाही. बींनी एकांतशय्येवर निद्रावश असलेल्या रमणीचे बहिरंग आपल्या शब्दांच्या रंगांनी जितके उठावदार केले आहे, तितकेच तिचे कोमल अंतरंग आपल्या सहजस्फूर्त भावनांनी सजीव केले आहे :—

'माझी मूर्ति असेल सांप्रत हिच्या हृन्मंदिरी स्थापिली,
न्हाणोनी प्रणये, सुनर्म सुमने अर्पूनि, आरा‍ली;
झाले सस्मित आस्य, नेत्र उघडे ईषत्, कपोली कर,
रामा मंगल देवता रमतसे निर्वैर शय्येवर.
येता दृष्टि पथात मी, मिटुनि जे संकोच पावे अती,
ते निद्रेत मुखारविंद फुलले मंदस्मिताने किती !
स्वच्छंदे प्रतिकारिता मजप्रती, प्रोत्साह ये ज्या नव
हाले हात मृणालनालसम, तो माझा करी गौरव !'

काव्य म्हणजे बोलके चित्र आहे आणि चित्र म्हणजे मुके काव्य आहे असे जे म्हणतात, ते अगदी यथार्थ आहे.

या कवितेचा 'मासिक मनोरंजना'मधील पहिल्या श्लोकाचा पाठ बींनी 'फुलांच्या ओंजळी'त जवळ जवळ पुन्हा नव्याने लिहिला आहे.* एकदा लिहिले की ती दगडावरची रेघ अशी त्यांची काव्यदृष्टी दूषित नव्हती. पहिल्या पाठात 'प्रसादेक्षण', 'सौंदर्य-सौदामिनी', 'कामिनी' इत्यादी श्रृंगार रसातील परिचित शब्द होते. ते काढून टाकल्यामुळे कवितेचे स्वरूप जितके सुंदर तितकेच उदात्त झाले आहे. संस्कृत साहित्यातील संभोग आणि विप्रलंभ शृंगार सारखेच अतिरेकी व उत्तान असतात. शृंगार हा रसांचा राजा आहे. पण त्याच्या आविष्कारात औचित्य व संयम हे गुण हवेत. इंग्रजी साहित्यातील 'लव्ह पोएम्'च्या संपर्काने आधुनिक मराठी कवितेने ते गुण आत्मसात् केले आहेत. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांनी अशा प्रेमकवितांचा अंतर्भाव प्रेयोरसात करावा असे आपले मत दिले आहे.† बींची ही कविता प्रेयोरसात्मक आहे. फुलाला ज्याप्रमाणे सुगंध असतो, त्याचप्रमाणे माणसाला व्यक्तिमत्त्व असते. या कवितेत एका निद्रित रमणीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण आविष्कार आहे. या कवितेत 'प्रेम' आणि 'सौंदर्य' यांच्या जोडीने 'औचित्य' व 'संयम' ह्यांनाही योग्य मान मिळाला आहे. त्यासाठी कवीला 'गंगामाई'ची आणि 'देव-तात्मा नगाधिराज हिमालया'ची आठवण झाली आहे,—

वाहे तो सरिदोघ, जोवरि असे तो भूवरी भूधर
नक्षत्रांसह सूर्यचंद्र असती व्योमात की जोवर;
राहो तोवर ही अशीच विषमा निद्रिस्थ रामा स्थिर
मी राहीन असाच पाहत उभा हे 'चित्र' लोकोत्तर !

'मार्गप्रतीक्षा' ही कविता दिसावयास जरी निसर्गवर्णनपर दिसली, तरी वस्तुतः तिच्यात मानवी मनोभावनांचे प्रतिबिंब आहे. निव्वळ निसर्गवर्णनपर कविता मानवी हृदयास आवाहन करण्यास असमर्थ असते. तिच्या मागे मानवी मन आवश्यक आहे. मनुष्य निसर्गाला आपल्याप्रमाणे एक व्यक्ती मानतो व त्याच्यावर आपल्या भावनांचे, विचारांचे व कल्पनांचे आरोप करतो. सृष्टी सुंदर वाटते याचे कारण तिच्या-कडे पाहण्याची मनुष्याची दृष्टी सौंदर्याने ओतप्रोत असते. ते सौंदर्य साक्षात् निसर्गात नसून मनुष्याच्या चिंतनशील मनात असते.

या कवितेत बींनी एक अभिसारिका निर्माण केली आहे. कलिका आणि भृंग, वल्लरी आणि वृक्ष, सूर्य आणि पश्चिम दिशा व सिंधु आणि वसुधा पर-

---

* मासिक मनोरंजन, आक्टोबर १९११.

† मासिक मनोरंजन, जुलै १९२०.

स्परांच्या सहवाससुखात निमग्न झाली आहेत. परंतु आपल्या सहकाऱ्याची उत्कंठेने मार्गप्रतीक्षा करणारी अभिसारिका मात्र एकटीच बसून आहे. त्या मंगल कालातला तो रागरंगाचा प्रसंग तिच्या दृष्टीपुढून पुढे पुढे जात आहे. परंतु ती मात्र 'एकटी'च बसून आहे. 'एकटीच', 'अशीच' या तिच्या शब्दात आपला अभिसार निष्फळ ठरणार की काय ही भीती व धास्ती आहे. वेळ सूर्यास्ताची आहे. त्यामुळे तिच्या मनाला हळुहळू निराशा काळोख्या रात्रीप्रमाणे ग्रासीत आहे. कविता आटोपसर असल्यामुळे प्रतीक्षा करीत असलेल्या स्त्रीच्या मनाची 'चुटपुट', 'पुटपुट' तिच्यात चरणागणिक उमटली आहे.

'ओढी उत्कट सिंधु मुग्ध-वसुधा-चैलाञ्चला झोंबुनी' या चरणात सागराची अधीरता आणि पृथ्वीची मुग्धता अत्यंत परिणामकारकतेने प्रकट झाली आहे. ही कविता वाचताना 'चाफ्या'ची आणि शेलेच्या 'लव्हस् फिलॉसफी'ची अपरिहार्य आठवण येते.

'चाफा' व 'बुल्बुल्' यांचा अपवाद सोडल्यास बींच्या बहुतेक प्रेमकविता अगेय आहेत. 'प्रमीला' व 'मार्गप्रतीक्षा' या कविता शार्दूलविक्रीडितात आहेत. परंतु सामासिक रचनेमुळे त्यांच्यात ओजाचा स्वाभाविक संचार झाला आहे. प्रसाद, ओज व माधुर्य हे काव्यगुण आहत. प्रेमकाव्यात माधुर्य हवे आणि ओज नको असा काही नियम नाही. हे तिन्ही गुण एकत्र असू शकतात. बींच्या वाणीचा ओढा ओजोगुणाकडे विशेष असल्यामुळे आणि त्यांची समासप्रचूर वृत्तबद्धरचना त्याला पोषक असल्यामुळे त्यांची प्रेमकाव्ये धीरगंभीर आणि रम्योदात्त झाली आहेत. बींचे समकालीन रेंदाळकर व नागेश यांचीही प्रवृत्ती सामासिक रचनेकडे होती.

एखाद्या जुन्या खोडाला आकस्मिक पालवी फुटावी त्याप्रमाणे उतारवयात बींची प्रतिभा पुन्हा पालवली होती. त्यावेळी त्यांना 'प्रीति' आणि 'रूपमुग्धा' या दोन प्रेमकविता स्फुरल्या आहेत. 'प्रीति' ही कविता तात्त्विक आहे. तिच्यातील तत्त्वाचा आविष्कार होताना तिला शेवटी 'उपदेशा'चे स्वरूप आले आहे. प्रीति हा सहजधर्म आहे. पण तिचा मार्ग बिकट आहे. त्यावरून चालताना सहप्रवाशांची मने एकरूप झाली पाहिजेत. एखादी रागिणी श्रुतिमनोहर वाटली, तरी तिची 'गति' जशी कुटिल असते किंवा एखाद्या नागिणीची चाल आकर्षक वाटली, तरी ती जशी विषारी असते तशीच 'प्रीति' असते. तिचे स्वरूप दुहेरी आहे. एक मलीन कामाकुल आहे. दुसरे उषेप्रमाणे मंगल आहे. कवीने शेवटी गृहस्थाश्रमात अथवा देशकार्यात पुरुषार्थ, यश व श्रेय प्राप्त करून देईल, हीच 'प्रीति' करावी असा उपदेश केला आहे.

'रूपमुग्धे'चे स्वरूप आध्यात्मिक आहे. एका रूपमतीला आपले अलौकिक रूपलावण्य पाहण्याची इच्छा झाली. परंतु ते पाहण्यासाठी तिला दुसऱ्याचे म्हणजे 'दर्पणा'चे साहाय्य घ्यावे लागले. तिने दर्पणात आपले रूप पाहिले आणि त्यावरच ती भाळली. आपले अभिराम रूप न्याहळताना तिने जे अंगविक्षेप केले, त्याचे बींनी अतिशय काव्यमय वर्णन केले आहे.—

'तिरस्कार कधि प्रेम रुष्टता, कधि आकुलता, कोप
उमटूनि ते अनुरूप चालतो अंगाचे विक्षेप.
ओष्ठ, भ्रू, कर कधीं मोडिशी, स्थिर कधि
चंचल दृष्टि
क्षणोक्षणी निर्मिशी विलक्षण नूतन अभिनयसृष्टि !
नेत्रांतिल तेजाची कलिका इकडे तिकडे नाचे
जीवभाव एकत्र होउनी त्या त्या ठायीं सांचे'

पण तिचे हावभाव चालू असताना बींनी 'रमणीयते'चे एक तत्त्व सांगितले आहे.—

'करी कल्पना सौंदर्याची सुहास्य जे अव्याज
सुरम्यतेचा तेच चढविते त्या वस्तूवरि साज.'

आणि त्याचे स्पष्टीकरण केले आहे : 'सौंदर्याच्या कल्पनेचे हास्य म्हणजेच रमणीयता. ते ज्या ज्या वस्तूवर पडते, ती ती वस्तू रमणीय दिसते.' 'Beauty is the eye of the beholder' या इंग्रजी वचनात हेच तत्त्व थोडया निराळया रीतीने सांगितले आहे. ती रूपमती आपले रूपलावण्य पाहण्यात दंग होती, तोच—

'फुटे आरसा, स्वप्न उडाले स्पष्ट वाजता 'खट्ट.'
मुक्तांगावर स्खलित पदर घे सावरूनि ती घट्ट !'

अशा रीतीने तिच्या स्वप्नसमाधीचा भंग झाला. बींनी शेवटी तात्पर्य काढले आहे;—'प्रत्यक्ष सौंदर्याचे स्फुरण पाहिले म्हणजे साहित्यातील रसभावादिकांचे प्रदर्शन कुचकामी वाटते. उचित विषयांच्या रसाचे केवळ आस्वादन करता येते. परंतु 'स्वसंवेद्या'च्या आस्वा-

दनाचा प्रसंग आला म्हणजे मात्र वाचा कुंठित होते. ते तिच्या सामर्थ्यापलिकडले आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या ओळीत 'आद्य'तत्त्वाला नमन करताना हा शब्द योजिला आहे.*

अध्यात्म हा बींचा केवळ आवडता विषय नव्हता. त्यांचे आंतर–जीवनच त्या विषयाने व्याप्त होते. त्यांनी आपल्या एका पत्रात लिहिले आहे,—'ध्यानयोगाचा आणि तत्त्वचिंतनाचा अभ्यास फार वर्षांपासून करीत आलो आहे.'‡ तेव्हा 'रूपमुग्धा' अध्यात्मिक अथवा तात्त्विक व्हावी हे साहजिक आहे. 'अध्यात्म' या विषयावरच त्यांची एक स्वतंत्र कविता आहे. 'रूपमुग्धा' अध्यात्मिक असली, तरी तिचे रंगरूप रसाळ आहे. ते साहित्यापासून अलिप्त नाही. तिच्या आरंभाच्या पंक्तियुग्मात 'लीलासागर' व 'लावण्योदक' हे श्लिष्ट शब्द आले आहेत. सागराचा आणि त्यातील लवणाचा संबंध अनादिसिद्ध आहे. लवण जसे त्याच्या पाण्यापासून वेगळे काढता येत नाही तसेच युवतीचे पाणीदार लावण्य तिच्या रूपापासून निराळे करता येत नाही असा त्या शब्दांमध्ये सूचक आशय आहे.

बींना अभिप्रेत असलेल्या 'प्रेमा'ची कल्पना व 'रसा'ची कल्पना 'चाफ्या'त यथार्थतेने व्यक्त झाली आहे. प्रेमाने मन स्वच्छ व शुद्ध होते. ते सुसंस्कृत व कार्यक्षम झाल्याने आत्म्याची उन्नती होते. प्रेमाने मनातील वासना व विकार नाहीसे होतात आणि इतरांविषयी आत्मीयतेची भावना उत्पन्न होते. जिथे प्रेम तिथे सौंदर्य असलेच पाहिजे. किंबहुना सौंदर्य म्हणजेच प्रेम असेही म्हणता येईल. मनात प्रेम असले म्हणजे राग, द्वेष, चिंता, भय, शंका, भ्रम इत्यादी दुष्ट प्रवृत्ती नाहीशा होतात. वस्तूचे यथार्थज्ञान होते. आणि खरा समंजसपणा प्राप्त होतो. प्रेमाने भेदभाव नष्ट होतो. द्वैतबुद्धी लोप पावते. माणसे म्हणजे ब्रह्मस्वरूप आहेत असा प्रत्यय मनात बाणतो. उच्चनीच, श्रेष्ठकनिष्ठ, श्रीमंतगरीब–सर्वच परमेश्वराचा मंगल हेतू तडीस नेण्यास आपआपल्या शक्तीप्रमाणे प्रयत्न करीत आहेत असा साक्षात्कार होतो. हा साक्षात्कार झाला म्हणजे क्षुद्र विकार नष्ट होतात आणि मन ईश्वरात लीन होते. तत्त्वज्ञानाचे हेच ध्येय आहे.

बींनी काही इंग्रजी प्रेमकविता भाषांतराच्या द्वारे मराठीत आणल्या आहेत. 'प्रणयप्रयाण' ही कविता शेलेच्या 'The Flight of Love' या कवितेचे भाषांतर आहे. शेलेच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीने त्याच्या कवितांचा संग्रह काढला, त्यात अठराशेबावीसात त्याला स्फुरलेली ही गीतिका आहे. त्यात हिला मथळा नाही. फक्त Lines म्हणून आरंभीच्या दोन ओळी आहेत. त्या बींनी आपल्या भाषांतरावर दिल्या आहेत. त्यांना हे गीत 'गोल्डन ट्रेझरी'त आढळले असावे. कारण त्या संग्रहात कवितेचे नामकरण आहे. ते बहुधा संपादन करताना पॉलग्रेव्हने दिले असावे.

शेले हा अनेक आधुनिक कवींचा आवडता कवी आहे. गोविंदाग्रजांना तो प्रिय होता. इतका की त्यांनी केशवसुतांना शेलेचा अवतार मानले आहे. बींचाही शेले आवडता होता. कारण एका कवितेत त्यांनी मीरेबरोबर त्याच्या 'स्कायलार्क'चा निर्देश केला आहे.*

बींचे हे भाषांतर प्रथम आगस्ट एकोणिसशेतेराच्या 'मासिक मनोरंजना'त प्रसिद्ध झाले होते. त्याच्या पाठात व 'फुलांच्या ओंजळी'तील पाठात अनेक फेरफार आहेत. याचा अर्थ ते मनाजोगते व्हावे यासाठी बी त्याच्यावरून सफाईचे हात फिरवीत हे उघड आहे.

मूळ शेलेचे गीत अत्युत्कट असून तीव्र निराशेने ते अधिकच करुण झाले आहे,—

'When hearts have once mingled,
  Love first leaves the well–built nest,
The weak one is singled
  To endure what it once possesst.
O Love ! who be wailest
  The frailty of all things here,
Why choose you the frailest
  For your cradle, your home,
      and your bier ?'

---

* ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जयजय स्वसंवेद्या । विश्वरूपा ।।

‡ युगवाणी फेब्रु. ४६. पृ. १३. वा. ना. देशपांडे यांना पत्र.

* 'स्त्री गीतातिल होते ध्वनि ते भाव नये निर्धारा
शेलेचा चंडोल गाय की गिरिधर नागर मीरा.'
'आठवण' फुलांची ओंजळ, पृ. १३५.

बींच्या भाषांतरात पूर्वी 'दुर्बला रात्रितें घाले। सोसाया पूर्वस्मृतिचे' असा एक पाठ होता. तो पुढे त्यांनी 'अवलांतरि वसतें घाले। सोसाया पूर्वस्मृतिचे' असा बदलला आहे. त्यातला 'अबला' शब्द श्लिष्ट असल्यामुळे अर्थ अधिक सूचक झाला आहे. शेलेने आपली प्रथम पत्नी हॅरिट् वेस्टब्रुक हिला घटस्फोट दिला होता आणि मेरी गॉडविन्ला घेऊन तो पळून गेला होता ही घटना त्याच्या चरित्रात प्रसिद्ध आहे. पुढे दोन वर्षांनी प्रथम पत्नी वारल्यावर त्याने मेरी गॉडविन्शी विवाह केला. प्रस्तुत कडवे कदाचित त्याच्या आयुष्यातील या घटनांना उद्देशून असावे. अर्थात् त्याला भरभक्कम असा पुरावा नाही. 'का क्षीण सदन मग रुचलें। सोद्भव, स्थिति, प्रलयाते ?' या बींच्या भाषांतरात इंग्रजी कल्पनेतली सूचकता व सुंदरता अजिबात नाहीत.

इंग्रजी गीताच्या प्रत्येक कडव्यात आठआठ ओळी आहेत. मराठी भाषांतरात त्या कडव्यांचे स्वातंत्र्य व सुटेपण अबाधित राहिलेले नाही. त्यात पुढील कडव्यातला काही भाग अलिकडील कडव्यात आला आहे. त्यामुळे भाषांतराचा अर्थ चटकन लक्षात येत नाही. तो लक्षात येण्यास काही काळ विचार करावा लागतो. शेलेच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेल्या त्याच्या कवितासंग्रहातील कवितांवर त्याची पत्नी मेरी गॉडविन् प्रसंगस्पष्टीकरणार्थ टीपा लिहिणार होती. परंतु ते कार्य तिच्याकडून झाले नाही. त्यामुळे त्याच्या आत्मपर गीतिकाव्यांतील प्रसंगासंबंधी आलोचकांत भिन्नभिन्न मते आढळतात.

शेलेच्या 'प्रणयप्रयाणा'पेक्षा बींनी बायरन्च्या 'She walks in beauty, like the night,' या गीतिकाव्याचे 'मनोहरिणी' हे मराठी रूपांतर केले आहे, ते नावाप्रमाणे खरोखर मनोहर आहे. ते जून १९१४ च्या 'मासिक मनोरंजना'त आहे. ते पहिल्याच लेखनात बींना इतके उत्तम साधले की 'शुभ्रकृष्णवर्णीतील सारी उत्तमता आली' या ओळीतील 'उत्तमता' या शब्दाऐवजी त्यांनी 'फुलांच्या ओंजळी'तील पाठात 'मोहकता' हा मोहक शब्द टाकला. त्यापलिकडे दुसरे कोणतेही फेरफार केले नाहीत. या गीतावर बींची काव्यप्रसंगविषयक टीप आहे. त्यात ते मिसेस विल्मॉटला बायरन्ची बहीण म्हणतात. पण ती त्याच्या चुलत भावाची बायको होती. ती त्यावेळी सुतकात होती. त्यामुळे तिने कृष्णवेष परिधान केला होता. त्यावर असंख्य चमकदार टिकल्या होत्या. त्या वेषात ती बॉलला उपस्थित होती. तिच्या आकर्षक व्यक्तित्वाने बायरन् दिपून गेला, त्याप्रसंगी त्याला हे गीत स्फुरले आहे. त्याची नोंद त्याच्या एका चाहत्याने केली आहे. *

'She walks in beauty' हा बायरन्च्या गीताचा प्रारंभ 'पदन्यास लाव ण्यप्रांती ही करते रमणी' या मराठीकरणात असा काही चप्खल बसला आहे की त्याला इकडे तिकडे होण्यास तसूभरही वाव नाही. 'One shade the more, one ray the less, Had half impair'd the nameless grace' या इंग्रजी ओळींचा 'उणा किरण की अधिक झाक, घर या रूपी पडती अनिर्वाच्य ती संगमशोभा अर्धी तरि जाती' हा मराठी अनुवाद बिनतोड

---

* I was now amidst balls and fooleries and after coming home from masquerades and routs, in the summer of the soverigns, that he dashed off Lara, and on June 12th, that he composed one of his most celebrated short poems. Lady Sitwell, the renowned bluestocking, had sent him a card for party at her home in Seymour Road. Thither he went with Wedderburn Webster and there for the first time met the wife of a second cousin, the beautiful Mrs. Wilmot, who was in mourning and wore a dark dress sewn with sprangles. "When we returned to his rooms in the Albany," Webster explains, "he said little, but desired Fletcher to give him health, then, retired to bed and was (Webster learns afterwards) in a sad state all night." Next morning, however, he wrote the verses that begin with a line so magical that, by comparison the rest of the poem appears to dwindle away into insignificance.

She walks in beauty like night.

From, *Byron – The years of fame* by Peter Quennell, Page 223.

नाही असे कोण म्हणेल ? बायरन्चा नामनिर्देश जर केला नाही, तर हा अनुवाद स्वतंत्र व स्वयंस्फूर्त कविता वाटावी अशा योग्यतेचा आहे. बायरन्ची गीते शेलेच्या गीतांप्रमाणे साजुक नाजुक नाहीत किंवा वर्डस्वर्थच्या गीतांप्रमाणे उदात्त नाहीत. परंतु त्यांच्यांत चटका लावणारे चेटूक आहे आणि त्यांच्या संगीतात भुरळ पाडणारी जादू आहे हे नाकारता येत नाही.

'तू देशी न तुझे' हे प्रेमगीत सर जॉन सकलिंगच्या—

'I pri thee send me back my heart
Since I cannot have thine'

या प्रेमगीताचा मराठी अनुवाद आहे. तोही बींना बेमालूम साधला आहे. त्यावरून इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवरील बींचे प्रभुत्व व्यक्त होते. सकलिंग हा फारसा प्रसिद्ध कवी नाही. तो सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात पहिल्या चार्लस्च्या दरबारात कवी म्हणून मान्यता पावला होता. पण पुढे स्ट्राफोर्डच्या सुटकेबाबत जो कट शिजला, त्यात त्याचा हात आहे असा चार्लस्ला संशय आला. त्यामुळे त्याला पारीसला पळून जावे लागले. तेथे त्याने आत्मघात केला असे म्हणतात.

त्या युगातील दरबारी कवींप्रमाणे सकलिंगचे हे प्रेमगीत कल्पनाकलित आहे. त्यात भावनेच्या उद्रेकापेक्षा बुद्धीचा युक्तिवाद विशेष आहे. दरबारात तेथील स्त्रियांच्या पुढे पुढे करावयाचे, आपल्या चाटूक्तीने त्यांना खुश करावयाचे आणि त्यांना गीत गाऊन रिझवावयाचे हा त्या शतकातला एक रिवाज होता. सकलिंगच्या या गीतात ते सारे हावभाव प्रकट झाले आहेत.

बींचे हे भाषांतर मे १९२३ च्या 'मासिक मनोरंजना'त आहे. त्यात असा पाठ होता:—

'का एके हृदयात वास करणे, चित्तद्वयें दाटुनी ?
दोघांची मिळणी जरी न घडणे एकत्र एकासनी ?'

तो पाठ त्यांनी 'फुलांच्या ओंजळी'त असा बदलला आहे;—

'एका संकुचितांतरी उगिच का चित्तद्वया दाटणी ?
दोघांची मिळणी जरी न घडते एकांत एकासनीं ?

यामुळे तो अर्थाच्या दृष्टीने तावून सुलाखून उजळून निघाला आहे.

पॉलग्रेव्हने आपल्या 'गोल्डन ट्रेझरीत'त या प्रेमगीताला स्थान दिलेले नाही. हे प्रेमगीत मॅकेच्या 'ए थाऊजंट अँड वन् जेम्स्' या संग्रहात आढळते. तेव्हा बींनी बहुधा ते तेथून घेतले असावे.

'Yet I now think on't, let it lie;
To find it were in vain;
For thou'st a thief in either eye
Wohld steal it back again.

या चार इंग्रजी ओळींतील कल्पना बींनी दोन मराठी ओळीत आणण्यात आपले भाषाप्रभुत्व व संक्षेपकौशल्य व्यक्त केले आहे;—

'छे ! ते ठेव तसेच. नाहक नको तो शीण का की, हटे
माझे नेतिल चित्त चोरुनि पुन्हा डोळे तुझे चोरटे'

सकलिंगच्या या गीताच्या आधारे 'हित-चितकां'नी 'माझे धाडुनि चित्त दे' ही कविता लिहिली होती आणि केशवसुतांनी तिला 'माझे धाडुनि चित्त दे' हे उत्तर दिले होते. या दोन्ही कविता 'समग्र केशवसुता'त संगृहित केल्या आहेत.

'प्रेम' या विषयावर बींच्या या बारा तेरा कविता आहेत. प्रेम हा विषय त्यांना प्रिय होता हे 'प्रेम' या त्यांच्या तात्त्विक काव्यावरून उघड आहे. पण त्या विषयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अलौकिक होती. कायिक प्रेमापेक्षा अध्यात्मिक प्रेमावर त्यांचा भर विशेष होता. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी 'स्वैरगीत' ही कविता रचली आहे. तीत निसर्ग, स्वातंत्र्य, देशपूजन, पराक्रम इत्यादी विषयांचा गौरव आहे; आणि 'प्रेमा'ला इशारा आहे;—

'प्रणयपंकजासवे खेळणे आता तरि तू पुरे करी'

बींच्या 'प्रणयपत्रिके'स मधुकरांचे 'उत्तर'

('करमणूक'च्या ३–१०–९१ च्या अंकात 'प्रणयपत्रिका' या नावाची सुरस कविता छापून आली होती. तिला उत्तर म्हणून खालील कविता आहे.)

(मालिनी)

प्रणययुत तुझी ती पत्रिका आजि आली
कुशल तव कळोनी काळजी दूर झाली
खचित तुजसि सांगे वाचुनी पत्रिकेला
अतिशयितचि झाला हर्ष माझ्या मनाला १

कितिक तरि जहाले पाठ या पत्रिकेचे
तदपि मनि पुन्हा ये एकदा वाचण्याचे
प्रियतम दयिते गे, पाहुनी पत्रिकेला
क्षण मज गमले की भेटलो आजि तुला. २

बहुत दिवस झाले, मान्य आहे मलाही
तुजजवळ न गेले वृत्त येथून काही
पळभर परि तूझी विस्मृती नाहि झाली
कधिहि न नयनांच्या दूर ती मूर्ति गेली. ३

तुजसि बहुत माझा राग आला असेल
सुतनु ! पण तुझे ते जाणतो सर्व शील
करशिल मजला गे ! तू क्षमा खातरीने
प्रियकर विनवीतो हा तुला आर्जवाने. ४

उपकृति परि केली या विलंबे मदीय
अनुपम मज आले पत्र ऐसे त्वदीय
बघुनि बघुनि ज्या मी मानितो धन्य साच
गृहिणि जर मिळावी ती मिळावी अशीच. ५

सखि इकडिल सारे क्षेम जाणोनि आता
अगदि न दुखवावे प्रेमळा स्वीय चित्ता
अमित विरहतापे म्लान जीं कोमलांगे
मुळिच न सखि त्यांना क्लेश द्यावा असा गे ! ६

विरह म्हणुनि होता कोणता तो पदार्थ
विदित न अप्रणामा आजपर्यंत सार्थ
जरि उभयजनी तो सारिखा आजि आला
प्रियसखि तरी आता सेर्ष साहू तयाला. ७

करमत तुज नाही, नाहि तैसे मलाही
रजनि न सुख देई ती तुलाही मलाही
नयनि उभयतांचे अश्रु ते वाहताती
विषय अरुचि दोघां सर्वही भासताती. ८

जरि दिवस कसाही कामकाजात गेला
तरि न पण दिनांनी तोष दोघांजणांना
परिचित उभयांच्या केलि त्या आठवीता
अधिकचि मग होई दुःख, कांते, स्वचित्ता. ९

स्मरत न तुजला तो काय आता सुवेळ ?
बसत अपण होतो आटपोनी फराळ
पठन करित काव्यें सत्कवींचीं रसाळें
अपरिमित न झाला काय आनंद, बाळे ? १०

सुतनु ! कितिक वेळा सांग दोघे बसोनी
सुरस पद मिळोनी गाइले सुस्वरांनी
करित अमित गोष्टी, गायने गात गात
न कळत कितीदा तो सांग झाली प्रभात. ११

विरह विलपिते ही वाचता वाचताना
वद, सखि, किति झाले दुःख दोघांजणांना
जवळ असुनियांही एकमेकां पहावें
भरुनि उभयतांचे अश्रुंनी नेत्र यावे. १२

लगबग करुनीया वाचना आठवोनी
'अशियिल परिरंभें' झोप घ्यावी मिळोनी
मिउनि मग किती त्या रात्रिचे त्वा उठावे
मजसि अधिक याढालिंगने तोषवावे. १३

तळमळत निशा ती जाय सारीच आता
पळभर तरि व्हावा थोडका तोष चित्ता,
लिहिन तुंच म्हणावे, भेटण्या पत्रयोगे,
अदय विधि अम्होही भेट होऊ न दे ये. १४

टपटपटप अश्रू वाहती, लेखणीही
गळुनि, मुळि लिहोंमे तेघवा होत नाही
सतनु ! अमित वेळा जाहले जाण ऐसे
लवकर मग तूंते पत्र पोचेल कैसे ? १५

पुनरपि तुज सांगे,—सोडुनी काळजीला
प्रकृतिस जपुनिया वाग, तैसे मनाला
कधिहि न भलत्या तूं कल्पना घेऊ देणे
मजविषयि; विनंती, पत्र वेळी लिहोणे. १६

जबलपूर. 'मधुकर'

(प्रकाशन. 'करमणूक' २५ आगष्ट १८९४)

एलकुंचवारांच्या एकांकिका

—सदाशिव त्र्यंबक कुल्ली

मराठी एकांकिकेला आपल्या पृथगात्मतेची, आपल्या अंगच्या सुप्त गुणांची, सामर्थ्याची जाणीव फार उशीरा झाली. एकांकिका म्हणजे तासाभरात संपणारे 'लहान नाटक' असा समज होता. तिला फार्साचे स्वरूप आले होते. एकांकिका किती उत्कट, गंभीर होऊ शकते आणि भेदक जीवनदर्शन घडविण्याचे तिच्या अंगी केवढे सामर्थ्य आहे; काही अर्थपूर्ण क्षण ती किती अचुकपणे टिपू शकते हे आपल्याला तेंडुलकरांच्या 'रात्र आणि इतर एकांकिका' वाचल्यानंतर कळले.

आपल्या मोजक्याच परंतु दर्जेदार एकांकिकांनी हे दालन समृद्ध करणाऱ्या लेखकांत श्री. महेश एलकुंचवार यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांच्या एकांकिकांचा परिचय करून देण्याचा हा प्रयत्न.

'सुलतान' ही त्यांची पहिलीच एकांकिका. (प्रकाशन 'सत्यकथा' फेब्रुवारी १९७०). ती प्रतीकात्मक आहे. 'माणसातला पशूच अखेर त्याचा बळी घेतो. स्वभावतः माणसातले पशुत्व त्याला उच्च मूल्यांच्या बुरख्याखाली पण अंतर्यामी स्वार्थाभोवती घुटमळत ठेवते.' (एकांकिका वाटचाल : सं. भिडे, कुळकर्णी, केळकर) असे या एकांकिकेबाबत म्हटले गेले. ते फारसे बरोबर नाही असे मला वाटते. माणसातील पशुत्वाचे दर्शन हा 'सुलतान'चा विषय नाही. तो 'काळे बेट लाल बत्ती'चा विषय आहे. वरील संपादकांचाच आशय बरोबर समजून श्री. प्रभाकर पाध्ये यांनी 'सुलतान'वर जे आक्षेप घेतले तेही बरोबर नाहीत (केसरी २४ मे).

कुठल्या एका क्षणी राजशेखरला जीवनाच्या भयाण पोकळीचे दर्शन होते. ह्या धास्तीने तो मनःशांती गमावून बसतो. डॉक्टर ही पोकळी कुटुंब, पत्नी वगैरेंनी भरून काढू पाहतात. स्वामी अध्यात्म, ब्रह्म आत्मा वगैरे कल्पनांनी, तर ज्यूली प्रेम वगैरे शब्दांनी आणि राजशेखर अतिरिक्त भोगविलासात स्वतःला बुडवून, मॉर्फिनच्या नशेत ही पोकळी, आयुष्यातली निरर्थकता विसरू पाहतो. स्वतःपासून दूर पळू पाहतो आणि ते साधत नाही म्हणून अस्वस्थतेच्या भयाच्या 'सुलताना'ला (आणि स्वतःलाही) गोळी घालतो.

'झुंबर'मध्ये (प्र. 'सत्यकथा' फे. १९६८) नरेशला हिल्टन पारितोषिक मिळाल्याबद्दल आणि मीराशी एंगेजमेंट ठरल्याबद्दल पार्टीची तयारी चालू आहे. रंगीबेरंगी शाखांचे, सर्वांगाने फुलून आलेले झुंबर दिवाणखान्यात चढविल्या जात आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिक जमा झाले आहेत. दादा वरील गोष्टी अनाउन्स करतात. अभिनंदनाचा, स्तुतीचा वर्षाव नरेशवर होत असतानाच आपण ॲवार्ड नाकारल्याचं आणि लग्न मोडल्याचं तो जाहीर करतो. यशाच्या रंगांनी रंगविलेलं संपन्न, यशस्वी जीवनाचं 'झुंबर' स्वतःच्याच हातांनी फोडून टाकतो, कारण त्याला वाटतं 'अवार्ड' मिळून काय झालं ? कुठलाच प्रश्न सुटला नाही...सगळंच मिळून काहीच मिळणार नसेल तर काही घ्यायचं कशाला ?...सगळं मिळून शेवटी हाती काय ? आयुष्याचं टरफल नुसतं काही मिळवायचं कशाला ? काही मिळायचं नसेल तर जगायचं कशाला ? जन्मायचं कशाला ? ...का ? पुढं काय ?... काय ?... काय ?...

'एका म्हाताऱ्याचा खून' आणि 'एक ओसाड गाव' (प्रकाशन अनुक्रमे 'सत्यकथा' जून ६८; जाने. ६९) ह्या एकांकिका खरे सांगायचे म्हणजे मला समजल्या नाहीत. कदाचित आमचे सर डॉ. द. भि. कुळकर्णी म्हणतात त्याप्रमाणे 'याचे कारण त्यांतील

प्रश्न तुम्हाला पडलेले नाहीत म्हणून तुम्हाला त्या समजल्या नाहीत.' म्हणून त्यांचा तार्किक अन्वय न लावता माझा भावरूप प्रत्ययच सांगतो. ह्या दोन्ही एकांकिका वाचताना मला विलक्षण कंटाळवाणेपणाची, ओसाडपणाची प्रतीती आली. जणू अफाट निर्जन माळरानावर कधी न संपणारा प्रवास सुरू आहे. आणि मला एकदम फार एकटं एकटं थकल्यासारखं वाटायला लागलं. याचा अर्थ त्या बोअर आहेत असा नाही. पण त्यांच्या मागचा लेखकाचा जो सूर आहे, टोन आहे तो कंटाळवाणेपणाचा आहे. हा कंटाळवाणेपणा लेखकाने रखरखीत माळरानावरील प्रवासातून आणि 'एक ओसाड गाव' मधील स्त्रीच्या एक सुलट एक उलट टाके घालीत शाल विणण्याच्या निरर्थक क्रियेतून सूचित केला आहे. कदाचित जीवनच असं आहे असे लेखकाला सांगायचे असावे.

'होळी'मधे (प्र. 'मौज' दिवाळी ६९) आजच्या दिशाहीन, भांबावलेल्या आणि भडकलेल्या विद्यार्थीजगताचे फार प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे. होस्टेल आणि कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या लकबी, विचार करण्याची तऱ्हा, बोलण्याचे विषय त्यांचे खास वाक्प्रचार हे सारे लेखकाने बारकाईने टिपले आहे. गंमत म्हणजे या संपूर्ण एकांकिकेतून एका ताणल्या गेलेल्या, भडकू पाहणाऱ्या स्फोटक वातावरणाची निर्मिती होते आणि त्यातून 'होळी'ची प्रतिमा साकार होते. आनंदाच्या आत्महत्येने जणू त्यावर ठिणगी पडते. स्फोट होतो. आणि त्यानंतरची ती भयानक शांतता.

'कैफीयत' (प्र. 'सत्यकथा' मार्च ७०) ही राजेश्वर या अनौरसाची; जगाविरुद्ध नव्हे. कैफीयत-मधे लेखकाने अकुलीन संततीचा प्रश्न हाताळलेला नाही, तर साऱ्याच प्रतिभावंतांची ही जगाविरुद्धची कैफीयत आहे. राजेश्वर या अतीव संवेदनाक्षम कला-वंताला कुणीच समजावून घेऊ शकत नाही. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याचा जन्म झाला. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला जगत ठेवून आगाऊ मानवता दाखविणाऱ्या कोरके गुरुजींचा म्हणूनच तो द्वेष करतो. त्या बेभान, झिंगलेल्या वेडसरपणाची झाक असलेल्या कलावंतांवर कोणतीच स्त्री प्रेमाची पाखर घालू शकत नाही. कुणाला तो क्रूर तर कुणाला आत्मकेंद्रित वाटतो. तर त्याची पत्नी त्याच्यातील प्रचंड अदृश्य शक्तीपुढे पांगळी होते, घाबरते, सर्वस्वाने कधीच त्याची होत नाही. राजेश्वर अधिकच चिडतो. झिंगतो. आणि जन्मल्यानंतरच्या दुःखाची परंपरा थांबावी म्हणून ज्या कात्रीनं आपली नाळ कापली त्याच कात्रीचे घाव आपल्यावर कुणी का नाही घातले, असे म्हणून त्या कात्रीने स्वतःच्या मुलालाच भोसकतो. अटळपणे वाहणाऱ्या दुःखाचा, वंचनेचा स्रोत थांबवितो.

अशा अवघ्या सहाच एकांकिका ! पण वाचल्या-नंतर मनोविश्वात विचारांची वलये निर्माण कर-णाऱ्या ! अनेक प्रश्न उभे करणाऱ्या ! त्या वाचताना एक गोष्ट सतत जाणवते—ती म्हणजे त्या लेखकाची चिंतनशीलता. या एकांकिकांचा गाभा असा वैचारि-कतेचा आहे आणि तो फार सकस आहे. 'होळी'चा अपवाद सोडल्यास अनुभवाच्या इतर अंगांपेक्षा विचा-राचे अंग अधिक कणखर वाटते. कारण लेखकाच्या मानसपुत्रांसमोर जीवनविषयक अतिशय मूलभूत प्रश्न उभे आहेत. त्या प्रश्नांनीच त्यांच्या जीवनाची दिशा ठरविली आहे. 'सुलतान'मधील राजशेखरला वाटते 'प्रत्येक क्षण मी होतो. क्षण संपतो मी मरतो. दुसरा क्षण येतो पुन्हा मी जन्मतो. ह्याचा त्याच्याशी काही संबंध नाही. खरोखरच मेलो तर ? मृत्यूनंतर क्षण नसतील किंवा एकच प्रचंड क्षण असेल का ? मग मी नसेन किंवा एकच प्रचंड मी असेन. सलग. एकसंध. अन्डिस्टर्ब्ड. मला मृत्यू हवा. हवा, हवाच.' तर 'झुंबर'मधील नरेशला 'जन्मायचं कशाला ? ते आपल्या हाती नाही. खरं तर काहीच आपल्या हाती नाही....विश्वानं जन्म दिला आपल्याला...... नि विश्वाची वाचा गेली... ..हे तरी कशाला जन्मलं ? सृजनाचा हा अनावश्यक अनावर वेग......यातून मला सुटका हवी आहे. सुटायचं आहे.' आणि म्हणून जीवनातील सुख—दुःख, यशापयशाकडे तो संन्यस्त वृत्तीनेच पाहतो.

आणखी एक म्हणजे एका विशिष्ट जीवनविषयक दृष्टिकोनाचा सूर यांतून पुन्हा पुन्हा ऐकायला येतो. विश्व प्रयोजनहीन, हेतुहीन आहे. मानवी अस्तित्व प्रयोजनहीन आहे. विश्व असहाय आहे. मानवी अस्तित्वही असहाय आशयहीन आहे. सिंदबादच्या गोष्टीतील त्या कुबड्याप्रमाणे आयुष्य आपल्या पाठं-गुळीला विळखा देऊन बसले आहे. ते विलक्षण कंटाळवाणे आणि टरफलासारखे निरर्थक आहे. वगैरे वगैरे.

(एलकुंचवारांच्या 'रुद्रवर्षा' आणि 'लांडगे'मधील फिलॉसफी अशीच आहे का ?) अर्थात एखाद्या लेखकाच्या लेखनातून असे सुसंगत तत्त्वज्ञान शोधणे बरोबर नाही आणि आस्वादाच्या संदर्भात त्याची आवश्यकताही नाही. पण या विशिष्ट जीवनदृष्टीमुळे होते काय की या एकांकिका जीवनाच्या संवेदनात्मक रूपावरून लगेच प्रश्नात्मक, समस्यात्मक रूपाकडे झेपावतात. साहजिकच त्या प्रतीकात्मक होतात. जोपर्यंत ही प्रतीके अत्यंत तरल असतात, अर्थपूर्ण असतात आणि जीवनदर्शन तेथे साध्य असते तेव्हा 'सुलतान', 'झुंबर', 'कैफीयत' ह्या समर्थ प्रतीकात्मक एकांकिका निर्माण होतात. पण जेव्हा विशिष्ट तत्त्वज्ञान साध्य बनते, लेखक प्रतीकाच्या आहारी जातो आणि जीवनदर्शनाला गौणत्व येते त्या एकांकिकेतील तरलता लोपून ती स्थूल, ढोबळ बनते. तिची आवाहनक्षमता शबल होते. उदा. 'एक ओसाड गाव.' मग त्यातील व्यक्ती दिलीप चित्रे यांच्या 'ऑर्फीयस' कथासंग्रहातील व्यक्तींप्रमाणे केवळ एका विशिष्ट तत्त्वज्ञानाची 'वाहक' बनतात. त्यांना साधनाचे स्वरूप येते. ती जिवंत, हाडामासाची न वाटता विकृतपणे रंगविलेली वाटतात.

असा एखादा अपवाद वगळता एलकुंचवारांचे व्यक्तिचित्रण फार रेखीव असते. 'होळी'मधील प्रत्येक पात्राची रेषान्रेषा त्यांनी स्पष्ट केली आहे.

'सुलतान' आणि 'झुंबर'मधील प्रतीकांचा वापर चांगला केला आहे. 'एका म्हाताऱ्याचा खून'-मधील शेवट परिणामकारक आहे. तर 'कैफीयत'ची भास आणि वास्तव या पातळ्यांवर केलेली गुंफण नावीन्यपूर्ण आहे. (कैफीयतमधील राजेश्वरचे शेवटचे स्वगत वाचताना मला वसंत आबाजी डहाके यांची 'दूरस्थ शहरात'सारखी एखादी कविताच वाचीत असल्यासारखे वाटले. विलक्षण काव्यात्म आणि प्रभावी स्वगत आहे ते !)

आपल्या सहाच एकांकिकांनी एलकुंचवारांनी वाचकांच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत. त्यांच्या पुढील एकांकिकांची (आणि अप्रकाशित नाटकांची) त्यांचे वाचक मोठ्या उत्कंठेने वाट पाहताहेत.

गणेशपुराण प्रारंभः

अध्याय पहिला

संपादक—डॉ. अ. ना. देशपांडे

नमन आणि गणेशपुराणमाहात्म्यकथन

श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।।
श्रीगुरुमातापितृभ्यो नमः ।।

हेरंबगौरव

ॐ नमोजी आत्मया श्रीविनायका ।
निजबोधविश्रामदायका ।
हृत्पद्मीं रहिवास का । भक्तकैवल्य धामा ।।१।।

पूर्णपुरुषा पूर्णातीता । परात्परा श्रीएकदंता ।
'यतोवाचा निवर्तता' । हेरंब हे नाम तुझें ।।२।।

अलक्ष्या शून्यातीता । अजा नित्या शाश्वता ।
अव्यक्त नाम पावता । होशी निर्गुण ब्रह्म तूं ।।३।।

अक्षर ब्रह्म महामाया । निजात्म ज्योति मोरया ।
अहंकृति पावलिया लया । अध्यात्मबीजा वेदगर्भा ।।४।।

सोहंकारें तन्माया । कैसी आली उपाया ।
त्रिगुणस्थिति करुनियां । त्रिपदीं विस्तारली ।।५।।

तेथूनिया क्षर झाली । प्रकृति नाम पावली ।
मूळत्वें हे राहिली । निरालंबी चतुर्थपदीं ।।६।।

ऐसा तूं निराकार । स्वात्मसुखविघ्नहर ।
वक्रतुंड लंबोदर । नाना सूत्रें खेळवशी ।।७।।

ऐसिया तुज नमो सर्वेशा । परशुधरा श्रीगणेशा ।
मज देईं मतिप्रकाशा । तुझी कीर्ति वदावया ।।८।।

नमन ओंकारवदना । उमामहेशाचिया नंदना
भक्तजनप्रीतिपालना । गजानना स्वामिया ।।९।।

तुझें केलिया स्मरण । तुटे भवपाशबंधन ।
माझें प्रवर्तलें मन । तें सिद्धी पाववीजे ।।१०।।

ऐसा नमिला गणनाथ । तेणें मस्तकीं ठेविला हस्त ।
आरंभिला जो ग्रंथ । तो सिद्धी पाववितो ।।११।।

ऐसी स्तुति करितां वचनीं । प्रसन्न झाला चिंतामणी ।
मजलागीं स्मृति देउनी । आपुली कीर्ति वदविली ।।१२।।

जैसा दिव्यापुढें अंधःकार । राहो न पवे क्षणभर ।
तैसा ठेवितां अभयकर । गुरुगणेशें मस्तकीं ।।१३।।

राव झालों असूनि पामर । ऐसा भजनमहिमा विचित्र ।
आपुलें आख्यान मोरेश्वर । वदवीतसे दयानिधि ।।१४।।

आतां नमूं हंसवाहिनी । जे शारदा भवानी ।
ते नमिली ब्रह्मनंदिनी । अभयदानीं उदित जो ।।१५।।

जनार्दनस्वामींना नमन

आतां नमूं श्रीसद्गुरु । जो भवसिंधुचें तारूं ।
उतरीतसे पैलपारु । तो जनार्दन स्वामिया ।।१६।।

त्या जनार्दनाचे कृपें करून । लाधलें अभयवरदान ।
वदविता झाला निरोपण । कलमाननाचें ।।१७।।

प्राकृत वाणी वदवी जनार्दन । मजमाजीं गेलें मी तूंपण ।
गणेशपुराण सोहंनिधान । वदविता झाला
तोचि तो ।।१८।।

साधुसंतांना नमन

आतां नमूं साधुसंतां । श्रेष्ठानुभाव महंतां
सांभाळिती न्यून पदार्थां । सदा आनंद भरित ते ।।१९।।

श्रोत्यांस विनंती

आतां विनंति श्रोतियांसी । स्थिर करोनियां मनासी ।
ऐका गणेश आख्यानासी । जें व्यास ऋषी
वदले तें ।।२०।।

वेणू वाजे रसाळ कळा । परि वाजविता तो वेगळा ।
तैसी परी लंबोदरकळा । स्वयें वदविता
तोचि होय ।।२१।।

अनुक्रमणिका

जैसीं गौतमीचीं तटाकें दोन्हीं । मध्यें गंगामृतजीवनी ।
तैसीं मयूरेश्वर जननी । संस्कृत प्राकृत वदवीतसे ।।२२।।

संस्कृत नेणती मूढजन । प्राकृत काढिलें अमृतपान ।
येथें श्रोतीं व्हावें सावधान । गणेशाख्यान ऐकीजे ।।२३।।

भवमोचन करणारे पुराण

ऐका गणेशपुराण कीर्ति । जेणे भवार्णवाची होय शांती ।
आणिक उपमे वर्णितां श्रुति । त्यांही स्थीर राहिल्या ।।२४।।

वर्णिता हा कथासागर । गणेशमहिमा अगोचर ।
जैसा नक्षत्रांमाजी पूर्ण चंद्र । तेंवि श्रेष्ठ सकळांसी ।।२५।।

जरी वर्णू याचा महिमा । वेद म्हणती अगम्य सीमा ।
हेरंबश्रवणें मोक्षधामा । पतितपावन जनासी ।।२६।।

वर्णितां पाताळ भूधर । दोन जिव्हा जाहला फणींद्र ।
गणेशमहिमासागर । वर्णू न शके शेषहीं ।।२७।।

सकळ मंथून शास्त्रांस । चहूं वेदांचा सारांश ।
वर्णाविया महिमेस । काढिलें श्रीव्यासें ।।२८।।

जैसें शतकोटिमाजीं सार । निवडून काढिलें श्रीशंकर ।
तैसें व्यासें तरावया दुस्तर । काढिलें रत्न हें ।।२९।।

यालागीं श्रोते सावधान । ऐका श्रीगणेशाचें आख्यान ।
जेणें होय भवमोचन । तें हें श्रवण करावें ।।३०।।

वांछा धराल चित्तीं । भोगावया मुक्ति ।
श्रवणीं घाला कीर्ति । दृढ चित्तीं गणेशासी ।।३१।।

आणिक देतां उपमेसी । जिव्हा झडेल पतनेसी ।
हा वेदाचे मूळ बीजासी । सारांश निवडिला ।।३२।।

इतर कथेहून गोड । सर्व सुखांचा सुरवाड ।
श्रवणमात्रें पुरे कोड । होईल वक्रतुंड नांवें ।।३३।।

नरदेहाचि सार्थकता । सेवा श्रीगणेशामृता ।
जेणें नासे भवव्यथा । या भवार्णवाची ।।३४।।

जो निर्गुण निराकार । ॐ मित्येकाक्षर ।
तो हा देव लंबोदर । महिमा पार न कळेचि ।।३५।।

आतां शोधून अंतःकरण । स्थीर करा तुमचें मन ।
तुम्ही करा पुराणश्रवण । जेणें मोचन जन्मासी ।।३६।।

हें सकळामाजीं वरिष्ठ । पुराणामाजीं श्रेष्ठ ।
श्रवणमात्रें मोक्ष पायवाट । पतितजनांसीं ।।३७।।

हे तव कथा पतितपावनी । अमृत रसाची खाणी ।
वदली जें व्यास वाणी । सकळांसी तारावया ।।३८।।

पुराण नव्हे, ब्रह्मनिरूपण आहे

हें नव्हे हो पुराण । केवळ ब्रह्मनिरोपण ।
वेदगुह्य मधून । काढिलें बीज हें ।।३९।।

थिल्लराची उपमा समुद्रासी । देतां दोषांच्या होती राशी ।
जो निंदी गणेशपुराणासि । तो महादोषी जाणावा ।।४०।।

त्रिभुवनामाजीं सार । तरावया भवपार ।
वदला व्यास तो चतुर । थोर उपकार तयाचा ।।४१।।

सकल केलें परिमित । परि न कळे याचा अंत ।
गणेश नाम हें वदतां निश्चित । भवमोचन होतसे ।।४२।।

जितुकें दृश्य तितुका नाश । शाश्वत एक श्रीगणेश ।
जो सकळांचा होय ईश । न कळे पार तयाचा ।।४३।।

चौऱ्यांशीं लक्षांचे प्रांतीं । मानवजन्माची प्राप्ती ।
अभागी नर तो चित्तीं । मंगळमूर्ति स्मरेना ।।४४।।

यालागीं सारांश विचार । तुम्हां सांगतो वारंवार ।
तरावया भवपार । मोक्ष देईल पैं हा ।।४५।।

मिथ्या म्हणतां येरासी । राम वदला रामायणासी ।
ते शोधिल्या वेगळ्या शब्दार्थासी । ठेविलें न पाहिजे ।।४६।।

पूर्वेचा उगवे पश्चिमेसी । एकवेळ घडे परियेसी ।
परि गणेश पुराणासी । मिथ्या भाषण न बोलावें ।।४७।।

गणेशपुराणाला मिथ्या भाषण म्हणू नये

आठयायशीं सहस्र ऋषी । त्यांचिया केल्या वधासी ।
तो दोष निंदितां गणेशपुराणासी । श्रुतीकारही घडेल ।।४८।।

म्हणोनि सावध होऊन । टाकी देहाभिमान ।
शुद्ध करूनी अंतःकरण । शोधो आत्मप्रचीतिये ।।४९।।

" चतुर्युगसहस्राणि दिनमेकं पितामह " ।।

ब्रह्मयाच्या शतवरुषांसी । भरल्या क्षय होय यासी ।
शाश्वतरुपी हेरंबासी । श्रुतिशास्त्रें गर्जती ।।५०।।

हें नव्हे रे पुराण । केवळ अनिर्वाच्य जाण ।
स्थिरावला नारायण । न कळे महिमान जयाचें ।।५१।।

हें अविनाश कैवल्यपद । श्रवणमात्रें छेदी भवबंध ।
मोक्षसुखाचा स्वानंद । ऐका प्रबंध वेदगुह्य ॥५२॥

पेठें पाठविलें खोटें नाणें । आंगिकारिती ना महाजन ।
तेंवि हरिभक्तांचे मुखीं अपशब्द पण । सहसाही न यावें ॥५३॥

हरिहरांचा गुह्यार्थ । ब्रह्मादिक अनुवादत ।
अंतकाळी तरी कळत । जें निजबीज मुळीचें ॥५४॥

यालागीं हेंचि साधन । नरदेह आलिया पावन ।
हें मूळाक्षर बीज जाण । ओंकारवदन गणेश ॥५५॥

या ओंकार शब्दासीं । ब्रह्मपणें यासी ।
अनुमान धराल मानसीं । तो परमदोषी चांडाळ ॥५६॥

त्याचें पाहों नये मुख । ज्याचे मुखीं नसे विनायक ।
त्यापाशीं महापातक । तिष्ठतसे सर्वदां ॥५७॥

जैसें लोह माती खाय । कार्या नये व्यर्थ जाय ।
तैसें नरदेहासि येऊन होय । गणेशमहिमाश्रवणेंविण ॥५८॥

गणेशपूजेवाचून योगसाधन व्यर्थ

नलगे अष्टांगयोगसाधन । करिती व्यर्थ धूम्रपान ।
गणेशपूजेवांचून । नये उपयोगासी कोणीही ॥५९॥

वैकुंठासि होय एकवेळ नाश । ब्रह्मयाचे शतवर्षसहस्रांश ।
न तुटे मोहप्रपंचपाश । गणेशमहिमावाचोनी ॥६०॥

जैसें केलें समुद्रमंथन । काढिलीं चवदा रत्नें जाण ।
तैसें हरिहरहृदयें मथून । काढिलें निधान वक्रतुंड ॥६१॥

साक्षी पाहाल जरी यासी । वेदांत पाहिजे मीमांसी ।
वदला चतुर्मुख परीयेसी । तोचि सारांश गजानन ॥६२॥

आम्ही जाणूनि आत्मप्रचीती । साक्षी आली गुरुआत्मस्थिति ।
प्रगट बोलती वेदांतश्रुती । जे मंगळमूर्ति परब्रह्म ॥६३॥

जो सुमंगळ निजधाम । ज्याच्या नामें हरती श्रम ।
दासी होऊन चतुर्विध काम । गणेश नामें तिष्ठती ॥६४॥

जरि तुम्हां तरणें आवश्यक । हृदयीं स्मरा हा विनायक ।
जेणें पुरती कामना अनेक । तो हा देव गजानन ॥६५॥

अगाध अद्‌भुत याची कीर्ती । जे प्रीतीने श्रवणीं घालितीं ।
त्यांचे सदनीं मंगळमूर्ती । अहर्नीशीं वसतसे ॥६६॥

रत्नें टाकुनि खडीया । भ्रमोनि नेणती मोरया ।
जेणें तुटे मूळमाया । पामरें नोळखती ॥६७॥

दुर्जनांस गणेशमहिमा कसा पटणार ?

रत्न बांधिलें गर्दभासी । परिस सापडला अंधासी ।
तैसें दुर्जनापुढें गणेश महिमेसी । वर्णिता केवि जाणे ॥६८॥

मुक्यापुढें वेदन्यासा । सांगतां काय बिबे ठसा ।
विषयलंपट सुख विलासा । काय पदवी भोगूं जाणे ॥६९॥

हा महिमा साधुवांचून । येरां गोडी नये पूर्ण ।
तैसें हें गणेशकीर्तन श्रवण । मूर्ख जना काय लभ्य ॥७०॥

जैसी मक्षी मधुलंपटासी । जीव गेलीया न सोडी गोडीसी ।
संत न सोडिती तैसी । गणेशमहिमेसी जाणती ॥७१॥

गणेशकीर्तीचा महिमा । अगम्य अगोचर सीमा ।
निजसुख आणी विश्रामा । श्रवणीं घालीजे ॥७२॥

निंदकांना आवाहन

अहो निंदकहो तुम्ही ऐका । उणीव येईल यमलोका ।
तुमचें पूर्वसंचित असे जें का । अवश्य निंदा करावी ॥७३॥

भवव्या वसिलिया मुक्तिपेठा । वोस पडे यम चोहटा ।
अवश्य करा निंदा वटवटा । तुमचेनि चोखट मी होय ॥७४॥

जैसा रजक मलिन वस्त्रासी । शुभ्रता आणी लाऊनि कष्टासी ।
कष्ट न लागता माझ्या पापासी । तुम्ही शुद्धता करितसां ॥७५॥

आतां निंदकासी नमस्कार । क्षणेक मन करा स्थीर ।
ऐका गणेशपुराण पवित्र । मग निंदा अखंड करिजें ॥७६॥

जैसें मुळीचें कनक । त्यापासून अलंकार अनेक ।
तैसें हें मुळीचें ब्रह्म येक । आदि देव मोरेश्वर ॥७७॥

येथून अमृतकथा । भवरोग औषधी पदार्था ।
श्रवणीं घाला स्वार्था । गणेशमहिमास्तवनासी ॥७८॥

मी तरी वर्णावया रंक । जे अनिर्वाच्य पूर्ण ब्रह्म येक ।
मौन राहिले वेदादिक । तेथें वर्णुं केंवि शके ॥७९॥

पूर्ण परमात्मा सनातन । पूर्ण ब्रह्म हा गजानन ।
मुळीं पाहतां नामरूपालागून । दोहीं ठायीं अदृश्य हा ॥८०॥

जें सोहं शून्याकार । जयाचे सर्व गुण अवतार ।
इच्छाखेळाचे तरंग निर्धार । ब्रह्मा विष्णु शंकर हे ॥८१॥

इच्छा खेळाची मूळ स्थिती । निर्मिली हे मूळ शक्ती ।
तेथून वाचा जाली श्रुति । तो महा मंगलमूर्ति स्वयें ॥८२॥

गुणातीत मंगलमूर्ती

जेथोनी सत्त्वरजतामस । या तिही गुणांचे तीन प्रकाश ।
त्या वेगळा तो ईश । मंगलमूर्ति स्वामी ॥८३॥

सत्त्वरजाचा खेळ निर्मित । ज्या नाय शोभे अनंत ।
जो सकळ देवांमाजी वंदित । त्याहून वेगळा येकदंत असे ॥८४॥

सृष्टिपालण करावयासी । सत्वलीलें इच्छा जाहली हेरंबासी ।
मग निर्मूनि विष्णुस्वरूपासी । वैकुंठ स्थापियलें ॥ ८५॥

सात्विक गुणापासोन वैकुंठ । निर्मिला मोक्ष चोखट ।
अवघा मंगलमूर्ति सुभट । मूळाकार बीज येक ॥८६॥

मुळापासोन शाखा अनेक । ते इच्छा खेळे विनायक ।
पूर्णब्रह्म सुखदायक । श्रुत्याकारें वर्तती ॥८७॥

सृष्टीची करावया उत्पत्ती । रजो इच्छा मंगलमूर्ति ।
तरंग उठिला मूळ स्थिती । मग ब्रह्मा निर्मिता जाला ॥८८॥

जयाचें विराट स्वरूपाकार । घटमठ आकाशनिर्धार ।
आप तेज वायू साचार । रजोगुणी स्थिती हेरंब तो ॥८९॥

वेदाचें करावया उद्धरण । आपणयें व्याला आपण ।
त्या व्याल्यापासून । आठचांयशीं सहस्त्रऋषी ॥९०॥

नवलक्ष तारा गगनभुवनी । तैसी हे रजोगुणाची वाणी ।
अविट मंगळमूर्ति जननी । सगुणी खेळ खेळतसे ॥९१॥

सप्तद्वीपांतें निर्मिता । सप्तपाताळ करिता ।
हे रजोगुणाची अवस्था । वक्रतुंड शोभतसे ॥९२॥

भोगविलास भोगावयास । सेंद्राकार निर्मिला बिंबप्रकाश ।
तेहेतीस कोटि देवांचा भार । रजोगुण इच्छा खेळाची ॥९३॥

कोटि नेत्रांमाजी एक दीप्ति । चालवावया कर्मप्रीति ।
इच्छा खेळ स्थिति । आकाशीं चंद्रसूर्यज्योति निर्मित असे ॥९४॥

जैसा सूर्य भासे सकळांसी । सकळांमाजी दिसे बिंब प्रकाशी ।
परि जेथीचा तेथ मूळस्थितीसी । तैसा मंगळमूर्ति व्यापोनि निराळा ॥९५॥

जितुकी सृष्टीची रचना । हेरंबाचा रजोगुण ।
याची असे भिन्नभावना । न कळे पार कोणासी ॥९६॥

मेरुमंदारिक समस्त । हिमालयासारिखे पर्वत ।
ज्याचा रजोगुण इच्छानिर्मित । सहज कवतुकी सगुणी तो ॥९७॥

जयाचा इच्छा खेळ वर्णिता । मंद मी मती किती आता ।
अनन्यशरण एकदंता । स्वयें वदता तोचि तो ॥९८॥

श्रोतीं आळस न धरावा मनीं । मन ठेवावें निरोपणीं ।
भक्ती पुरस्कर करोनी । मूळ कथा श्रवण कीजे ॥९९॥

येथून तमोगुणाचें लक्षण । शुद्ध करोनी अंतःकरण ।
याचें अघोर महिमान । सहज लीला ऐकिजे ॥१००॥

प्रयागत्रिवेणीसंग । स्नानमात्रें दोष भंग ।
तैसें गणेशकीर्तन । सांगश्रवणमात्रें दोष हरती ॥१०१॥

व्यासांनी काढिलेला मथितार्थ

आतां यथार्थ मानीजे विचार । निवडूनि काढीजे बीजाक्षर ।
मिथ्या म्हणतां लंबोदर । तो केवळ चांडाळ दुर्जन ॥१०२॥

गणेश पुराणाची निंदा करी । तो अनामिक जाणिजे निर्धारी ।
लटकी वदेल माझी वैखरी । तरी जोव्हे रवा काढोन ॥१०३॥

ओव्या मी वर्णावया मूढमती । बोलो न शके गणेशकीर्ति ।
जेथें भागला बृहस्पती । तेथें मी किती मशयक ॥१०४॥

जनार्दनाचा विनवी येका । संतांचा मी लडिवाळ देखा ।
व्यासवसिष्ट कवतुका । सुखदायका परिसोजे ॥१०५॥

महाराष्ट्र म्हणोन न कीजे अव्हेर । हे पुराणकथा सुखसागर ।
मिथ्या वदेन साचार । तरी जिव्हा झडो माझी ॥१०६॥

व्यासनारायण साक्षात् । तेणें काढिला हा मथितार्थ ।
जरी वदेन आपुला पदार्थ । तरी जिव्हा कुष्ट हो माझी ॥१०७॥

शोधून सकळ शास्त्रांसी । काढिलें निवडो गोडरसी ।
चुकवावया यमयातनेसी । श्रीव्यासें निजधन ॥१०८॥

हें मोक्षबीजनिजधन । वेदांचें गुह्य करण ।
ज्ञानरवि हृदय मंथून । काढिलें हेरंब महिमेसी ॥१०९॥

जनार्दनाचा किंकर । येका घाली नमस्कार ।
श्रोते होऊन सादर । पुढील प्रसंग ऐकीजे ॥११०॥

इति श्रीगणेशपुराणे । शतसहस्रसंहितायां ।
मथितार्थगणेशोपाख्यानोनाम । प्रथमोध्याय
गोड हा ॥१११॥

श्रीसिद्धिविनायकार्पणमस्तु ॥

अध्याय दुसरा

देवांना संकटमुक्त करणारे व रामाला शोकमुक्त करणारे गणेशनाम

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥

तमोगुणाची लीला

मयोनि तमोगुणाची सीमा । वर्णिता पार नाहीं महिमा ।
पावावया मोक्षधामा । ते हे कीर्ति ऐकिजे ॥१॥

आपुला खेळ मोडावया । तमोगुण अवलंबावया ।
तोडावया मूळमाया । तमोगुण प्रगटला ॥२॥

तो हा तमोगुणाचा शंकर । आपला करावया संव्हार ।
तमोगुणरूपें लंबोदर । तामस थोर शोभतसे ॥३॥

क्रोध धडका न साहे आपणा । समुद्र करुं लागला
प्राशना ।
तणें दावाग्नी शरीर संपूर्ण । परम तापें तापला ॥४॥

क्रोधाचेनि मोडी आठवणें । भाळीं चंद्र धरिला तेणें ।
परि क्रोध निवारणें । आपआपला नव्हेचि ॥५॥

उघडिले तृतीय नेत्रासी । जाळिलें सर्व ब्रह्मांडासी ।
कोपें उचंबळला वेगेंसी । तमोगुण आठव नाहीं ॥६॥

ऐसी तमोगुणाची लीला । रज सात्विक आले त्यावेळां ।
परि क्रोधें तृतीय डोळा । न झाकीचि कदा तो ॥७॥

सात्विक म्हणे ऐका । आगा ये मूळनायका ।
आपआपणां मोडिसी कां । हे अपकीर्ति कवणासी ॥८॥

शांत होई देवराया

समुद्र कोपे लहरियांसि । सूर्य कोपे कांतीसि ।
हें न्यून कवणासि । हें विचारी देवराया ॥९॥

आपणा आपण मोडितां । कोण सामर्थ्य गणनाथा ।
हे अपकीर्ति येईल आतां । चरणीं माथा ठेवितसे ॥१०॥

टाकीं क्रोध घेई शांती । प्रलय झाला मंगळमूर्ति ।
उत्पत्ति स्थिति प्रळय असती । तुझेचि अंगी
दातारा ॥११॥

आगा हे लंबोदरा । तमोगुण शांत करा ।
तमनिर्मित शंकरा । तव रूपीं शांत होय तूं ॥१२॥

ब्रह्माविष्णू महेस्वर । आम्ही तुझ्या रूपेंचि अंकुर ।
तमोगुण विघ्नहर । शांत होई देवराया ॥१३॥

ब्रह्मा येऊनि लागला चरणां । आगा ये स्वामी
आनंदघना ।
पहिलेंच का मज अज्ञाना । सृष्टि करावया
निर्मिलें ॥१४॥

आतां करी माझें रक्षण । शांत होईल तमोगुण ।
आतां दया करून । इच्छारूप मोडी तूं ॥१५॥

ऐसा तूं परमात्मा निर्गुण । कशास वाढविलें महिमान ।
हें मोडितां लागे शब्द थोर पण । वेद लटिका
होईल ॥१६॥

तमोगुण तुज म्हणतां । ठाव नाहीं वेदासि आतां ।
निर्गुणा एकदंता । विचारी अपकीर्ति ॥१७॥

यालागि सगुणनिर्गुण । ब्रह्म सर्वाभूतीं परिपूर्ण ।
कृपा करी कलभानना । तमासि स्थिर कीजे ॥१८॥

म्यां करावी बहुत स्तुती । वदतां वेदवाणी श्रुति ।
भागोनि राहिली मंगळमूर्ती । अनिर्वाच्य ब्रह्म तूं ॥१९॥

'ग'कार, 'ण'कार व 'श'कार

वाचे येतां गकार शब्द । काय करी परमानंद ।
वेताळिसाचा पाशबंध । गकार शब्द तोडितसे ॥२०॥

णकार शब्द हा मोक्षासी । नेतसे पतित जनांसी ।
मागावया सायुज्यतेसी । णकार शब्द प्राणियां ॥२१॥

शकारें सोहं प्राप्ति । विचारोनि आत्मप्रचीति ।
मावळूनि आकाशस्थिति । सोहंप्राप्ती शंकरीं ॥२२॥

ऐशीं तिन्ही गुणांचीं नामें । केवळ हरिहरविश्रामें ।
मुखीं घेतां कर्मे । महा दोषां दाहक ॥२३॥

ऐसी तुझी महिमा । वर्णावया नाहीं सीमा ।
आतां क्रोध करी क्षमा । स्वामी विघ्नराजा ।।२४।।

गणेशनाम त्रिविध ताप नाहीसा करते

जयजयाजी मोरेश्वरा । वक्रतुंडा लंबोदरा ।
एकदंता फरशधरा । मंगळमूर्ति स्वामियां ।।२५।।

ऐसिये स्तुतिवचनीं । ब्रह्मा शांतवी तमोगुणी ।
मग सृष्टीची उभारणी । करिता झाला ब्रह्मदेव ।।२६।।

होऊनियां सावधान । ऐका गणेशमहिमान ।
निवेदिलें लक्षण । त्रिविध रूपाचें ।।२७।।

अवतार सगुणलीले । इच्छा खेळाचेनि खेळे ।
पाहे लंबोदर दयाळे । अवतार सगुण धरिलासे ।।२८।।

सगुणनिर्गुणाची कीर्ति । बोलिलिया वेदश्रुती ।
तें आणावें प्रचीती । ब्रह्मशास्त्रें करूनिया ।।२९।।

गणेश अक्षरें तिन्ही । ज्याची वेद नित्यवाणी ।
मंगळमूर्ति जननी । तया सदनीं तिष्ठतसे ।।३०।।

जेथें हेरंब नामकथा । तेथें कैंची भवाब्धिव्यथा ।
जे सुखदायक मोक्षार्थी । निजहिता साधावयालागी ।।३१।।

जेथें अखंड कीर्तन । त्याचा द्वारपाल होऊन ।
या तिन्ही अक्षरांलागून । तिष्ठतसे सर्वदा ।।३२।।

वेदाचें जें वचन । गायत्री वदली जाण ।
पूर्णब्रह्म सनातन । गजानन नामकीर्ति ।।३३।।

यालागीं तुम्ही करा पूजन । नाहीं वेचावें लागत धन ।
वाचें म्हणतां गजानन । त्रिविध ताप भंगतसे ।।३४।।

जालंधराचे संकट

ऐसें जाणून संकटासी । जें जालंधरें त्रास दिला देवांसी ।
तें प्रार्थिता झाला ऋषीकेशी । अति प्रीति करुनिया ।।३५।।

तेहतीस कोटि देवांसहित । इंद्र विनायका प्रार्थित ।
ब्रह्मा आदिकरूनि स्तवित । आमरावती गेली म्हणोनि ।।३६।।

जो रणीं कैलासनाथ । जालंदरें मोहिला अद्भुत ।
न चले वैरिवधाची मात । तें संकटीं तेणें स्मरिलें ।।३७।।

मूळ मंत्रीं करितां स्तवन । तपें साधी तो गजानन ।
श्रुतिवाक्यें प्रार्थिता जाण । मग पावले विघ्नहारु ।।३८।।

तेथून कार्तिकेय उत्पत्ति । एकाक्षर स्तविति मंगळमूर्ति ।
प्रसन्न झाला त्या उमापति । येणेंचि स्तवन करूनि ।।३९।।

हें जालंधर वधाख्यान । त्या ग्रंथीचा श्लोक जाण ।
इतुकें त्या देवाचें स्तवन । त्यासी प्रसन्न विघ्नराज ।।४०।।

मूढ पामरांना गणेशाचा प्रत्यय येणार नाही

यास्तव अखंड भजती । देवराज मंगळमूर्ति ।
मूढजनां पडली भ्रांती । मिथ्या वाद करिताती ।।४१।।

जैसें रोगियापुढे मिष्टान्न । काय रुची पक्वान्न जेवितां जाण ।
तैसें मूर्खासि गणेशपुराण । काय रुची लागे ।।४२।।

नपुंसकासि सुंदर कांता । काय आवडे त्याच्या चित्ता ।
तैसी दुर्जनांपुढे गणेशकथा । रुची स्वादु केवी लागे ।।४३।।

पय आणि पयासी । निवडून घेईजे राजहंसी ।
येर वायसें काय गोडीसी । तैसें अधमासी गणेशपुराण ।।४४।।

जों पारखी स्फटिकाचा । काय रहस्य जाणे मुक्ताफळांचा ।
मूढ पामरातें गणेशाचा । कैंवि प्रत्यय येईल ।।४५।।

हें साधुसंतीं राजहंसीं । तीहींच जाणिजे गोडीसी ।
महाविष वाटे निंदकासी । यमपुरीचे जे अधिकारी ।।४६।।

जे कां सात्विक आणि भक्त । तयां गणेश ब्रह्म भासत ।
हा परात्पर एकदंत । पूर्ण ब्रह्म सनातन ।।४७।।

आतां होऊन सावधान । करा देहाची सोडवण ।
गणेशकीर्तिश्रवण । भवार्णव उतरावया ।।४८।।

मिथ्या भाषण तें टाकिजे । जीवीं मूळ बीजातें धरिजे ।
प्रीति पादांबुजें सेविजे । श्रीमोरेश्वराची ।।४९।।

व्यर्थ गमाउं नका आयुष्य । सार्थकता कीजे देहास ।
हृदयीं स्मरा गणाधीश । जें सर्वांचें मूळबीज ।।५०।।

देवावर संकट : हेरंबाचा धावा

महा संकट पडिलें देवांसी । असुर घेऊं पाहे ब्रह्मपदासी ।
इंद्रपद घेऊनी लोक त्रासी । सांगावयासी पैं आलों ।।५१।।

असुरें घेतला परत्र । राहिला सृष्टीचा व्यापार ।
वैकुंठ घेती असुर । दैत्य थोर मातले ।।५२।।

देवा काय झाकिले लोचन । स्तुत्वा द्वादश नामें करून ।
विष्णु स्तविता झाला जाण। वेदवाक्यें करूनियां ॥५३॥

द्वादश नामें देव स्तवित । हेरंब प्रगट झाला त्वरित ।
म्हणे मी असतां येवढी चिंता चित्तात । कायसी तुम्हालागी ॥५४॥

तेंपासून अवतारचरित्र । श्रवणीं ऐकतां होती पवित्र ।
तुम्ही घेईजे मूळमंत्र । अहंता टाकुनिया ॥५५॥

द्वादश नामें

अंतकाळीं हाचि उपदेश । तुटावया भवपाश ।
भवरोगाचा होय नाश । या द्वादश नामें करूनिया ॥५६॥

ऐसा द्वादश नामें देवीं स्तवितां । अवताररूप एकदंता ।
येथून सगुण रूपाची कथा । सावधान श्रोतां ऐकावया ॥५७॥

श्रवण करी समुद्र । जो श्रुति स्तविला लंबोदर ।
या महिमेचा विस्तार । होईल सादर श्रवणार्थी ॥५८॥

नको धरूं अहंकार कांहीं । आलासि पावन नरदेहीं ।
येथें सार्थक करी लवलाहीं । घाली श्रवणीं गणेशकीर्ति ॥५९॥

म्यां तुम्हां श्रोत्यां निवेदन । तुम्ही बोलाल हाचि ज्ञाननिपुण ।
तरी मी आपुले ग्रंथींचें वचन । बोलत नसे सर्वथा ॥६०॥

गणेशपुराणाचे आधार

वेदशास्त्राचें सार । तेंचि वदे माझे आधार ।
हा एक जाणे श्रीशंकर । आणिकां नव्हे प्राप्ति ॥६१॥

ऐका अवतारलीला कौतुक । जेणें निजपदप्राप्ति सोहंसुख ।
तेणें निजबीज विनायक । करी श्रवण आर्तभूत ॥६२॥

हा पांचवा वेद ब्रह्ममूर्ती । सांग हेरंब अवतारकीर्ति ।
मूळकथा सनकादिकांप्रती । आपण निवेदीत असे ॥६३॥

शंकर महाहर्षयुक्त । स्कंधानंदिकेश्वरा उपदेशित ।
म्हणे माझ्या गुह्याचा गुह्यार्थ । तुम्हांप्रति सांगतसे ॥६४॥

मृत्युलोकामाझारीं । द्वारकेमाजीं निर्धारी ।
छपन्नकोटि यादव श्रीहरी । सांगे गणेशचरित्रा ।६५॥

रामाचा शोक

सीतावियोगाचे पाठीसि । अवतारचरित्रलीलेसि ।
वनांतरीं रामशोकासि । हा हा सीते म्हणोनिया ॥६६॥

महाक्लेशाचा समुद्र । बुडो पाहे राघववीर ।
वृक्षांसि सीता सुंदर । म्हणोनि आलिंगीतसे ॥६७॥

त्या शोकाचिया संकटी । वातात्मजा झाली भेटी ।
सुनीळ तनु देखोनि कष्टी । वायुनंदन बोलतसे ॥६८॥

अगा हे लोकाधिपती । तुझ्या नामें दोष हरती ।
चरित्र दाविसी लोकांप्रती । हेही स्थिति तुझीच ॥६९॥

शोक दूर करण्याबद्दल हनुमताला विनंती

या शोकाचें होय खंडन । हनुमंता तुवा सांगणें ।
मी तव ब्रह्म सनातन । अवतारलीले भ्रमिष्ट ॥७०॥

दूर करी वियोगदुःखासी । सीता प्राप्त होय मजसी ।
अवतार भ्रमांत नासी । ऐसें करी प्राणसखया । ७१॥

सकळांमाजी तूं श्रेष्ठ । पुराणांमाजी तूं वरिष्ठ ।
तुझ्या नामें पायवाट । मुक्तीची होत जनांसी ॥७२॥

विनायकचरित्र श्रवण करण्याचा मार्ग हनुमान रामाला सुचवितो

तुमचा शोक दूर करावया । मी कोण मशक स्वामीया ।
मज पुसणें रघुराया । हें अघटित दिसे कीं ॥७३॥

परी आठवला एक विचार । कार्यसिद्धीचा दातार ।
अक्षयब्रह्म मोरेश्वर । वेदश्रुति बोलती ॥७४॥

यालागी विनायकचरित्र । मज आठवला बीजमंत्र ।
घाली स्वामी कर्णपात्र । जेणें कार्यसिद्धी होय ॥७५॥

ज्या नाम सिद्धिविनायक । मोक्षधाम मंगलसुख ।
जेणें नासे महादुःख । अतिसुख तें चरित्र ॥७६॥

ज्याच्याकरितां श्रवणा । नासती क्लेशयातना ।
तूंचि वदलासि जाणा । म्यां सांगणें काय तें ॥७७॥

पाहे लक्ष्मणाकडे रघुवीर । हनुमान काय बोलिला सार ।
वाक्यरत्न मनोहर । अति सुंदर मनोरम ॥७८॥

राम म्हणे हे वीरपंचानन । शिवगीतेसी उपदेशिलें जाण ।
त्याचि बोलिलासि अनुसंधान । सांगा पुराण गणेशाचे ॥७९॥

शंकरें केला उपदेश । मज झाला सीतावियोगभास ।
तेणें विस्मय झाला हृदयास । आतां बैसे सांगे तूं ॥८०॥

हनुमंताकडून मंत्र ऐकावयाला राम उत्सुक होतो

पंचवटी तिरीं रघुनाथ । व्रतस्थ बैसोनि निवांत ।
एकाक्षरविधी एकदंत । गौतमतटीं सुखावला ॥८१॥

मग म्हणे रघुनंदन । शंकरें उपदेशिले मंत्र जाण ।
मध्यें लोप झाला होता जाण । मारुती तुवा स्मरण केलें ॥८२॥

मागुती प्रकाश जाण । त्वा दिली आठवण ।
तो मंत्र मजलागून । विधियुक्त सांगिजे ॥८३॥

हनुमान म्हणे रघुपती । अभिन्न भावना मंत्र स्थिति ।
एकाक्षर श्रद्धाभक्ति । तरीच प्राप्ति सुखाची ॥८४॥

यालागीं आता करी स्नान । मी तव दास तुझा जाण ।
नेणे कांहीं तुजवाचून । तुझे रूपें बोलतसे ॥८५॥

राम म्हणे वायुसुता । अति दारुण वियोगव्यथा ।
आतां सांडी स्तुतिपदार्था । मंत्र सांगे झडकरी ॥८६॥

हनुमान म्हणे रविवंशभूषणा । करावें आतां मंगळस्नाना ।
मग मंत्रविधी आणिजे मना । हृदयभूमिका शोधोनि ॥८७॥

लक्ष्मण म्हणतो : शिवगीता पाहा

मग लक्ष्मण म्हणे रघुराया । अनन्यशरण तुमच्या पायां ।
शिवगीता आणुनिया । शोधूनही पाहिजे स्वामी ॥८८॥

राम लक्ष्मणाला हनुमंताचे महत्त्व पटवितो

लक्ष्मण बोलसी वाक्यासी । हनुमान भासला तुज मानवमानसीं ।
जो शिवगीता उपदेशी मजसी । तोचि शिव प्रत्यक्ष हा ॥८९॥

म्हणसी वानर देहाचा । देहीं दृष्टी नको ठेऊं साचा ।
बोलिला अनिर्वाच्य ब्रह्मवाचा । नमनी आणिक भाषण ॥९०॥

माझ्या सेवेचें ऋण । या रूपीं अवतार धरून ।
फेडावया उपकार जाण । सेवाऋण फेडितसे ॥९१॥

जरी म्हणसी लटकी भावना । तरी नेत्र झाकी लक्ष्मणा ।
पाहे यावरि पंचानना । कोण ऐसें कळेल ॥९२॥

मग लक्ष्मण होय समाधिस्थ । नेत्र उघडोन जव पाहत ।
तंव तो देखिला कैलासनाथ । तत्क्षणीं लक्ष्मणें ॥९३॥

मग धरिले दोन्ही चरण । म्हणे देवा हनुमंता जाण ।
आगाध तुझें महिमान । सांगे एकाक्षर मंत्रातें ॥९४॥

हनुमंताने रामाला एकाक्षरमंत्र दिला

गणेश एकाक्षरमंत्र । सांगे हनुमंत पवित्र ।
रामें शोधून हृदयपात्र । मूळबीज साठविलें ॥९५॥

कृष्णपक्षीं चतुर्थीसि हनुमंतें उपदेशिलें मंत्रासी ।
तेणें विसरला वियोगदुःखासी । संकट निवारण व्हावया ॥९६॥

चतुर्विध धर्मासी । सांगितलें मंत्रमहिमेसी ।
ऐसें आचरण ऋषीकेशी । करी बनवासी रघुवीर ॥९७॥

चतुर्थीनें चतुर्थीसी । आचरला राम परियेसी ।
शोकभ्रम तत्क्षणासी । सिद्धि झाली रामचंद्रा ॥९८॥

रामावर एकदंत प्रसन्न झाला

एकाक्षर मंत्रें एकदंत । प्रसन्न झाला त्वरित ।
साह्य झाला किष्किंधानाथ । अठरा पद्में वीरांसह ॥९९॥

ऐसा हा देव चूडामणी । विघ्नराज चिंतामणी ।
भक्तवत्सल कृपादानी । गजानन स्वामी तो ॥१००॥

पहा शिवोपाख्यानगीता । आणि हनुमंत नाट्यग्रंथा ।
देव साच विघ्नहर्ता । जींवीं भाव धरिजे हो ॥१०१॥

मिथ्यारा की भाषणासी । सांडी निंदेच्या बीजासी ।
मी आपुलेनि मतें विलासी । बोलत नसे सर्वथा ॥१०२॥

पाहिजे गणेश भाषा ग्रंथासी । बोलिलीं पुराणें आणीक ऋषी ।
इतुक्या आणुनि साक्षीसी । मनोभावें करूनि ॥१०३॥

टाकूनि भेदाकार शब्दासी । शोधून पाहिजे ब्रह्मशास्त्रासी ।
मग दोष ठेविजे यासी । व्यर्थ दोषी होऊं नका ॥१०४॥

वेदशास्त्र मूळ बीजाकार । हा गणेशग्रंथ अति सुंदर ।
तरती भवाब्धि अति दुस्तर । श्रवणमात्रें करूनियां ॥१०५॥

वेदऋषीमताचेनि बोला । पाहिजे रुद्रयामला ।
गणेश परब्रह्म पुतळा । नेणवे लीला कवणासी ॥१०६॥

भक्तासाठी तयार केलेला सारांशग्रंथ

भक्त तरणोपायासी । काढिलें सारांशासी ।
येयून गणेव्याख्यानासी । सादर होऊनि ऐकिजे ॥१०७॥

येयून सगुण रूपाची कीर्ति । श्रोतीं श्रवणीं घालिजे प्रीती ।
ऐसा महा मंगळमूर्ति । जेणें मोक्षगति पाविजे ॥१०८॥

लडिवाळ गणेशबाळक । जनार्दन सद्गुरूचा रंक ।
एका बोले सुखदायक । श्रवणीं सादर असीजे ॥१०९॥

इति श्रीगणेशपुराणे । शतसहस्रसंहितायां ।
गणेशोपाख्यानोनाम । द्वितीयोध्याय गोड हा ॥११०॥

श्रीरस्तु श्रीहेरंबचरणार्पणमस्तु । शुभं भवतु । श्रीरस्तु ॥

रसिकश्रेष्ठ श्री. तात्यासाहेब परांजपे

—शं. वा. शास्त्री

गुणशालित्व अंगी असायला माणसाला योग्यता लागते, हे तर खरेच. पण, गुणी माणसाच्या अंगचे गुणशालित्व ओळखायलाही अंगी योग्यता असावी लागते, हे काही खोटे नाही. आणि, असे गुणशालित्व मनाला पटल्यानंतर, त्याची वूज राखण्यासाठी, त्या गुणशालित्वाच्या प्रसाराच्या आणि प्रचाराच्या आड येणाऱ्या अनेक प्रकारच्या व्यावहारिक अडचणी दूर सारून, त्या प्रसाराचा मार्ग सुलभ करून देण्यासाठी माणसाच्या अंगी जो दिलखुलासपणा असावा लागतो, स्वत: झीज सोसण्याचीही जी तयारी लागते, ती उदार तत्परता तर दुर्मिळच. साहित्याच्या आणि कलेच्या क्षेत्रात अशा प्रकारची तत्पर रसिकता प. वा. श्री. गणेश नारायण (तात्यासाहेब) परांजपे यांचे ठायी फार मोठ्या प्रमाणात वसत होती, ही गोष्ट त्यांच्या परिचयाचा लाभ घडलेले अनेक लोक मान्य करतील, यात शंका नाही.

माझा तात्यासाहेबांशी प्रत्यक्ष परिचय घडून आला, त्या गोष्टीला आता अर्धे शतक उलटून गेले आहे. त्यांचे देहावसान होऊनही पाव शतकाच्या वर काळ लोटला आहे. पण, त्यांच्या आगळ्या व्यक्तिमत्वाचे ठसे कृतज्ञतापूर्वक हृदयावर मिरविणाऱ्या ज्या अनेक व्यक्ती आजही विद्यमान आहेत, त्यांतलाच मी एक.

* * *

या ठिकाणी तात्यासाहेबांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीसंबंधी थोडा उल्लेख आवश्यक आहे.

तात्यासाहेब परांजप्यांचे घराणे मूळ खानदेशातले. त्यांचे बंधू श्री. बापूसाहेब हे धुळ्याचे एक नामांकित वकील होते. त्यांचे दुसरे एक बंधू चाळीसगावाला शेती वगैरे पाहात. सगळ्यात धाकटे बंधू श्री. बिठ्ठलराव (दाजीकाका) हे त्या काळच्या बी. बी. सी. आय. रेल्वेमधे एंजिनिअरिंग खात्यात एक उच्चपदस्थ अधिकारी होते.

तात्यासाहेबांच्या पत्नी प. वा. सौ. सरस्वतीबाई ह्याही खानदेशातीलच करंदीकर घराण्यातल्या. प्रसिद्ध कवी 'विनायक' (विनायक जनार्दन करंदीकर) यांच्या ह्या चुलत भगिनी.

तात्यासाहेबांना मुले दोन. मोठा मुलगा जगन्नाथ (दादा) हा मुंबईस एका अमेरिकन मोटार कंपनीत मोठ्या हुद्यावर होता. काही वर्षांपूर्वी त्याचे अकाली निधन झाले. दादांच्या पत्नी श्री. लीलाताई या ज्योतिष–शास्त्र–विशारद म्हणून प्रख्यात आहेत.

धाकटे चिरंजीव श्री. अण्णासाहेब हे विमा धंद्यात काम करीत असत. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे हल्ली ते कार्यनिवृत्त झाले आहेत.

* * *

ज्याला 'उच्च' शिक्षण म्हणतात, अशा शिक्षणाचा लाभ तात्यासाहेबांना घडलेला नव्हता. परंतु विश्वविद्यालयाची पदवी म्हणजेच बुद्धिमत्तेचे एकमेव प्रमाणपत्र असे मानणाऱ्यांची समजूत त्यांनी आपल्या बुद्धिचातुर्याने आणि कर्तबगारीने चुकीची ठरविली. त्या काळच्या 'ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या— आजच्या 'सेंट्रल रेल्वे'च्या— मुंबईच्या मुख्य कचेरीत, कॉमर्स विभागात, ते नोकरीला लागले; व फारच थोड्या काळात, आपल्या कार्यनैपुण्याच्या आणि बुद्धिसामर्थ्याच्या बळावर ते त्या

विभागातील एका उच्च अधिकारपदावर जाऊन पोचले.

येथपर्यंत सर्व ठीक होते. पण पुढे रेल्वे विभागातील सीनिअर असिस्टंट ट्रॅफिक मॅनेजरची जागा रिकामी झाली. या पदावर रीतसर नेमणूक व्हायची ती तात्यासाहेबांची. पण तो जमाना निराळा होता. एवढ्या उच्च अधिकार-पदावर एका 'काळ्या' माणसाची नेमणूक करायला इंग्रज रेल्वे कंपनी तयार नव्हती. अधिकाराची सर्वच उच्च पदे म्हणजे गोऱ्या इंग्रजांची किंवा फार फार तर अँग्लो-इंडियन लोकांची मिरास त्या काळात मानली जाई. तात्यासाहेबांचा हक्क सर्व दृष्टींनी मान्य करूनही रेल्वे कंपनीने ती जागा त्यांना दिली नाही व एका इंग्रज गृहस्थाची नेमणूक करण्यात आली.

हा अवमान तात्यासाहेबांच्या स्वाभिमानी वृत्तीला पटला नाही. त्यांनी आपल्या नोकरीचे त्यागपत्र देऊन टाकले.

ही घटना म्हणजे केवळ व्यक्तिगत आपलाच नव्हे, तर आपल्या देशाचाच अपमान आहे, ही जाणीव तात्यासाहेबांच्या मनाला डाचू लागली. आणि त्यांनी शिरजोर इंग्रज-शाहीला धडा शिकविण्याचे ठरविले.

रेल्वेच्या कमर्शिअल विभागांत त्यांनी बरीच वर्षे काम केलेले होते. व्यापाराच्या तऱ्हेतऱ्हेच्या मालाची देशभर ने-आण करण्याचे रेल्वे हे मुख्य साधन. मालाची ही ने-आण करण्यात वेळोवेळी मालाची नासधूस होते. कधी माल वेळेवर पोचता न झाल्यास व्यापाऱ्याचे बरेच नुकसान होते आणि अशा वेळी आपल्या झालेल्या नुकसानाला मूलतः रेल्वेचाच कारभार कारणीभूत आहे असे जर तो व्यापारी सिद्ध करू शकला, तर रेल्वेला त्याची नुकसानभरपाई करून द्यावी लागते. अशा प्रकारची नुकसानभरपाई, प्रसंग आला तर, टाळता येण्यासाठी योग्य ती कारवाई जागरूकपणे करणे, हा या कमर्शिअल विभागाचा कार्यभाग मुख्यत्वेकरून असतो. तात्यासाहेबांच्या कारकीर्दीत अशा प्रकारचा भूदंड सोसावा लागू नये. म्हणून रेल्वे-खाते कसोशीने व कायद्याच्या कचाट्यात सापडणार नाही, अशा बेताने आपला कारभार हाकीत असे.

पण आता गाडे उलटले होते. ज्या एका कार्यकुशल अधिकाऱ्याच्या कार्यनैपुण्यामुळे रेल्वे-कंपनी आल्या प्रसंगातून सहीसलामत निसटून जाऊ शकत असे, त्याच अधिकाऱ्याचा रेल्वे-कंपनीने अपमान करून रोष ओढवून घेतलेला होता. त्याचा परिणाम असा झाला की, तात्यासाहेबांनी श्री. कृ. ना. ऊर्फ कुशाभाऊ नेने, श्री. रामभाऊ नूलकर अशा काही स्नेह्यांच्या सहकार्याने एक छोटेसे ऑफिस थाटले आणि त्यामार्फत नुकसान झालेल्या व्यापाऱ्यांनी रेल्वेविरुद्ध कशा मार्गाने कारवाई करावी म्हणजे ते यशस्वी होतील याचे मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. व्यापाऱ्यांच्या मागण्या फटाफट मंजूर होऊ लागल्या आणि रेल्वे कंपनीला नाक मुठीत धरून त्यांची नुकसानभरपाई करून द्यावी लागली. सुमारे तीन-साडे तीन वर्षांच्या कालावधीत रेल्वेला लक्षावधि रुपयांचे नुकसान यामुळे सोसावे लागले. बुद्धिपुरःसर केलेल्या अपमानामुळे चिडलेला हा हिंदी गृहस्थ अशा रीतीने रेल्वे कंपनीला लाखोंचे नुकसान सोसण्यास भाग पाडीत आहे आणि वेळीच उपाय केला नाही, तर ही नुकसानभरपाई आणखी किती उग्र रूप धारण करील त्याची शाश्वती नाही, ही जाणीव अखेर रेल्वे कंपनीला झाली. गोऱ्यांची गुर्मी उतरली. त्यांनी तात्यासाहेबांशी सलोखा करण्याचे ठरविले आणि त्यांनी परत नोकरीवर यावे, म्हणून प्रयत्न सुरू केले. तात्यासाहेबांनी स्पष्ट नकार दिला. बऱ्याच वाटाघाटी झाल्या. नोकरीच्या काळात तात्यासाहेबांच्या उमद्या आणि दिलदार वृत्तीमुळे अनेक इंग्रज अधिकारीही त्यांचे मित्र बनलेले होते. त्यांनी मध्यस्थी सुरू केली. रेल्वे कंपनीने खेद प्रगट केला आणि गोऱ्यांची मिरास म्हणून नाकारण्यात आलेली जागा कंपनीने तात्यासाहेबांना देऊ केली. आपल्या इंग्रज स्नेह्यांची भीड मोडवेना म्हणून तात्यासाहेबांनीही शेवटी त्या गोष्टीला मान्यता दिली. आणि, ज्या सीनिअर असिस्टंट ट्रॅफिक मॅनेजरच्या खुर्चीला त्या काळपर्यंत इंग्रजांखेरीज इतर कोणाही माणसाची पाठ टेकली नव्हती, त्या खुर्चीवर हा 'काला आदमी' मोठ्या इतमामाने स्थानापन्न झाला.

*　　*　　*

पण, मला सांगायचे आहे ते निराळेच. तात्यासाहेबांच्या स्वभावातला कणखर बाणेदारपणा व्यक्त करणारा त्यांच्या आयुष्यातील हा प्रसंग कितीही हृद्य असला, तरी त्यावरून त्यांची साहित्य–निष्ठा अथवा कला–प्रेम निदर्शनास येत नाही. त्यासाठी आपल्याला तात्यासाहेबांच्या व्यक्तित्वाच्या दुसऱ्या एका अंगाकडे पाहायला पाहिजे.

तात्यासाहेब स्वतः साहित्यिक नव्हते, पण साहित्य आणि साहित्यिक यांच्यावद्दल त्यांना आस्था फार होती. उत्तरायुष्यात बहुतेक वेळ निरनिराळ्या प्रकारच्या व्यवहारांच्या धकाधकीत त्यांना वाचन वगैरे करण्यास फारसा वेळ मिळत नसे. पण पूर्वायुष्यात त्यांनी जे इंग्रजी, मराठी आणि संस्कृत साहित्याचे वाचन केलेले होते, त्यामुळे त्यांना एक चोखंदळ अशी साहित्य–दृष्टी प्राप्त झालेली होती आणि त्यांच्या अभिरुचीनेही एक उच्च जातीचा पल्ला गाठलेला होता. त्यामुळे, टीकाकाराचा मार्मिक चोखंदळपणा जरी त्यांच्या ठायी दिसून येत नसला, तरी श्लाघ्य आणि त्याज्य अशा दोन्ही प्रकारच्या साहित्याची ओळख त्यांच्या विलक्षण सूक्ष्म दृष्टीत अनायासेच टिपली जाई. आणि म्हणूनच वैशिष्टचपूर्ण गुणवत्तेची एखादी लहानशी चुणूक जरी एखाद्या साहित्यिकाच्या अंगी असलेली त्यांना आढळली, तर त्या व्यक्तीला आपल्या अंगच्या गुणाचा विकास करवून घेण्यासाठी मदत करावयाला ते सदैव तत्पर असत.

याचे एकच उदाहरण येथे नमूद करण्यासारखे आहे. मुंबईला कै. गणेश विठ्ठल कुलकर्णी आणि काही साहित्यप्रेमी लोकांनी मोठ्या उत्साहाने 'उद्यान' नावाचे मासिक सुरू केले. 'मासिक मनोरंजना'ला मागे टाकण्याच्या ईर्ष्येने हे मासिक काढण्यात आले होते. प्रसिद्ध होणारे ललित साहित्य आणि त्याचप्रमाणे मासिकाची छपाई या दोन्ही बाबतीत 'उद्यान'ने लवकरच चांगले यश संपादन केले, ही गोष्ट जुन्या पिढीतील वाचकांच्या आजही स्मरणात असेल.

पण साहित्यिक म्हणजे पैश्या–अडक्यांच्या व्यवहारात बहुशः गैरहिशेबीच. उत्कृष्ट छपाईसाठी लागणाऱ्या यंत्र–सामुग्रीसाठी आणि मासिकाचा योगक्षेम चालविण्यासाठी चालकांना पैशाची तूट भासू लागली. पण उत्साह अमाप. तो काही त्यांना स्वस्थ बसू देईना. बरीचशी पदरमोड झाली. देण्या–घेण्याचा हिशेब काही नीट जमेना. शेवटी कर्ज काढण्याची पाळी आली. साहित्यिकाला कर्ज तरी कोण देणार? चालकांच्या ओळखीचे म्हणून श्री. कुशाभाऊ नेन्यांनी चार पाच हजार रुपये त्यांना कर्जाऊ दिले. पण तेवढ्यावर भागते थोडेच? कर्ज तसेच राहिलेले, पैशाचा तगादा मागे लागलेला; त्यातून काही तरी तोड काढायलाच हवी होती. शेवटी कुशाभाऊंच्या मध्यस्थीने त्यांचे जवळचे मित्र असलेल्या तात्यासाहेबांकडे संपादकांनी गोष्ट काढली. मागणी काहीशी जबरदस्तच होती. तात्यासाहेबांचे जवळ एवढी मोठी रक्कम कोठून येणार? पण, साहित्य–कार्याला मदत म्हणून तात्यासाहेबांनी स्वतः कर्ज काढून, 'उद्यान' मासिकाला हवी असलेली रक्कम पुरविली. कर्ज देणारे सावकार पडले व्यवहारी. साहित्यिकांच्या स्वप्नाळू दुनियेची त्यांना कसली मातब्बरी असणार? उद्यान मासिक, उद्यान छापखाना वगैरे सारे काही कर्जापायी शेवटी रसातळाला गेले आणि ह्या भानगडीत तात्यासाहेबांना मात्र चांगलाच फटका सोसावा लागला. पण तोंडावाटे अवाक्षरही न काढता तो फटका त्यांनी सहन केला. हे कर्ज आणि त्यावरील व्याज यांची फेड करण्याचे काम त्यांना पुढे अनेक वर्षे पुरले.

* * *

तात्यासाहेबांना नाटकाचे भारी वेड. आणि, नाटकाप्रमाणेच संगीताचेही. मा. दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर, मामा कोल्हापुरे इत्यादि मंडळींनी किर्लोस्कर नाटक मंडळीशी संबंध सोडून आपली स्वतंत्र बलवंत संगीत नाटक मंडळी स्थापन करण्याचा बेत केला. त्या वेळी नवी नाटच–संस्था सुरू करण्यासाठी लागणारा पैसा त्या संस्थेने तात्यासाहेबांच्या मार्फतच उभा केला. चिंतामणराव कोल्हटकरांच्या नाटचकौशल्यावर आणि व्यवहारनैपुण्यावर तात्यासाहेबांचा विश्वास होता. त्याचप्रमाणे मास्टर दीनानाथांच्या मनाला भारून टाकणाऱ्या गाननैपुण्यावरही ते बेहद्द

खूष होते. कोल्हटकरांचे व गडकऱ्यांचे संबंधही त्यांना ठाऊक होते. तेव्हा, बलवंत संगीत नाटक मंडळी नाट्यक्षेत्रात आघाडीवर येण्यास विलंब लागणार नाही, असा कयास बांधून त्यांनी या नव्या संस्थेला लागेल ती मदत करण्यास सुरुवात केली. तात्यासाहेबांचा हा कयास चुकीचा नव्हता, हे लवकरच सिद्धही झाले. बलवंत संगीत नाटक मंडळी, तिचे नट, तिची नाटके, मास्टर दीनानाथांची गायकी, —साऱ्याच गोष्टी महाराष्ट्रभर गाजू लागल्या. वासुदेवशास्त्री खऱ्यांचे 'उग्रमंगल', वामनराव जोश्यांचे 'रणदुंदुभी' तात्यासासाहेब केळकरांचे 'वीरविडंबन', तात्याराव सावरकरांचे 'संन्यस्त खड्ग' अशासारख्या नाटकांनी गडकऱ्यांच्या 'भावबंधना'च्या बरोबर नाटक मंडळीला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसविले. या सर्व घटनांच्या मागे तात्यासाहेबांचा सक्रिय आणि उदार हात किती प्रमाणात आणि कोणत्या पद्धतीने काम करीत होता, ते नाटक-धंद्याची व्यवहाराची बाजू सांभाळणाऱ्यांच्याच लक्षात येऊ शकते. हा व्यवहार खाजगी स्वरूपाचा असल्याकारणाने बाहेरच्या जगाला त्याची जाणीवही नसते, पण त्याशिवाय कार्य होऊ शकत नाही हे तितकेच खरे. पाठीशी तात्यासाहेबांचा वरद हस्त नसता, तर बलवंत संगीत नाटक मंडळीला आपली कर्तबगारी सिद्ध करून दाखविण्यासाठी योग्य आणि आवश्यक तो वाव मिळाला असता किंवा नाही, कोण जाणे ! चिंतामणराव कोल्हटकरांच्या 'बहुरूपी' या पुस्तकांत ही माहिती आलेली आहे.

* * *

पण, निव्वळ एक अव्वल दर्जाची नाटक मंडळी स्थापून महाराष्ट्राची रंगभूमी तिच्या मार्फतीने गाजवून सोडणे, एवढीच काही तात्यासाहेबांची अभिलाषा नव्हती. मराठी रंगभूमी केवळ मनोरंजनाचे साधन बनून न राहता, तिने आपले विशिष्ट संस्कार प्रभावीपणे घडविण्याचे कलेचे कार्य जागरूकपणे करीत राहिले पाहिजे, हा तात्यासाहेबांचा कटाक्ष होता. इंग्रजी अमदानीचे ते दिवस होते, पण त्या काळातही राष्ट्रीय जागृतीची ज्योत खाडिलकरांनी आपल्या नाटकांच्या द्वारा कशी तेवत ठेवली होती, ते उदाहरण तात्यासाहेबांच्या पुढे होतेच. आपल्या बलवंत मंडळीनेही आपले याबाबतचे कर्तव्य विसरू नये या उद्देशाने वामनराव जोश्यांना नाटककार म्हणून जवळ करण्यात आले होते.

आणि, सावरकर !

तो काळ गांधींच्या अहिंसाचाराच्या प्रचाराचा ऐन अमदानीचा काळ ! पण, तात्यासाहेबांना ते तत्त्वज्ञान मनापासून पटत होते, असे काही म्हणता येत नाही. त्यांचा सारा वैचारिक पिंड लोकमान्य टिळकांच्या शिकवणुकीत मुरलेला. 'ठोश्यास ठोसा', 'ठकाशी महाठक' अशा व्यवहाराची शिकवण देणाऱ्या 'उग्रमंगल', 'रणदुन्दुभी' या नाटकांच्या बरोबरच, आता एका दुसऱ्या एका तत्त्वज्ञानाचा प्रभाव लोकमनावर पडणे आवश्यक आहे असे वाटून त्या दृष्टीने त्यांचा विचार सुरू झाला आणि सावरकरांचे नाव त्यांच्यापुढे उभे राहिले.

पण, हे व्हायचे कसे ? अडचणी अनेक. त्यांचे स्वरूपही नेहमीच्या व्यावसायिक अडचणींपेक्षा काहीसे विचित्र आणि निराळे. पण, सावकारांचे नाटक रंगभूमीवर आणण्याचा विचार इतका भुरळ पाडणारा होता, की तो काही मनावेगळा करवेना.

वाटाघाटी सुरू झाल्या. बेत ठरले आणि शेवटी, हजार कटकटींना तोंड देऊन, सावरकरांचे 'संन्यस्त खड्ग' नाटक बलवंत संगीत नाटक मंडळीच्या रंगभूमीवर गाजू लागले, अतोनात गाजू लागले.

* * *

मराठी नाटके, मराठी नट, मराठी नाट्य-संगीत आणि महाराष्ट्राची रंगभूमी याचे लोण अ-महाराष्ट्रीय जनतेपर्यंत पोचवावे अशी तात्यासाहेबांची दुसरी एक आकांक्षा होती. नुकतेच, किर्लोस्कर मंडळीचे उर्दू नाटक 'ताजे वफा' कलकत्त्याच्या प्रेक्षकांची वाहवा मिळवून आलेले होते. ते उदाहरण समोर होतेच. पण, त्या यशात त्या वेळी किर्लोस्कर मंडळीत नट म्हणून असलेल्या मास्टर दीनानाथांच्या संगीत-नैपुण्याचाच मुख्य भाग होता. 'ताजे वफा' मराठी नाटकांची यथातथ्य ओळख अ-मराठी प्रेक्षकांना काही पटवून देऊ शकत नव्हते.

त्यासाठी काही निवडक मराठी नाटकांचे हिंदीत रूपांतर करून ती रंगभूमीवर आणली तर कितपत यशस्वी होऊ शकतील, ते अजमावण्यासाठी 'मानापमान' नाटकाची निवड करण्यात आली. त्यात वैशिष्ट्य असे होते की, नाटकातली पदे हिंदीत असली तरी ती मूळ मराठी चालीला आणि अर्थाला यत्किंचितही सोडून नव्हती. या 'हिंदी मानापमान' नाटकाचेही प्रयोग झाले, पण ते महाराष्ट्रीय प्रेक्षकांना फारसे रुचलेले दिसले नाहीत. यात दोष कोणता अथवा कोणाचा. व ही योजना यशस्वी होण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करावयास हवी, त्याचा विचार मात्र अपुराच राहिला.

मराठी रंगभूमीची अ-महाराष्ट्रीय प्रेक्षकांना माहिती करून देण्यासाठी तात्यासाहेबांनी आणखी एक धाडसी प्रयोग करून पाहण्याचे योजिले.

आफ्रिकेच्या काही भागांत बरेचसे अ-महाराष्ट्रीय आणि काही महाराष्ट्रीय लोकही उद्योग-व्यवसायानिमित्त स्थाईक होऊन राहिले आहेत. बलवंत संगीत नाटक मंडळीने आफ्रिकेचा दौरा काढावा आणि या लोकांपुढे आपली नाटके करावी, असा एक विचार तात्यासाहेबांच्या मनात आला. त्यांनी कोल्हटकर-दीनानाथांशी चर्चा केली व पुढील पावले कशी टाकायची ते ठरविले.

श्री. लालनाथ खोटे नावाचे एक मुंबईचे तरुण गृहस्थ तात्यासाहेबांचे आणि बलवंत मंडळीचे ऋणानुबंधी होते. त्यांचे चुलते आफ्रिकेत रत्नांचा व्यापार करीत. त्यांच्या व तात्यासाहेबांचे परिचित असलेल्या आफ्रिकेतील काही व्यापारी स्नेह्यांच्या मदतीने या योजनेला आकार देण्याचे काम सुरू झाले. श्री. लालनाथ खोटे आणि श्री. चिंतामणराव कोल्हटकर हे दोघे त्यानिमित्त आफ्रिकेस जाऊनही आले. पण पुढे काही अनुल्लंघनीय अडचणीमुळे ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

नाटक मंडळ्या आणि नट यांच्या भोवती रुंजी घालीत बसण्यातच आपल्या 'रसिकते'चे सारसर्वस्व साठविलेले आहे असे मानणारा 'रसिकां'चा एक वर्ग त्या काळात होता,—आजही तो आहे. तात्यासाहेब या वर्गातीलच एक असावेत, अशी लोकांची समजूत होणे शक्य आहे. पण ते तसे नव्हते. नाटककाराला अथवा त्याच्या नाट्य-कृतीला अन्यायकारक होईल अशी कोणतीही घटना त्यांच्या अगदी आवडत्या नटाने जरी केली, तरी ती ते मुळीसुद्धा सहन करीत नसत. यावरून त्यांची कला-दृष्टी कशी निर्मळ होती, याची साक्ष पटते. या गोष्टीचे एकच उदाहरण मी येथे देतो.

'भावबंधन' नाटकाचा प्रसंग. हे नाटक अतिशय गाजलेले; व कामण्णाच्या भूमिकेतील दिनकर ढेरे आणि लतिकेच्या भूमिकेतील दीनानाथ हे दोघे रसिकांच्या गळ्यातील ताईत बनलेले. हे दोघेही नट मोठे बुद्धिमान आणि चतुर म्हणून ओळखले जात.

एके दिवशी या दोघांची आपापसात, खाजगीतच चुरस लागली. दिनकर दीनानाथाला म्हणाला, "आज रात्री स्टेजवर मी तुम्हाला असा काही अडचणीत टाकीन की काय करायचे ते तुम्हाला सुचणारच नाही." दीनानाथ म्हणाला, "अरे, जा. तू काय वाटेल ते कर. मी माझ्या कामात मुळीच गडबडणार नाही!" "ठीक आहे", म्हणून दिनकर गालातल्या गालात हसत निघून गेला.

नाटक सुरू झाले. नेहमीच्या पद्धतीने ते रंगत होते. प्रेक्षक हसत होते.

पुढे एका अंकात कामण्णा व लतिका यांचा एक प्रसंग आहे. त्यात कामण्णाच्या तोंडी एक वाक्य आहे. तो लतिकेला म्हणतो, "मोठी माणसं झाडाला का लागतात?"

दिनकरने अगदी कल्पना नसतानाही हे वाक्य निराळ्या धाटणीने खणखणीत स्वरांत उच्चारले. कामण्णाने लतिकेला स्पष्ट शब्दांत प्रश्न विचारला, "मोठी माणसं झाडाला का लागतात?" मुळात किंचित् जोर द्यायचा तो 'झाडाला' ह्या शब्दावर; पण कामण्णाने भरपूर जोर दिला 'का' या शब्दावर, आणि अर्थाचा अनर्थ केला!

लतिकेपुढे अचानकपणे एक भलताच, अगदी निरुत्तर करणारा प्रश्न उभा राहिला आणि कामण्णा मागत होता आपल्या प्रश्नाचे उत्तर!

लतिका क्षणभर गांगरलीच,— पण क्षणभरच. दिनकरने उच्चारलेल्या 'झाडाला' या शब्दाच्या एका लहानशा हेलकाव्याचा फायदा घेऊन दीनानाथने लगेच उत्तर दिले, "तुझ्यासारखी माणसं हातात केरसुणी घेत नाहीत, म्हणून !"

प्रेक्षकांची हसून हसून मुरकुंडी वळली.

पण समोरच्या रांगेत नाटक पाहात बसलेले तात्यासाहेब,—ते काही हसले नाहीत. उलट, त्यांच्या चेहेऱ्यावर रागाची छटा स्पष्ट दिसू लागली.

अंक संपला आणि तात्यासाहेब आत गेले.

आपल्या बुद्धिचापल्याचे कौतुक होईल म्हणून दिनकर आणि दीनानाथ हे दोघेही हसत-हसत त्यांच्या पुढे आले. पण तात्यासाहेब रागाने म्हणाले, "अरे, तुम्ही मांडलं आहे काय ? स्टेज म्हणजे तुम्हा लोकांना आपल्या घरचा खेळ वाटतो की काय ? तो लालजी (लालजी म्हणजे राम गणेश गडकरी) जर आज येथे असता, तर त्याने तुम्हा दोघांची खेटराने पूजा केली असती ! मला आजचा तुमचा हा प्रकार मुळीसुद्धा आवडला नाही."

दिनकर आणि दीनानाथ दोघेही खजील झाले.

*　　　*

नाटकाबद्दल तात्यासाहेबांची दृष्टी वाङमयीन दृष्टीने किती मार्मिक होती, त्याचा एक प्रसंग मला आठवतो.

बलवंत मंडळीचा मुक्काम बडोद्यास होता, आणि तात्यासाहेब दोन दिवसांसाठी तेथे आलेले होते. तात्यासाहेबांचे एक फार जवळचे मित्र श्री. नूलकर त्या वेळी बडोदे राज्यात एका मोठ्या हुद्यावर होते. सयाजीराव महाराजांच्या खास मर्जीतले दुसरे एक बडे अधिकारी होते, त्यांना गायकवाड महाराजांनी स्वखर्चाने इंग्लंडला पाठवून मुद्रणकलेत पारंगत करून आणले होते आणि ते गृहस्थ बडोदे राज्याचे मुद्रण-प्रकाशन विभागाचे सर्वोच्च अधिकारी होते. महाराजांच्या खास मर्जीतले, म्हणून त्यांचा दरबारात मोठा वचक असे.

ह्या गृहस्थांनी एक नाटक लिहिले होते. सरकार दरबारचा खास पाठिंबा, बलवंत मंडळी ज्यांचा शब्द सहसा खाली पडू देणार नाही अशा तात्यासाहेबांचे नूलकर हे परम मित्र, तेव्हा त्यांना आपले नाटक वाचून दाखवावे व त्यांच्या मार्फतीने ते बलवंत मंडळीच्या रंगभूमीवर आणावे, असा त्या गृहस्थांनी घाट घातला.

भेट ठरली. चहा-फराळ वगैरे झाला आणि नाटकाचे वाचनही झाले !

आणि त्यानंतर तात्यासाहेबांनी, साहित्याच्या दृष्टीने, रंगभूमीच्या दृष्टीने, त्या नाटकातली एक एक दोष-स्थळे जेव्हा लेखक-महाशयापुढे अत्यंत समर्पक दृष्टीने मांडायला सुरुवात केली, त्या वेळी, ते विवेचन ऐकून, 'कुठून मी नाटक लिहायचा फंदांत पडलों !' असे त्या गृहस्थाला होऊन गेले. नाटककार होण्याची योग्यता माझ्या अंगी नाही, अशी स्पष्ट कबुली त्या गृहस्थाने दिली.

हा सारा प्रसंग अजूनही माझ्या दृष्टीमुळे जशाचा तसा उभा आहे.

*　　　*

नटाचे जीवन एका दृष्टीने मोठे खडतर. लोकप्रियतेच्या लाटेवर असेपर्यंत सर्व ठीक असते. पण ही लाट ओसरली की मग त्या नटाचे हाल कुत्रे सुद्धा विचारीत नाही, असा बहुश: अनुभव आहे. असे होण्याला काही अंशी स्वत: नटही जबाबदार असतो. तो लोकप्रियतेच्या शिखरावर असताना अनेक श्रीमंत त्याच्या भोवती घोटाळत असतात, चांगले चांगले विद्वान त्याला 'अहो, जाहो' करीत असतात, चारी बाजूंनी त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव होत असतो, आणि त्या भरात त्या विचाऱ्या नटाला वाटत असते, आपला हा मोठेपणा आणि आपली ही लोकप्रियता आपल्याला कधीच सोडून जाणार नाही. पण, पुढे अनुभव येतो, तो निराळाच.

ज्या लोकांना आपण 'आपले' म्हटले अशा लोकांना तरी आयुष्यात असा खडतर अनुभव येऊ नये, म्हणून तात्यासाहेबांनी त्या दृष्टीनेही काही योजना केली होती. पुण्यास त्यांनी 'श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स'

(पुढील मजकूर १५०)

ग्रंथसमीक्षण

—प्रा. भवानीशंकर पंडित

मराठी कविता : प्राचीन कालखंड. इ. स. ११५०–१८४०

[संपादक — वा. रा. ढवळे व व. दि. कुळकर्णी; प्रकाशक–मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, मुंबई ४; मूल्य रुपये दहा; पृष्ठसंख्या २०+२३२]

प्राचीन मराठी कवितेचा प्रस्तुत प्रतिनिधिक संग्रह संपादकांनी इ. स. ११५० ते १८४० या प्रदीर्घ कालखंडातील मराठी कवितेमधील विविध वाङ्मयीन प्रवृत्ती, तिचे प्रधान रूपप्रकार, स्थलकालव्यक्तिपरत्वे त्यामध्ये होणारे बदल, त्यामागील काव्यविषयक जाणिवा आणि त्या त्या काळातील वाङ्मयाभिरुची यांचे सम्यक्‌दर्शन घडेल या हेतूने सिद्ध केला आहे. तो त्यांचा हेतू पुष्कळ प्रमाणात तडीला गेला आहे. हा निश्चित हेतू समोर ठेवून यापूर्वीच्या या कालखंडाच्या प्रातिनिधक संग्रहापेक्षा हा निराळा व नवा प्रयत्न केल्याबद्दल संपादक अभिनंदनास पात्र आहेत. आपल्या 'निवेदनात' संपादक सांगतात—"सहाहून अधिक शतके प्राचीन कविता निर्माण होत राहिली. यासाठी तिच्या विविध रूपविलासांचे दर्शन घडविण्यास किमान पक्षी तीन तरी मोठे संग्रह काढणे योग्य ठरले असते." परंतु आहे या एकाच संग्रहाने ते कार्य पूर्णतः साधले आहे. एकोणिसाव्या शतकापूर्वीचे ज्ञानदेवापासून मोरोपंतापर्यंत सर्व कवी एकाच सूत्रात गुंफलेले कमज्यास्त पाण्याचे पण सारख्याच घाटाचे मणी आहेत. वेदान्तपर तत्वज्ञान; भक्तिरस; सगुणोपासना; भारत, भागवत व रामायण यांच्यातील पुराणकथा आणि संतांची चरित्रे हेच त्याचे विषय आहेत. त्यांच्यात विषयांची विविधता, भावनांची भिन्नता किंवा मतांची विचित्रता बहुधा आढळत नाही त्यांच्यात अधूनमधून लोककथा, नीती, सामाजिक व्यवहार, मानवी स्वभाव, हास्यविनोद, शृंगार, सृष्टिसौंदर्य यांच्या निरनिराळ्या छटा उमटलेल्या असल्या, तरी त्यांच्यावर एखाद्या तत्त्वविचाराचे, निवृत्तिमार्गाचे, पुराणकथेचे किंवा भक्तिरसाचे आच्छादन असते. त्यामुळे या काळातील कवितेविषयी सर्वसाधारण जनतेत निःसीम श्रद्धेची भावना दृढमूल झालेली आहे. संत कवींच्या मागून कथा–कवी झाले. आणि नंतर तमासगीर शाहीर पुढे आले. त्यांना समाजातील भाविक प्रवृत्तीची जाणीव असल्यामुळे त्यांनीही आपल्या कवितेत निवृत्तिमार्गाचा, भक्तिरसाचा आणि वेदांतपर तत्त्वज्ञानाचा आपआपल्या कुवतीप्रमाणे पाठपुरावा केला आहे. तात्पर्य, एकोणिसाव्या शतकापूर्वीच्या सात शतकातील कविता जवळपास सारख्याच साच्याची आहे. ती एकांगी आहे. शाहिरी काव्य ग्राम्य असले, तरी तेही कलगीतुऱ्याचे आध्यात्मिक सवालजवाब करते. जुन्या कवितेचे स्वरूप एकेरी आहे खरे. तिने आपल्या कथा पुराणातून घेतल्या आहेत हेही खरे. तरी ती स्वयंस्फूर्त व स्वतंत्र आहे हे विशेष. ती 'वाचकां'साठी 'लिहिण्या'त आली नाही. ती 'श्रोत्यां'साठी निर्माण झाली. लक्षावधी उत्सुक 'श्रोत्यां'नी आपले कान टवकारून 'प्रत्यक्ष' प्रवचनकाराच्या किंवा कथेकऱ्याच्या 'मुखा'ने ती ऐकली, त्याचा अविर्भाव पाहिला आणि तिने त्यांच्या 'हृदयां'ची कायमची पकड घेतली. ती आज सात शतकांनंतरही तशीच टिकून आहे. तिच्यात ज्ञानेश्वरतुकारामादी संतांच्या अलौकिक प्रतिभेचे तेज आहे, मुक्तमयुरांच्या अभिजात वाणीचा विलास आहे आणि रामजोशी व होनाजी यांच्या उद्दाम कल्पनांची चमक आहे. तीत त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. श्रोत्यांशी सरळ संवाद आहे.

रामदासांच्या काव्याविषयी लिहिताना संपादकांनी "रामदासांच्या 'दासबोधा'ला विचारघन काव्य म्हणताना अडचण येऊ नये" असे काहीसे चाचरत भीतीचे शंकाकुल उदगार काढले आहेत. ज्या रामदासांनी स्वतंत्र काव्यविचार मांडला आणि "आधी कवीचा वाग्विलास। तरी मग श्रवणी तुंबळे रस। कवीचेनि मतिप्रकाश। कवित्वास होय ॥ नस्ता कवींचा व्यापार। तरी कैंचा अस्ता जगदोद्धार। म्हणोनी कवि हे आधार। सकळ सृष्टीशी" असा कवींचा यथोचित गौरव केला, त्या रामदासांच्या 'दासबोधा'ला काव्य म्हणताना संपादकांनी शंकाकुल होणे व्यर्थ आहे. 'बोध'पर आणि 'उपदेश'पर काव्ये नसतात की काय? काव्याचे तेही प्रयोजन आहे. देवीदासाच्या 'व्यंकटेशस्तोत्रा'त किंवा रामाजनार्दनाच्या 'आरती ज्ञानेश्वराची'मध्ये जसे 'काव्य' आहे, तसेच ते समर्थ रामदासांच्या 'दासबोधा'त आहे.

या संग्रहात आनंदतनय, रघुनाथ पंडित, नागेश, अज्ञानदास इत्यादिकांच्या कृतींचा समावेश झालेला दृष्टीस पडला नाही. प्राचीन मराठी कवितेत रघुनाथ पंडित आणि त्याचे 'दमयंती स्वयंवर' यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. संस्कृत साहित्यातील 'नैषध' या अभिजात काव्याचा आदर्श समोर ठेवणारा तोच एकुलता एक कवी आहे. त्याची रचना सरस, सुंदर व सुश्लिष्ट आहे. प्राचीनात अन्य कुणी संस्कृतातील अभिजात ललित कृतीचा मराठी अनुवाद केलेला नाही. प्रस्तुत संग्रहात विठ्ठलाच्या 'कूटा'चा अतर्भाव झाला आहे. पण त्याऐवजी त्याच्या 'विद्वज्जीवना'तील "वाग्देवी! उदरानिमित्त सदरा म्यां पाहिल्या सुंदरा। न नोहे जठराग्निशांति विधुरा आल्या कलौ पाहरा। गर्भांधा बधिरापुढें श्रम पुरा तूं पावलीसी गिरा!। हा माते! अपराध तो कविवरा सर्व क्षमावा बरा" या करुणोद्गारांचा अंतर्भाव झाला असता, तर एकोणिसाव्या शतकातील व्यक्तिवाचक कवितेत ते एकरूप झाले असते.

मराठी कवितेला अखंड परंपरा (tradition) आहे. केशवसुत 'कचाप्रत देवयानी'त मोरोपंती रचनेकडे वळले आहेत; आणि 'दूर कोठे'मध्ये "जसें कलहंसा वाहतां प्रवाहीं। प्राप्त मरणाचें ज्ञान नसे कांहीं" या चरणांत रघुनाथ पंडिती वळणाकडे झुकले आहेत. मर्ढेकरांची रामदासांच्या कवितेवरील भक्ती प्रख्यात आहे. प्राचीन काळापासून तो आज घटकेपर्यंतच्या कवितांचे खंड संपादण्याचा संपादकांचा विचार आहे. त्यात परंपरेचे हे सूत्र शक्य तो अबाधित राहू देणे आवश्यक आहे. प्रस्तुत संग्रह प्रत्येकाने जवळ ठेवावा इतका उपयुक्त व संग्राह्य आहे.

(पान १४८)

नावाचा एक छापखाना सुरू केला आणि त्यात बलवंत मंडळीच्या मालकांनाही भागीदार करून घेतले. मुद्रण-व्यवसायात निष्णात म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. गणपतराव गोखल्यांच्या स्वाधीन त्यांनी या कारखान्याचे संचालकत्व दिले होते. हा छापखाना फार लवकर चांगला भरभराटीला आला आणि पुण्या-मुंबईकडील एक आदर्श मुद्रण-स्थळ म्हणून त्याचा लौकिक पसरला. नागपूरचे श्री. आ. रा. देशपांडे (कवी 'अनिल') यांचा पहिला कविता-संग्रह 'फुलवात' हा याच मुद्रणालयात छापला गेला होता. छपाईचे काम करून घेण्यासाठी महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणांहून गणेश प्रिंटिंग वर्क्सकडे लोक धाव घेत.

जमखंडीकरांच्या वाडयात उभारलेल्या या छापखान्यासोबतच तात्यासाहेबांनी 'श्री सरस्वती मंडळ' नावाची एक प्रकाशन-संस्थाही सुरू केली होती. राम गणेश गडकरी यांची सर्व नाटके या श्री सरस्वती प्रकाशन संस्थेतर्फेच प्रसिद्ध झाली आहेत.

श्री सरस्वती मंडळातर्फे एक नमुनेदार मासिकही प्रसिद्ध करावे, असा तात्यासाहेबांचा बेत होता. त्या दृष्टीने थोडी फार तयारीही सुरू होती. पण पुढे, काही कारणामुळे तो बेत सिद्धीस जाऊ शकला नाही.

पुस्तक परिचय

—चंद्रकांत कुळकर्णी

[वि. सा. संघाच्या श्रीशिवाजीसंदर्भ ग्रंथालयात नवीन आलेल्या दोन महत्त्वाच्या संदर्भ ग्रंथांचा परिचय].

१

प्राचीन भारतीय स्थलकोश : [प्रथम खंड]

लेखक—डॉ. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

प्रकाशक—भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे ४.

सुमारे ३७ वर्षापूर्वी डॉ. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांनी 'प्राचीन चरित्रकोश' प्रसिद्ध केला. या चरित्रकोशात त्यांनी वेद-पुराणादी साहित्यातील प्राचीन भारतीय व्यक्तिचरित्रविषयक साधनसामुग्री कोशरूपाने सादर केली. प्राचीन भारतीय भूगोलाचा प्रस्तुत ज्ञानकोश हा एका अर्थाने 'प्राचीन चरित्रकोशा'चेच महत्त्वपूर्ण उपांग आहे.

प्राचीन भारतीय भूगोल हा अत्यंत महत्त्वाचा, परंतु अवाढव्य असा विषय आहे. वेद, महाभारत, पुराणे यांसारखे हिंदू धर्मग्रंथ, बौद्ध आणि जैन धार्मिक साहित्य, पाणिनीय व्याकरण, चिनी प्रवासवर्णने, शिलालेख, ताम्रपट, धर्मशास्त्र, उत्खननशास्त्र, स्थापत्यशास्त्र, नाणकशास्त्र अशा अनेक ज्ञानशाखा त्यामध्ये अंगभूत असून, त्या प्रत्येकीमध्ये गेल्या १५० वर्षात विपुल संशोधन कार्य झाले आहे. या साऱ्यांमधून प्राचीन भारताचे सुसंबद्ध भौगोलिक दर्शन घडविणे हे अत्यंत कष्टाचे व जिकिरीचे काम असून ते यथाशक्य करण्याचा प्रयत्न प्रस्तुत कोशात चित्रावशास्त्रींनी केला आहे. अशा तऱ्हेचे काही फुटकळ कोश इंग्रजीमध्ये उपलब्ध आहेत. उदा.—नंदलाल डे कृत 'जिऑग्रफिकल डिक्शनरी ऑफ एन्शन्ट इंडिया.' ज्ञानकोशाच्या धर्तीवर प्राचीन भूगोलविषयक समग्र माहिती सादर करण्याचा भारतीय भाषेतील हा पहिलाच प्रयत्न आहे.

या कोशाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये

(१) या कोशामध्ये वेद, उत्तरकालीन वैदिक साहित्य, पाणिनीय व्याकरण, कौटिलीय अर्थशास्त्र, वाल्मीकि रामायण, महाभारत, पुराणे, तसेच मध्ययुगीन काव्य आणि शब्दकोश साहित्य या वैदिक-पौराणिक परंपरेच्या ग्रंथांतील, तसेच पर्शियन, ग्रीक, बौद्ध, जैन, चिनी, शिलालेख आदी पूरक साहित्यातील स्थलनामांचे सविस्तर विवरण अकारादि क्रमाने दिले आहे.

(२) या कोशग्रंथात प्राचीन बृहत्तर भारतातील देश, जनपदे, लोकसमूह, राज्यविभाग, नगरे, ग्रामे, पर्वत नद्या, समुद्र, वने, तीर्थस्थाने, तसेच पृथ्वीचे विभिन्न उपविभाग आदींची माहिती सर्वप्रथम वैदिक संदर्भ, आणि तदनंतर पाणिनीय व्याकरण, वाल्मिकीरामायण, महाभारत, बौद्ध आणि जैनसाहित्य, टॉलेमी, चिनी साहित्य आणि मध्ययुगीन साहित्य अशा क्रमाने ग्रथित केले आहे.

(३) कोशातील हरेक स्थलाची माहिती प्राचीन साहित्यात निर्दिष्ट भौगोलिक स्थान, आधुनिक भौगोलिक स्थान, स्थलवैशिष्ट्य, नामांतरे, नामव्युत्पत्ती, आधुनिक स्थानासंबंधीची मतांतरे, प्राचीन साहित्यातील विभिन्न निर्देश, स्थापत्यावशेष आणि उत्खननावशेष अशा क्रमाने दिली आहे. तीर्थस्थानांच्या वर्णनात तीर्थोपासनेचा इतिहास, आख्यायिका, मंदिरस्थापत्य वर्णन, उपासनाविधी, यात्रापरंपरा अशा क्रमाने माहिती दिली असून आवश्यक तेथे वाल्मीकी रामायण, महाभारत, पौराणिक साहित्यातील मूळ संस्कृत श्लोक आणि त्याचा मराठी अनुवाद दिला आहे. विषयाच्या

विशेष स्पष्टीकरणासाठी आवश्यक तेथे परिपत्रकेही दिली आहेत.

प्रस्तुत 'प्राचीन भारतीय स्थलकोश' प्रत्येकी ८०० पृष्ठांच्या तीन खंडांमध्ये प्रकाशित होणार असून या खंडांत 'ख' अखेरच्या स्थलांचा समावेश करण्यात आला आहे.

१९६१ च्या पानशेत जलप्रलयामध्ये या ग्रंथाचे संपूर्ण हस्तलिखित वाहून गेले होते. परंतु शास्त्रीबुवांनी तरुणाला लाजवेल अशा उत्साहाने व परिश्रमाने हा कोश परत तयार केला त्याबद्दल अखिल महाराष्ट्र चित्रावशास्त्रींचा ऋणी राहील.

आदर्श मराठी शब्दकोश

संपादक— डॉ. प्रल्हाद नरहर जोशी
प्रकाशक—विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे २ किंमत रु. ५०.

मराठी भाषेच्या आधुनिक कालखंडात शब्द-कोश–रचनेचे प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभा-पासून झालेले दिसतात. डॉ. कॅरेचा शब्दकोश, जेम्स मोलसवर्थचा शब्दकोश, रघुनाथ भास्कर गोडबोल्यांचा 'हंसकोश', वासुदेव गोविंद आपट्यांचा 'मराठी शब्द-रत्नाकर, विद्याधर वामन भिडयांचा 'सरस्वती शब्दकोश' दात्यांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' याआधी तयार करण्यात आले आहेत परंतु गेल्या पंचवीस वर्षांतील समाजजीवनाचा सर्वांगीण विकास जो झाला आहे त्याचा परिणाम भाषेवरही झालेला आहे. नवीन नवीन शब्दांची भर भाषेत पडत आहे. त्याचे जुने अर्थ बदलत आहेत. या परिस्थितीत नवीन शब्दकोशाची अत्यंत आवश्यकता होती. प्रस्तुत शब्दकोश ती अडचण बऱ्याच प्रमाणात दूर करील.

या शब्दकोशाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये—

(१) संतसाहित्य, पंडिती काव्य, प्राचीन गद्य ग्रंथ, महानुभावी वाङ्मयाचा नवा आविष्कार, ऐति-हासिक कागदपत्रे, बखरी, पोवाडे, शिलालेख, ताम्रपट इत्यादींचे परिशीलन करून अनेक प्रमुख शब्दांच्या नोंदी या शब्दकोशात करण्यात आल्या आहेत. ग्रामीण लोकभाषा, शासनव्यवहार, शासकीय शोधांचे आवि-ष्कार व उपयोजन लक्षात घेऊन अनेक नव्या शब्दांच्या नोंदी पूर्ण केलेल्या आहेत.

(२) शब्दांचा वाच्यार्थ दिल्याने काम भागते असे नाही. वाङ्मयात व इतर लोकव्यवहारातही लक्षणेने शब्दांना वेगवेगळे अर्थ प्राप्त होतात. त्यांचाही निर्देश विविध प्रकारचे अर्थ देताना करण्यात आला आहे.

(३) वेगवेगळ्या प्रकारची माहितीपूर्ण परि-शिष्टे देण्याचे काम शब्दकोशाचे नाही. परंतु आजची सामाजिक गरज लक्षात घेता ज्ञानकोशात सापडणारी वेचक माहिती कोशाच्या शेवटी भरपूर परिशिष्टे देऊन वाचकांना उपलब्ध करून दिली आहे.

(४) 'मराठी शब्दकोश परंपरा', 'मराठीचा उदय विस्तार' आणि 'मराठी शब्दसंपत्ती व शब्द-साधना' हे तीन स्वतंत्र असे भाषाविषयक निबंध कोशाच्या प्रारंभी जोडून कोशकर्त्यांनी अभ्यासकांची चांगली सोय केली आहे.

देवा !—

तू मांगल्याचं निधान आहेस की अमांगल्याचं ? करुणेचं निधान आहेस की क्रौर्याचं ?

तू जर मांगल्याचं निधान असतास, तर ही अमंगलाचं आगर असलेली पृथ्वी कशी निर्माण केली असतीस ?

आणि माणूसही !

तू मृत्यु निर्माण केलास, याचं दुःख नाही मला–

आणि म्हणून काही मी तुला क्रूर म्हणत नाही. तू ते उपकारच केलेस खरोखरी आमच्यावर.

कारण, मृत्यु नसता, विनाश नसता, तर जगातली सगळी घाण, सगळं हीण, सगळं तण नष्ट कसं झालं असतं ? जगातलं सगळं जीर्ण शीर्ण नाहीसं कसं झालं असतं ?

आणि ही पृथ्वी,—ही अमंगळ, अभद्र, अमानुष पृथ्वी !——ही इतकी तरी स्वच्छ कशी राहिली असती ?

म्हणून मला वाटतं,—

मृत्यु हे वरदान आहे पृथ्वीला ! असं वरदान की, त्यामुळं ती थोडी बहुत तरी लायक उरली आहे राहायला.

मला वाटतं, आपण पृथ्वीला असं काही वरदान दिलंय, याची जाणीव नव्हती तुला——

स्वतःच्या सामर्थ्याच्या मस्तीत तिला हा शाप दिला असला पाहिजेस तू.

हो, शापच !

तू पृथ्वीला शाप दिलास मृत्यूचा, विनाशाचा आणि तोही अत्यंत क्रूर !

तूच पहा ! ती जे जे काही उत्पन्न करते——

सुंदर, कोमल, भव्य, विशाल, उदात्त !

ते ते सगळं तीच नाहीसं करून टाकते—

वाघीण आहे ही पृथ्वी शुद्ध !

ती जशी वीत जाते आणि विता विता आपली पिलं खात जाते—

तशी आहे ही चांडाळीण—

आपली निर्मिती, आपली संतती आपणच खाऊन टाकणारी !

कोण म्हणतो, सीता या चांडाळणीच्या पोटी आली म्हणून ?

कोण म्हणतो ?

कोण ? कोण ? कोण ?

वाल्या कोळी ? तो वाटमाऱ्या ?

खोटं बोलतो वाल्या ! अगदी धादांत, निखालस खोटं—

पृथ्वीवरला कोणताही माणूस असं भयानक असत्य कधी बोलला नसेल—

खोटं, खोटं, खोटं !

निष्पाप, निर्मल, निरागस सीता !

तेवढी एकच अनघा या पापी पृथ्वीवर जन्माला आली—

कोमलतेची मूर्ती ! शुचितेची, मांगल्याची, कारुण्याची !

पण मग लक्ष्मणाला कसं टाकून बोलली ती ? त्याच्यावर नाही नाही ते आरोप कसे केले तिनं ?

लक्ष्मण ! बंधुभावाचा आदर्श लक्ष्मण !

पण निर्बुद्ध, निर्घृण होता तो !

स्वतःच्या तरण्याताठ्या अश्राप बायकोला भावाच्या प्रेमाखातर आवाळलीन त्यानं—

सीतेला, बाळंतपणाला टेकलेल्या सीतेला—

भावाच्या आज्ञेपायी घोर अरण्यात एकटी सोडून दिलीन त्यानं—

आणि, तेही फसवून, तो धाय मोकलून रडत असताना—

त्याला आयुष्यात फक्त एकच भावना कळली—
भावावरलं प्रेम !
एकच गोष्ट कळली—
भावाची आज्ञा !
निर्बुद्ध, निष्करुण, मूर्ख लक्ष्मण !
त्याला सीता टाकून बोलली !
काय चुकलं तिचं ?
मारीचाचं कपट रामाला उमगलं नाही.
तसंच तिलाही !
काय चुकलं तिचं ? काय चुकलं ? काय चुकलं ?
त्यामुळे रामाचा आर्तरव कानांवर पडताच ती घाबरली, लक्ष्मणावर रागावली, चिडली—
आणि बोलू नये ते बोलली त्या मूर्खाला.
काय चुकलं तिचं ?
ती सीता——
तारुण्य वनवासात गेलं, परगृहवासाचं लांछन लागलं, अग्निदिव्य करावं लागलं——
अशी ही सीता—
तिनं पतीसाठी वनवास भोगला, त्याच्या प्रतिष्ठेसाठी अग्निकुंडात उडी घेतली—
तो पतीच मुळी उलटला तिच्यावर—
अशी सीता–अनघा, अभागी—
जगाच्या पुराणात, इतिहासात अशी अनघ, पण अभागी, परम अभागी स्त्री झाली नसेल दुसरी !
द्रौपदीवर जास्त संकटं ओढवली तिच्यापेक्षा —
पण तिचे पती मुठीत होते तिच्या—
शिवाय कृष्णसखा ! तो तर उभा होता तिच्या पाठीशी रात्रंदिवस !
नलराजानंही दमयंतीला फसवली—
आणि अर्धं वस्त्र फाडून सोडून गेला तो तिला घोर अरण्यात—
पण कलीचा संचार त्याच्या शरीरात झाल्यावर !
तरी सुद्धा, दमयंतीला माहेरी जाण्याचा सल्ला त्यानं दिला आणि मार्गही दाखवला तिथं जाण्याचा—
पण राम, मर्यादापुरुषोत्तम राम !
त्या पुण्यश्लोकानं राक्षसांच्या आणि वानरांच्या समुदायासमोर निर्भर्त्सना केली सीतेची आणि अग्निदिव्य करायला लावलं तिला—

आणि, ते केल्यानंतरही ती आसन्नप्रसव स्थितीत असताना, तिला काहीही सुगावा लागू न देता, घोर अरण्यात पाठवून सोडून दिली——
अशी ही अनघ, अभागी सीता——
नाथ असून अनाथ झालेली, पती असून अपतिका झालेली——
पावित्र्याची, उदात्ततेची, कारुण्याची मूर्ती—
अच्छोदाहून निर्मल, शिरीषाहून कोमल, चंद्राहून शीतल, अमृताहून मधुर —
पण वज्राहून कठोर निष्ठा असलेली पतिव्रता—
अशी ही सीता——
ही कशी निपजली असेल या अमंगल, अभद्र, अमानुष पृथ्वीच्या कुशीतून ?
खोटं, खोटं, खोटं लिहिलं त्या वाल्या कोळयानं—
पण एक मात्र विलक्षण सत्य लिहिलं त्यानं——
कोणतं सत्य ?
पृथ्वीनंच शेवटी सीतेला गिळून टाकली हे !
ती चांडाळीण जगाच्या आरंभापासून आपण निर्माण केलेलं सगळं काही गिळीत आलेली आहे——
आणि तरी सुद्धा तिचा चेहरा किती गंभीर, किती शांत !
जणू काही तिनं कधी काही गिळलंच नाही——
इतकी गंभीर, इतकी शांत——
जणू काही आपल्या अंगावर अजगराप्रमाणं अस्ताव्यस्त पसरलेल्या हिमालयाचं गांभीर्य आणि शांतपणा गिळून बसली आहे ही चांडाळीण !
देवा, कशाला उत्पन्न केलीस तू या लावसटीला ?
आणि हा माणूस ?——
हा तरी कशाला उत्पन्न केलास तू ?
काय उद्देश होता तुझा त्याला उत्पन्न करण्यात ?
मानवदेहाची प्रतिष्ठा सिद्ध करायची होती की विटंबना दाखवायची होती तुला ? काय, होतं तरी काय तुझ्या मनात ?
'देह विटाळाचा गोळा । विटाळांतची जन्मा आला '——
——समर्थ रामदासांनी म्हटलय !

किती किळसवाणं, पण किती सत्य, किती निर्घृण सत्य आहे हे!

माणूस उपजतो, वाढतो, म्हातारतो आणि मरतो.

कशाला लावून दिल्यास तू या अवस्था त्याच्या मागे?

खंगलेलं, सुरकुतलेलं, म्हातारलेलं, घाणेरडं, निरुपयोगी शरीर टाकून देऊन नवा देह धारण करण्याची सिद्धी का दिली नाहीस तू त्याला?

फक्त तीनच अवस्था—बाल्य, तारुण्य आणि मृत्यू अशा तीनच अवस्था,—का दिल्या नाहीस तू त्याला!

वृक्षवेलींना,—काही प्राण्यांनाही—, याच जन्मी आणि याच देही तरुण होण्याची सोय तू करून दिलीस—

ती मेहेरबानी माणसावर का केली नाहीस तू?

म्हातारपणाचा शाप तू का दिलास माणसाला?

विलक्षण सुंदर, विलक्षण प्रतिभाशाली, विलक्षण कर्तृत्ववान्, विलक्षण पराक्रमी पुरुषांना म्हातारे करून, निरुपयोगी आणि निकामी करून, परावलंबी आणि पंगू करून का विटंबना करतोस तू त्यांची?

आपणच स्वत: सर्वश्रेष्ठ म्हणून निर्माण केलेल्या या मनुष्यप्राण्याचा असा का छळ चालवला आहेस तू?

मृत्यू हा शाप नाही. शाप आहे खरोखरी म्हातारपण हा. मृत्यू हा मोक्षदाता आहे त्या शापातून सोडवणारा—

माणसाला आपलं विद्रूप, आपल्या सर्व शक्तींचा ऱ्हास आणि नाश पहावा लागतो म्हातारपणी.

असा क्रूर खेळ का खेळतोस तू त्याच्या जीवनाशी?

जन्मापासून मरेपर्यंत, उठल्यापासून निजेपर्यंत तेच ते कंटाळवाणं, किळसवाणं, लाजिरवाणं जीवन त्याच क्रमानं, त्याच पद्धतीनं वर्षानुवर्ष जगत राहायचं आणि शेवटी म्हातारं होऊन जायचं,—झिजत, कण्हत, कुजत मरणाची वाट पाहात पडायचं—

किती बेसूर, किती असह्य जिणं आहे हे?

का लावलंस तू हे दीनवाणं जिणं माणसाच्या मागे? का शाप दिलास त्याला म्हातारपणाचा?

झाडांची पिकलेली, किडलेली पानं गळून पडतात आणि नवी पालवी फुटते त्यांना.

शेकडो वर्षे जगतात ती.

टवटवीत दिसतात प्रत्येक नव्या ऋतूत.

ते चिरतरुण वृक्ष,—तुझ्या अमंगळ पृथ्वीत आभास उत्पन्न करतात चिरयौवनाचा, चिरजीवनाचा!

मोराचा पिसारा झडतो, पुन्हा येतो.

साप कात टाकतो, तोही तरुण होतो पुन्हा.

हो याच जन्मी याच देही तरुण होण्याची किमया माणसाला का दिली नाहीस तू? म्हातारपण का लावलंस त्याच्या कपाळी?

सिद्धार्थाला पहावलं नाही म्हातारपण आणि म्हणून ऐन तारुण्यात पत्नीचा, तान्ह्या मुलाचा आणि राजसिंहासनाचा त्याग करून तो युवराज निघून गेला अरण्यात.

असं प्रत्येक माणसानं केलं तर?

तर तुझी स्थिती काय होईल? तुझ्या या पृथ्वीची स्थिती काय होईल?

ओसाड पडून जाईल ती.

तुझ्या सृष्टीतले इतर कोट्यवधी निष्प्रज्ञ, निष्प्रतिभ, निर्वाक् प्राणी तेच ते जिणं जगत रहातील निमूटपणानं पृथ्वीवर. पण, चौऱ्याऐंशी लक्ष योनीत श्रेष्ठ म्हणून जो हा माणूस तू निर्माण केलास, तो मात्र नाहीसा होऊन जाईल पृथ्वीवरून—

तुझ्यावर, तुझ्या या क्रौर्यावर सूड घेण्याचा एकच मार्ग मोकळा आहे माणसाला—

सिद्धार्थानं अवलंब केला त्या मार्गाचा आणि तुझं अस्तित्वच मुळी नाकारलं.

इतर कोणत्याही धर्मसंस्थापकाला धारिष्ट झालं नाही तुझं अस्तित्व नाकारण्याचं.

ते अचाट अलौकिक साहस सिद्धार्थानं केलं आणि तुझं अस्तित्व नाकारणारा एकमेव अभिनव धर्म स्थापन केला जगात.

हे दु:खमय जग आणि या जगातलं दु:खमय जीवन निर्माण करणारा जो तू!—त्या तुला नाकारणारा एवढा एकच धर्म आहे जगात!

येशू ख्रिस्त!—

स्वत:ला तुझा एकुलता एक लाडका पुत्र म्हणवणारा येशू ख्रिस्त !

तो तुझ्या नावानं तळमळत--

" माझ्या देवा, माझ्या देवा, मला का रे मोकललंस तू !--"

--असा आक्रोश करीत सुळावर गेला, तळमळत, तडफडत, लोंबकळत मेला वधस्तंभावर.

आणि तोही गुन्हेगारांच्या सान्निध्यात ! तुझा पुत्र म्हणून मिरवणाराची, तुझा प्रेषित म्हणून तुझ्या राज्याची द्वाही या जगात पुकारणाऱ्या त्या पुण्यात्म्याची अशी विटंबना केलीस तू--

सिद्धार्थ शहाणा ठरला आणि ख्रिस्त भाबडा !

तुझा हा सगळा दुष्टावा ओळखला माणसानं--

किती झालं, तरी तो तुझीच निर्मिती, तुझीच संतती आहे ना ?

तुझा विलंदरपणा त्याच्या ठिकाणी उतरलाच असेल की नाही थोडा तरी ?

तू त्याला प्रज्ञा, प्रतिभा आणि सर्जनशक्ती दिलीस--

त्याहीपेक्षा कोणत्याही प्राण्याला नसलेली वाक्सिद्धी !

या सगळ्या साधनाच्या जोरावर सौंदर्याची सृष्टी निर्माण केलीन त्यानं--

अशी सृष्टी की, जीत मृत्यू नाही, म्हातारपण नाही, दु:ख नाही, कोणत्याही प्रकारचा अमंगळपणा नाही, न्हास नाही किंवा नाश नाही--

जितकी सुंदर, तितकीच विचित्रही.

जितकी भव्य, तितकीच भीषणही

अंतराळात त्यानं स्वर्गलोक उत्पन्न केला, तर पाताळात नागलोक.

स्वर्गात सुरा, तर पाताळात वारुणी. स्वर्गात अप्सरा, तर पाताळात नागकन्या.

दोघींचेही स्वरूप भिन्न ! पण दोघीही आपआपल्या परीनं सारख्याच रम्य आणि अभिगम्य !

या सृष्टीतलं दु:ख सुद्धा सुखकर वाटावं, डोळ्यांना जरी पाण्याच्या धारा लागल्या, तरी मनाला मात्र त्या अश्रुवर्षावामुळं शांतता आणि प्रसन्नता वाटावी, अशी किमया निर्माण केलीन त्यानं.

तू दिलेल्या प्रत्येक देणगीचं माणसानं असं चीज केलं, प्रत्येक देणगीचा असा सदुपयोग केला.

पण तू ? तू काय केलंस, देवा ?

आपण उत्पन्न केलेल्या माणसानं ही जी अपर सृष्टी निर्माण केली, हे जे कल्पनेचं रमणीय विश्व उभं केलं, त्या या त्याच्या कलाकृतीचं, त्या त्याच्या अपूर्ववस्तुनिर्माणक्षमतेचं कौतुक केलंस का तू ?

काय केलंस तू ?

तू देवा, तू-तू त्याही सृष्टीला विनाशाचा शाप दिलास !

संगीत ही माणसानं निर्मिलेल्या सर्व कलांची शिराणी--

मानवी वाणीचा तो अतीव मधुर, अति उदात्त विलास.

तसंच नाट्य आणि नृत्यही.

या दोन कला म्हणजे मानवी रूपातली सगळी चारुता आणि चापल्य यांचा आविष्कार !

अशा या तीन श्रेष्ठ कला--पण तू काय दशा करून टाकलीस देवा, त्यांची--

माणूस जितका नश्वर, तितक्याच याही कला नश्वर करून टाकल्यास तू !

माणसाचं तारुण्य हेच या कलांचं आयुष्य ! ते जोपर्यंत टिकेल, तोपर्यंतच या कलांना बहर ! ते कोमेजत चाललं, कोळपून गेलं, म्हणजे कोळसा होऊन जातो या कलांचाही !

शिल्प, चित्र आणि साहित्य या तीन कला त्या मानानं दीर्घायुषी. पण जिवंत कला नाहीत त्या. क्षणोक्षणी सौंदर्याचे नवनवे उन्मेष आणि विभ्रम व्यक्त करणाऱ्या सचेतन कला नाहीत त्या. शिल्प आणि चित्र या कला तर जडच ! निसर्गाचा, जीवनाचा, सौंदर्याचा फक्त एकच क्षण त्या एका वेळी अंकित करतात. तोही निश्चेतन, मूक क्षण !

या तीन कलांत साहित्य ही त्यातल्या त्यात सचेतन, जिवंत कला.

कारण शब्द-मानवी वाणी-हे तिचं आकाराला येण्याचं साधन.

शब्द हा आकाशाचा गुण. त्या गुणाच्या आविष्कारातून उत्पन्न होणारं साहित्य आकाशाइतकंच तेजस्वी, विशाल आणि अनंत असायला हवं. असतंही केव्हा केव्हा. आकाशाप्रमाणं चिरंतनही !

पण छे ! ते कुठलं घडायला ?

शाप दिला आहेस ना देवा, तू माणसाला,—तुझ्या-प्रमाणच, तुझ्या सगळ्या कृती, सगळ्या कला, सगळी निर्मिती विनाशी होईल म्हणून ?

पण माणूस ? ज्ञानवृक्षाचं फळ खाऊन शहाणा, जागृत, स्वतंत्र झालेला माणूस !

ज्ञानवृक्षाचं फळ ? हो, ज्ञानवृक्षाचं फळ !

"तू खाऊ नकोस," म्हणून माणसाला वजावून निक्षून आज्ञा दिलेलं ते ज्ञानवृक्षाचं फळ !

आदिस्त्रीनं, तुझी आज्ञा मोडून, ते खाण्याचा मोह पाडला आदि मानवाला.

त्यानं ते खाल्लं आणि त्या दिवसापासून तो ज्ञानी झाला, जरामरणाचं भय लागलं त्याच्या मागे.

तू शाप दिलास त्याला, त्याच्या संतानांनाही आणि नष्टचर्य ओढवलं मानवजातीचं—

पण तीच सफलता ठरली मानवाच्या जीवनाची. आयुष्याचा उपभोग घेण्याची, सृष्टीवर स्वामित्व गाजवण्याची,- त्यासाठी वाटेल ते कष्ट आणि साहस करण्याची ईर्ष्या उत्पन्न झाली त्याच्या ठिकाणी आणि जीवन यशस्वी झालं त्याचं. तुझा निर्बुद्ध गुलाम राहिला नाही तो. तू त्याला विनाशी केलास, त्याची सर्व निर्मितीही विनाशी करून टाकलीस, देवा ! पण तो स्वामी झाला आपल्या सर्व शक्तींचा, कर्ता आणि भोक्ता झाला जीवनाचा !

पण केवढी किंमत द्यावी लागली त्यासाठी माणसाला ? आज जे भूतकाळातलं कला, साहित्य, इतिहास इत्यादी काही अल्प स्वल्प आपल्या हाती परंपरेनं लागलेलं आहे, ते सगळे अवशेष आहेत माणसानं गेल्या हजारो वर्षांत स्वतःच्या अचाट कल्पकतेनं, जिज्ञासेनं आणि कर्तृत्वानं निर्माण केलेल्या प्रचंड संस्कृतीचे ! विनाशाच्या शापातून निसटलेलं संचित धन आहे ते त्या विराट् मानवी संस्कृतीचं !

माणसानं उत्पन्न केलेलं साहित्य हा जसा त्याच्या सौंदर्यसृष्टीचा आपल्या हाती लागलेला अवशेष आहे, तसाच तुझ्या सर्वविध्वंसक शक्तीशी झुंज देऊन त्यानं निर्माण केलेल्या संस्कृतीचा तो अवशिष्ट इतिहासही आहे. त्यावरून आज हे आम्हाला कळतं की, जगाच्या बाल्यावस्थेपासून तुझ्याशी झगडत झगडत माणसानं केवढी अपरसृष्टी निर्माण केलेली असावी !

सृष्टीतले चौऱ्याऐंशी लक्ष योनींतील इतर सगळे प्राणी ही निव्वळ खेळणी आहेत तुझ्या सर्जनाच्या आणि संहाराच्या शक्तीची ! अनंतकोटी ब्रह्मांडनायक असा जो तू ! त्या तुझा,—देवा, त्या तुझा प्रतिस्पर्धी आहे फक्त एकटा माणूस ! तुझ्या दुष्टाव्यावर मात करून त्यानं निर्माण केलेली विराट् संस्कृती हे त्या स्पर्धेचं प्रदर्शन आहे आणि साहित्य हा तिचा इतिहास !

इतर कलांत आणि साहित्यांत फरक आहे हा. त्या कला मुक्या आहेत. वाचा नाही त्यांना. उघडच आहे. जे जिवंत नाही, ते बोलणार कसं ? त्या कला माणसाचा, त्याच्या पराक्रमाचा आणि प्रगतीचा, त्यानं तुझ्याशी दिलेल्या झुंजाचा इतिहास सांगत नाहीत,—सांगणं शक्यही नाही त्यांना. बोलून चालून बिचाऱ्या मुक्या, जड, अचेतन कला आहेत त्या !

पण साहित्य ही वाणी आहे मानवाची अनादी काळापासून युगायुगावर निनादत असलेली ! ती कला आहे आणि इतिहासही आहे. उध्वस्त, अवशिष्ट, खंडित, त्रुटित इतिहास ! अनादि कालापासून तू जो हा सर्जनाचा आणि संहाराचा खेळ चालवलेला आहेस, त्या तुझ्या क्रूर लीलालाघवाचाही इतिहास ! तुझ्या विनाशविचेष्टिताचं छिन्न भिन्न स्मारक ! साहित्य नसतं, तर तुझी करुणा भाकणाऱ्या, तुझ्या कृपेची अपेक्षा भावडेपणाने करीत हे किळसवाणं आणि केविल-वाणं जिणं हजारो वर्षं जगत आलेल्या माणसाची तू कशी वंचना केलीस, कसा विनाश केलास, हे कळलं नसतं कधी कुणाला !

पण देवा, माणूस दुबळा असला, तरी लाचार नाही. तू चालवलेला त्याच्या जीवनाचा आणि निर्मितीचा विध्वंस पाहून तोही चिडला —

आणि काय केलंन त्यानं चिडून ?– सूड घेतला तुझ्यावर. तुझ्या सृष्टीतलं सगळं वैषम्य आणि नैर्घृण्य, तुझ्या दुनियेतला सगळा अमंगळपणा आणि सगळी घाण आपल्या साहित्यात उपसून चवाठ्यावर आणली त्यानं. आणि मांगल्याचे निधान आणि करुणेचा सागर असं जे तुझं वर्णन साळचाभोळ्यांनी केलेलं आहे, ते किती खोटं आणि किती फसवं आहे ते दाखवून दिलं जगाला !

पुष्पदंतानं तुझा महिमा गाताना तुझ्याविषयी असं म्हटलंय, –

'अमांगल्यं शीलं तव.

ते खरं आहे अगदी.

तुझं शील अमंगल आहे, म्हणूनच तू उत्पन्न केलीस ही अमंगल पृथ्वी आणि हा अमंगळ माणूसही ! एवढ्यावरच थांबला नाहीस तू. माणसामागे अमंगल जिणंही लावून दिलंस. त्याचं शरीर अमंगल, मन अमंगल, अन्न अमंगल आणि भोगही सगळे अमंगल ! कोणत्याही सुखाचा उपभोग घेतल्यावर नुसती तृप्ती येत नाही त्याला; – वीटही येतो त्या सुखाचा लगेच ! असं सगळं विष कालवलं आहेस तू त्याच्या जीवनात !

उगाच नाही उर्वशीनं, 'नग्न स्थितीत तू माझ्या दृष्टीस पडलास, तर मी तुला सोडून जाईन', अशी अट पुरूरव्याला घातली ! त्याचं ते घामट, केसाळ, मलिन मानवी शरीर पाहून त्याच्याशी कसं रममाण व्हावसं वाटलं असतं त्या स्वर्गांगनेला ?

असं हे अमंगळ, किळसवाणं आणि कंटाळवाणं जिणं माणसाच्या माथी लादताना खंत कशी नाही वाटली देवा, तुला ? इतका निर्घृण कसा तू !

युगानुयुगं माणूस तुझी करुणा भाकीत आलेला आहे, तुझ्या पायांवर लोळण घेऊन धाय मोकलीत आलेला आहे. पण तुझ्या हृदयाला काही पाझर फुटला नाही त्याच्या आक्रोशामुळं !

आणि, 'तथापि स्मर्तृणां वरद, परमं मंगल-मसि' हा पुष्पदंतानं तुझ्याविषयी दिलेला निर्वाळा खोटा पाडलास तू !

त्यानंच कशाला ? जगातल्या सगळ्या धर्म-पुरुषांनी आणि सगळ्या सत्पुरुषांनी केवढा निर्वाळा, केवढा दिलासा दिला आहे माणसाला तुझ्यावद्दल ! तू दयाघन असल्याचा डंका युगानुयुगं पिटीत आलेले आहेत ते !

पण तू ! तू खरोखरी कसा आहेस, देवा ?

कसा आहेस ? कसा आहेस, देवा !

कधी तरी विचार करतोस का तू स्वतः-विषयी ? आत्मपरीक्षण करतोस का तू कधी ?

सिद्धार्थानं जसा तुला नाकारला, तसा तुला नाकारण्याचा प्रसंग आणणार आहेस का तू आमच्या-वर ? काय, आहे काय तुझ्या मनात ?

पण याद राख, देवा ! माणसानं तुला जर का एकदा नाकारलं, तर तुझं काही सुद्धा शिल्लक उरणार नाही या जगात ! अगदी नावनिशाणी देखील !

—विदेही, अमरावती

पाय–वाट

—प्रभाकर पुराणिक

गजर झाला तसे मनोहरराव उठले. उठायलाच हवं होतं. कष्ट होणार होते तरी उठणं भाग होतं. ते कसेबसे उठले आणि चूळ भरून गॅलरीत आले. मधल्या खोलीपासून गॅलरीपर्यंत जायला त्यांना तब्बल तीन मिनिटं लागली.

त्यांनी समोर बघितलं–अजून पहाट व्हायची होती. पूर्वेला सूर्यजन्माच्या वेदना होत होत्या मात्र आणि रात्र ताटकळल्यासारखी वाटत होती.

त्याच सुमाराला चाळीतल्या कोपऱ्यावरचा बबन गाण्याचा रियाज करीत होता. अतिशय कर्कश्श आवाजात नुसतं ओरडणं सुरू होतं. पेटीची साथ घेत तो स्वर काढण्याचा प्रयत्न करीत होता. आवाज आधी पुढे जायचा आणि मागून पेटीचे सूर यायचे. तो मेळ जमत नव्हता आणि त्याचं रेकणं सुरू होतं.

मनोहररावांना हसू आलं. अशक्त शरीराचं ते हसू थोडं भेसूर होतं खरं, परंतु हसणं त्यांना मानवलं. एकदम तरतरी वाटू लागली. ते घरात गेले आणि सतीशला उठवू लागले. दिवसभर खेळून तो अतिशय दमला होता. गाढ झोप त्याला लागली होती.

त्याला जागं करायला मनोहररावांना पंधरा-वीस मिनिटं लागली. तेव्हा तो आळोखेपिळोखे देत कुरकुरत उठला. त्यांनी आतल्या घरात डोकावून बघितलं. शान्ताबाई झोपल्या होत्या. पण ती स्वस्थ झोप नव्हती हे खरं. अनंत काळजीची दाट वीण रंध्रबंधांनी चेहऱ्यावर विणल्यासारखी दिसत होती. एक केविलवाणी झोप !

असं व्हायला नको. तरुणपणी माणसाला शांत झोप मिळावी. आयुष्यातल्या अनेक सुखांपैकी ते एक सुख आहे. ते निरामय स्वरूपात भोगायला मिळावं. झोप म्हणजे दारिद्र्यातलं रंजन आहे. असंख्य सुरंगी स्वप्नांची रंगभूमी झोपेत साकार होते. तिच्यावर पडदा पडायला नको. मनोहररावांना आपले हात अतिशय अशक्त असल्याचं पुन्हा जाणवलं. पडद्यावर आपण दोरी धरून उभे आहोत; आणि आपल्या क्षीण हातांनी ती धरवत नाही. आता नक्कीच अवेळी पडदा पडणार.

बळ पाहिजे आहे. पण ते शक्य नसलं तरी पाहिजे आहे.

त्यांनी सतीशला हाक मारली. तो तोंड ओंबाळून टॉवेलनं तोंड पुसत त्यांच्यापुढे उभा राहिला. अंगात सदरा घातला आणि पायात चपला अडकवून तयार झाला. मनोहररावांनी आधाराला काठी घेतली आणि सतीशच्या खांद्यावर हात ठेवून जिन्याची एक-एक पायरी ते उतरू लागले. दहा–पंधरा पायऱ्या उतरायला त्यांना बराच वेळ लागला.

ते दोघं रस्त्याला लागले तेव्हा उजेड फाकू लागला होता. विजेच्या व टेलिफोनच्या तारांचे अक्षांश-रेखांश आकाश मापत असल्यासारखे वाटले. वारा सुटला होता. हलवायाच्या दुकानात हाळधावर ठेवलेल्या कढईत दूध उकळत होतं. वाफ वाऱ्यात मिसळत होती. वातावरण एकदम सशक्त बाळसेदार वाटू लागलं.

मनोहरराव काठी टेकत टेकत हळूहळू रस्त्यानं चालले होते. सतीश इकडे तिकडे भिरभिरत बघत होता. त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला होता, तो खांदा सैल पाडत होता. त्यांना तो खंबीर आधार वाटेना. सतीश हातातून सुटतोय असं वाटत होतं. त्यांनी त्याच्या खांद्यावरची पकड अगदी घट्ट केली. मनोहरराव त्याच्याशी सारखे बोलत होते.

'हं, टेल् मी, व्हाट इज युवर नेम?'

'माय नेम इज सतीश.'

'व्हाट इज युवर फादर्स नेम?'

'माय फादर्स नेम इज मनोहरराव.'

'हाऊ ओल्ड आर यू?'

'आय ॲम टेन इयर्स ओल्ड.'

'आता सांग, व्हाट इज युवर फादर!'

सतीश गप्प बसला, पण स्वत: मनोहरराव फार अस्वस्थ झाले. आपण कोण हे सतीशला कळणं शक्य नाही. गेल्या काही वर्षांपासून आपण आजारी आहोत आणि सारखे घरीच बसतो. कुठंच जात नाही. खाट, आपण आणि औषध हे त्रैराशिकाचं उदाहरण सध्या आपल्या आयुष्यात सोडवणं सुरू आहे. शेवटी कोण मोकळं होणार कळत नाही. औषध, खाट की.... आपण. नो-नो. दॅट कान्ट बी. दॅट शुडन्ट बी.

जगण्याचंच संजीवन आपण घेत आहोत. इच्छा आकांक्षांची शक्तिद्रव्ये पोषक ठरतील. आणि हे-हे आपल्यासाठी जास्त संजीवक आहे. मनोहररावांनी सतीशच्या खांद्यावरची पकड आणखी घट्ट केली.

खरं तर आपण सतीशला विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर त्याला सांगता येणार नाही. प्रश्न सोपा असला तरी उत्तर कठीण आहे. कारण आपण त्याला काम करताना दिसतच नाही. त्याची आई मात्र इकडे तिकडे जाताना त्याला दिसते. ती काम करते. पण त्या कामाला इंग्रजीत काय म्हणतात हे त्याला ठाऊक नसावं. म्हणजे पोरगा भलताच अडचणीत सापडलेला दिसतो. बाप काम करीत नाही आणि आई काय काम करते त्याला त्याच्याजवळ शब्द नाही.

शान्ता काम करते म्हणजे आपल्या पौरुषत्वाची लक्तरे कर्माच्या दोरीवर वाळत घातल्यासारखी मनोहररावांना वाटतं. कळकट वेडीविद्री आणि ओंगळ. सतीशच्या खांद्यावर हात ठेवून चालता चालता त्यांना फार थकवा आला. लोंबकळल्यासारखं वाटू लागलं फरफटल्यासारखं ते चालू लागले. पण अजून ते गावाबाहेरचं नेहमीचं चिंचेचं झाड यायचं होतं

गेली पाच सहा वर्षं असं सतत चालायचा आज त्यांना एकाएकी एकदम कंटाळा वाटू लागला. नेहमीच्या पायाखालची ही वाट फारच लांब वाटली.

आपल्या आयुष्याचा मांडव एकाएकी अचानक उभारला जाईल असं त्यांना कधीच वाटलं नाही. आपल्याला कसा अचानक हुरूप वाटला याचं त्यांना अलीकडे मधूनमधून आश्चर्यच वाटायचं. तसंच आताही वाटलं.

याच गावातल्या अनाथालयात त्यांना नोकरी मिळाली होती. त्यावेळी त्यांनी अगदी पटकन् ती स्वीकारली. चाळीस रुपयांत स्वत: आणि आई राहू शकत होते. म्हणजे कुठे हात पसरायची पाळी येणार नव्हती. कित्येक वर्षं किती छान चाललं होतं अगदी मजेत. दुसऱ्याच्या दारात तुकडे मोडण्यापेक्षा नक्कीच बरं.

म्हणजे बाप व्यसनात कुजत मेला. आईला मागे ठेवून आणि त्यांना जन्माला घालून. तेव्हापासून केवळ पोटासाठीच जगणं सुरू होतं. बेवारस जनावरासारखं कुणाच्याही कुंपणात जाता. येता तोंड घालून पाला ओरबडून पोट भरावं तसं. तेव्हाचेही दिवस बेटे आता चांगले वाटावे हे मात्र त्यांना विपरीत वाटत होतं.

एकदा कुणा एका मित्राच्या मुंजीला बाहेरगावी जाण्याचा त्यांना लहानपणी योग आला तोच आयुष्यातला पहिला प्रवास; ते गेले. मजा आली. त्यानंतर प्रवासातून परतताना त्यांना लहर आली आणि दोस्ताच्या गळ्यातल्या पाच जानव्यांपैकी दोन जानवी काढून स्वत:च्या गळ्यात घातली. मजेत डोळे मिटले आणि स्वत:चं नाक दाबन घेतलं. नंतर मित्र म्हणाला, 'हे सगळीच घेऊन घे. मला याचा उपयोग नाही. आमचा दादा वगैरे कुणीच असं घालत नाही.'

लोकांनी मग विचारलं; 'मन्या, तुझी मुंज झाली रे?'

'हो'.

'केव्हा?'

'गावाला गेलो तेव्हा'.

नंतरचे दिवस फार बरे गेले. श्रावणातले सण, प्रत्येक द्वादशी, कुणाच्याही मुंजीत अष्टवर्ग वगैरे जेवता आलं. गरमगरम सुग्रास. आई अशीच कुठं तरी जगत होती. दोघांनाही एकमेकांची काळजी नव्हती. शुष्क आणि वांझ झाडांनी निरसपणे तसंच वाढत जावं तसं वाढणं झालं. कुठं तरी वाढणं, कसं तरी पोट

मरणं, अनेक मुलं शाळेत जातात म्हणून 'ट' 'फ' शिकणं वगैरे.

आणि एक दिवस अनाथालयात कारकून म्हणून मनोहरराव लागले. एकमेकांना सोयीचं व्हावं म्हणून दोघं जवळ आले. राहू लागले. असं घर झालं. एवढंच. कसं तरी जगण्याला स्थान मिळालं. आणि मनोहररावांच्या आशाळभूतपणाचे क्षितिज तिथेच संपले. इति–कर्तव्याची पराकाष्ठा झाली. पट्कन ईश्वरावर श्रद्धा बसली.

देव आभाळ काढून माणसाला देतो ते असं. या देण्याचं त्यांना खूप वाटलं. या महादानावर ते खूप खूप संतुष्ट झाले. दानात दडपले गेले. मूठभर साखरेखाली दडपून जिवाच्या आकान्तानं चालण्यात मुंगळ्यानं सुख मानावं तसं मनोहरराव चालू लागले. पुष्टी–तुष्टीच्या कल्पना तिथेच संपल्या.

वयाची पंचेचाळीस–पन्नास वर्षे याच सुखात मनोहररावांनी घालवली. पडेल ते काम सुखानं करणं, मिळेल तो पगार सुखान घेणं आणि जेवणं, झोपणं वगैरे या सुखाच्या आभासावर इतकं विलक्षण प्रेम बसलं की त्यात एक दिवस त्यांची आई जळून पट्कन मेली तरी त्यांना त्याचं विशेष दुःख झालं नाही. जगण्यात अजिबात उणेपण वाटलं नाही.

नंतर त्या दिवशी शान्ता देशपांडे ही गतधवा अनाथालयाचा पत्ता विचारीत आली. आणि हातातलं ओळखपत्र मनोहररावांच्या हाती दिलं. तेव्हापासून ती त्यांच्या आयुष्यात आली. पंचवीस–सव्वीस वर्षांच्या त्या पिचलेल्या बाईनं जणू आयुष्याचीच ओळख सांगितली नि मनोहररावांच्या ह्या संपलेल्या सुखाच्या क्षितिजावर येऊन पोचली. तिनं घरात प्रवेश केला. पुढे किती चालायचं याचा विचार नाही. कोण दमणार आहे, कोण आधी थांबणार आहे याचा विवेक नाही. आणि चालायला सुरवात झाली सुद्धा.

एक दिवशी शान्ताबाई म्हणाल्या,

" लक्षण ठीक दिसत नाही. "

" कसचं ? "

" तब्येतीचं "

" काय झालं ? "

" मुका पाव्हणा येईल म्हणतो. "

नंतर पहाट उमळून जावी तसं सगळं उमळत गेलं. लहानपणी देशमुख सावकाराच्या मोठ्या सरकार वाड्यामागून सूर्य उगवतो असंच त्यांना वाटत होतं. त्या दिवशीही त्यांनी त्याच वाड्यामागून सूर्य उगवताना बघितला. पण त्याच दिवशी त्यांच्या मनातला वाडा कोलमडला. असे त्यामागून अनेक अनेक वाडे कोलमडत गेले. सूर्य दूर दूर जाऊ लागला. त्यांच्या सुखाचं क्षितिज त्यांच्यापासून खूप दूर गेलं, वाढत गेलं आणि अजूनपर्यंत ते तिथं पोचू शकले नाही.

आता तर ते गेल्या चार पाच वर्षांपासून सारखे आजारी आहेत. सेवानिवृत्त झाल्यावर मिळालेला फंड केव्हाच संपून गेला. अनेक वेळा अर्ज करून करून, वशिले लावून संस्थेने त्यांना पस्तीस रुपये पेन्शन देऊ केली होती. शान्ताबाई दुपारी एका बालक मंदिरात पोरं सांभाळण्याची कामं करायच्या नि सकाळ संध्याकाळ एक दोन घरी पोळ्या वगैरे करून द्यायच्या. कधी मधी पदराखाली झाकून कुठून तरी गोडधोड आणायच्या.

मनोहरराव चालत होते. एव्हाना सतीशच्या खांद्याचा आधार सुटून गेला होता. आणि तो झाडाच्या बुंध्यावरचा सरडा मारायला पळून गेला होता. त्यानं नेम धरून गोटे मारायला सुरुवात केली होती. मनोहररावांनी त्याला जोरानं हाक मारली. तो आला.

त्यांनी ठरवलं येथून परतावं. चिंचेच्या झाडापर्यंत जाणं नको. पण आधारासाठी त्यांनी सतीशच्या खांद्यावर हात ठेवला. तेव्हा त्यांचा एकदम विचार बदलला. ते म्हणाले ' इकडे तिकडे फिरू नको. नीट चल माझ्या बरोबर. आपलं नेहमीचं ठिकाण यायचं आहे. '

' बाबा चला न लवकर घरी. '

' तुला काय होतंय. नीट चल. '

' पण प्रश्न नका विचारू बाबा. मला कंटाळा येतो. '

' शहाणपणा नको करू. आधी चल. '

आणि ते दोघेही चालू लागले. त्यांना चालायला हवं ते म्हणत.

तसं अजून किती तरी चालायचं आहे असं त्यांना वाटे. आपली जुनी सुखाची क्षितिजे ढासळून पांगली

(पुढील मजकूर पान १६४ वर)

कै. तात्यासाहेब कोल्हटकरांच्या आठवणी

—डॉ. वि. भि. कोलते

कै. तात्यासाहेब कोल्हटकरांना मी प्रथम पाहिले ते जलंब स्टेशनवर. त्यांना नांदुऱ्याकडे जायचे होते आणि मला त्याच गाडीने मलकापूर येथे जायचे होते. त्यांनी अंगात बंद गळयाचा कोट घातलेला होता. त्यावर उपरणे होते. डोक्याला फेटा बांधलेला होता. स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर फिरत असलेली गौरवर्णाची ही व्यक्ती म्हणजे तात्यासाहेब कोल्हटकर असे मला माझ्या मित्राने सांगितले आणि त्यांचा परिचय करून घ्यावा अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. मी भीत भीतच त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलो, त्यांना वाकून नमस्कार केला. माझी ओळख मी करून दिली. त्या वेळी मी खामगाव येथील हायस्कूलमध्ये ११ व्या वर्गात शिकत होतो. थोडे फार लेखनही करायला लागलो होतो. त्या वेळी त्यांच्याशी काय बोलणे झाले हे मला आता आठवत नाही. परंतु त्यांनी मला उत्तेजनाचे चार शब्द सांगितले एवढे निश्चित स्मरते खामगाव येथे मी जुलै १९२२ ते मार्च १९२५ पर्यंत शिकायला हायस्कूलमध्ये होतो. 'अलंकारचंद्रिका'कार श्री. गोरे हे आमचे मुख्याध्यापक होते. श्री. गोरे हे अनेक सन्माननीय व प्रसिद्ध व्यक्तींना वेळोवेळी हायस्कूलमध्ये बोलावीत असत. त्या काळात कै. तात्यासाहेब त्या हायस्कूलमध्ये आल्याचे मला मुळीच आठवत नाही.

मी नागपूरला आल्यानंतर मॉरिस कॉलेजमध्ये शिकत होतो. महाराष्ट्र शब्दकोषासाठी वऱ्हाडी भाषेतील शब्द आपल्याकडे पाठविण्यासाठी विदर्भ साहित्य संघातर्फे श्री. अण्णासाहेब खापर्डे यांनी एक पत्र पाठविले. त्या वेळी अनेक दिवस मी काही शब्द गोळा केले आणि नवनव्या शब्दांचे शोधन केले. त्या शब्दसंपत्तीच्या आधारे 'पश्चिम वऱ्हाडातील काही शब्द' या मथळयाखाली मी काही लेख लिहिले. ते 'विविधज्ञानविस्तारा'मध्ये प्रसिद्ध झाले. ते वाचून त्या वेळी तात्यासाहेबांनी मला एक अभिनंदनपर पत्र पाठविले. त्यामुळे मला किती आनंद झाला असेल याची कल्पना करवत नाही! होतकरू लेखकाला उत्तेजन देण्याची तात्यासाहेबांची वृत्ती पाहून त्यांच्याविषयी माझ्या मनात अत्यंत प्रेम आणि आदर निर्माण झाला. त्यांच्या उत्तेजनाने माझ्या अंगावर मूठभर मास चढले आणि नवीन कार्य करण्याला उत्साह वाढला हे सांगावयास पाहिजे असे नाही.

* * *

मी मॉरिस कॉलेजमध्ये असताना इ. स. १९२७ मध्ये तात्यासाहेब एकदा नागपूरला आले. त्या वेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती. ते कुठे उतरले होते हे मला नक्की आठवत नाही. त्यांच्या येथील मुक्कामात मी आणि माझे मित्र प्रा. पंडित त्यांना भेटलो. मॉरीस कॉलेजमधील शारदा मंडळाचा मी त्या वेळी कार्यवाह होतो. तात्यासाहेबांच्या नागपूर येथील मुक्कामाचा लाभ आमच्या मंडळाला मिळावा अशी माझी फार इच्छा होती. त्या वर्षीच्या आमच्या मंडळाच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्षस्थान त्यांनी मंडित करावे अशी मी त्यांना विनंती केली. मला आठवते की त्या वेळी त्यांना चेहेऱ्याचा पक्षघात झाला होता आणि म्हणून ओठातून त्यांना बोलता येत नव्हते. त्यामुळे आमचे आमंत्रण स्वीकारले जाणार नाही अशी भीती होती. म्हणून मी असे सुचविले की, तात्यासाहेबांनी अध्यक्षपद स्वीकारावे आणि अध्यक्ष म्हणून लहानसे भाषण करावे. मुख्य भाषण श्री. अच्युतराव साठे यांनी करावे. श्री. साठे यांना भेटून आम्ही या योजनेला त्यांची मान्यताही मिळवली. या योजनेनुसार, डॉक्टरांची बोलण्यास मनाई असताना देखील, तात्यासाहेबांनी आमचे आमंत्रण स्वीकारले; पण "ओठातून बोलण्याची गरज पडू नये म्हणून ओष्ठ्य वर्ण वगळून बोलण्याचा मी आज प्रयत्न करीन", असे ते म्हणाले. तात्यासाहेबांनी आमंत्रण स्वीकारल्यामुळे

आम्हाला फार आनंद झाला. विशेष आनंदाचे कारण असे की औष्ठय वर्ण वगळून झालेले तात्यासाहेबांचे भाषण हे 'शारदा मंडळा'च्या कार्यक्रमातील एक वैशिष्टय ठरले. आणि खरोखरच औष्ठय वर्ण वगळून झालेले तात्यासाहेबांचे भाषण अतिशय सुंदर झाले. निरोष्ठ रामायण लिहिणाऱ्या मोरोपंतांची आम्हाला आठवण होत होती. या वैशिष्टयपूर्ण भाषणातील तात्यासाहेबांच्या भाषाप्रभुत्वामुळे तात्यासाहेब म्हणजे महाकवी मोरोपंतांची प्रतिमा-अवतार असे उद्गार अनेकांच्या तोंडून मी ऐकले.

आमच्या आग्रहावरून तात्यासाहेबांनी आपल्या स्मरणशक्तीचा प्रयोगही त्या वेळी करून दाखविल्याचे मला आठवते. फळचावर लिहून ठेवलेले अनेक शब्द आम्ही तात्यासाहेबांना आधी वाचून दाखवायचे आणि त्यानंतर अनुक्रमाने तात्यासाहेबांनी ते उच्चारायचे. अमुक क्रमांकाचा शब्द कोणता असा प्रश्न विचारला म्हणजे तो शब्द तात्यासाहेब बिनचूक सांगत आणि उलट एखाद्या शब्दाचा क्रमांक विचारला तर तोही नेमका ओळखत. हे त्यांचे स्मरणशक्तीचे प्रयोग पाहून आम्ही विद्यार्थी थक्क होऊन गेलो होतो.

या वार्षिकोत्सवाच्या प्रसंगी शारदा मंडळाने काही स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यातील कवितापाठांतराच्या स्पर्धेचे पहिले पारितोषक म्हणून 'श्रीमहाराष्ट्रशारदा' हे पुस्तक मला तात्यासाहेबांच्या सहीने मिळाले. ते मी अत्यंत आस्थेने सांभाळून ठेवले आहे. त्यांच्या सहीखाली असलेली तारीख २०-११-२७ अशी मी लिहिलेली आहे.

* * *

यानंतर तात्यासाहेबांशी थोडा निकट परिचय होण्याची संधी सहज चालून आली. श्रीसंतपाचळेगावकर महाराजांशी माझ्या विद्यालयीन जीवनात माझा फार निकटचा संबंध होता. त्यांच्यावर माझी जशी उत्कट श्रद्धा होती तसेच त्यांचेही माझ्यावर उत्कट प्रेम होते आणि म्हणून आपल्या प्रवासात ते अनेकदा मला बरोबर घेऊन जात असत. मला वाटते, ते १९२८-१९२९ साल असेल. उन्हाळयाच्या सुट्टीत महाराजांच्या बरोबर मी जळगाव-जामोद येथे गेलो होतो. तेथे आमचा चार पाच दिवसांचा मुक्काम होता. तात्यासाहेब त्या वेळी जळगाव-जामोद येथेच होते आणि ते महाराजांच्या दर्शनाला दोन तीन वेळा आले होते.

पहिल्या दिवशी तात्यासाहेब महाराजांच्या दर्शनाला आले, त्या वेळी मला फार आनंद झाला आणि थोडे आश्चर्यही वाटले. तात्यासाहेबांचे 'सुदाम्याचे पोहे' मी वाचले होते. त्यावरून तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्वाविषयी माझी जी कल्पना झाली होती तिला धक्का बसला. 'सुदाम्याच्या पोह्या'तील लेख लिहिणारे तात्यासाहेब हे धर्मावर कशी श्रद्धा ठेवणार ? ते पक्के नास्तिक असतील अशी माझी कल्पना होती. परंतु महाराजांना त्यांनी त्या दिवशी ज्या आदराने आणि श्रद्धेने नमस्कार केला त्यामुळे माझ्या या कल्पनेला धक्का बसला. महाराजांनीही त्यांची आस्थापूर्वक चौकशी केली. महाराज मला म्हणाले, 'विष्णु, तात्यासाहेबांसारखे मोठे पाहुणे आले आहेत. त्यांचे स्वागत नाही का करणार ?' काय ते मी समजलो आणि महाराजांच्याजवळ असलेला एक मोठा सर्प मी काढला आणि तात्यासाहेबांच्या गळयात घातला. त्यांनीही तो घालून घेतला. तात्यासाहेबांना इसब झालेला होता. तो भाग महाराजांनी पाहिला आणि त्यावर इलाज म्हणून काही मुळया देण्याचे कबूल केले. त्या मुळयांसाठी दुसऱ्या दिवशी तात्यासाहेब पुन्हा महाराजांकडे आले. त्यांची ती नम्रता पाहून त्यांच्या विषयीचा माझा आदर दुणावला. तात्यासाहेब कदाचित नास्तिक असतीलही; पण आधीव्याधींनी त्रस्त झालेला मनुष्य त्यातून मुक्त होण्यासाठी शक्य असेल त्या सर्व उपायांचा उपयोग करून घेतो. कदाचित याच भावनेतून सत पाचलेगावकर महाराजांसमोर तात्यासाहेब नम्र झालेले असतील, काय सांगावे ?

दुसऱ्या दिवशी जेव्हा ते आले तेव्हा महाराजांना मी हळूच एक विनंती केली. तात्यासाहेब जसे उत्तम नाटककार आणि टीकाकार आहेत तसेच ते चांगले गायकही आहेत हे मला माहीत होते. म्हणून महाराजांना मी विनंती केली की, शक्य असल्यास तात्यासाहेबांच्या गायनाची एक छोटीशी बैठक घडवून आणावी. माझ्या आग्रहावरून महाराजांनी त्यांना तशी विनंती केली आणि आनंदाची गोष्ट अशी की, त्यांनीही ती ताबडतोब मान्य केली. त्या दिवशी रात्री देवळाच्या सभामंडपात बैठक भरली. साथ पाहिजे तशी नव्हती, तरीही तास दीड तास तात्यासाहेबांचे

सुंदर गायन झाले. मला आठवते की 'उगीच का कांता' हे आपले स्वतःचे पद त्यांनी अतिशय तन्मयतेने गायिले. तात्यासाहेबांचा आवाजही अतिशय नाजूक. डाव्या हातात उपरणे धरून आणि तो हात डाव्या गालावर ठेऊन तात्यासाहेब तन्मयतेने गात असल्याचे ते दृश्य मला अजूनही आठवते.

* * *

तेथील मुक्कामात त्यांचा माझा विशेष परिचय झाला. वऱ्हाडी शब्द आणि वाक्प्रचार यावरील माझे लेख त्यांनी वाचले होतेच. त्यासंबंधी त्यांनी विशेष आस्थेने चौकशी केली. त्यांचा त्या वेळचा एक प्रश्न मला अजून आठवतो. मला ते म्हणाले, 'तुमचे लेख विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झाले ही तुमच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. मला असे सांगा की, हे लेख विविधज्ञानविस्तारामध्ये प्रसिद्ध करण्यासाठी कुणाचा वशिला लावावा लागला काय?' मी उत्तर दिले, 'मुळीच नाही. मी पहिला लेख लिहिला आणि तो सरळ संपादकाकडे पाठवून दिला. तो प्रसिद्ध होईल असे मलाही वाटत नव्हते. लेख स्वीकारल्याचे पत्र आल्यानंतर मला फार आनंद झाला.' तात्यासाहेब म्हणाले, 'याबद्दल मी तुमचे विशेष अभिनंदन करतो. याचे कारण असे की, विविधज्ञानविस्तारामध्ये वशिल्याशिवाय सहसा प्रवेश होत नाही.' तात्यासाहेबांचा हा अभिप्राय अजून माझ्या स्मरणात आहे.

* * *

त्यानंतर १९६१ मध्ये मी माझ्या कामासाठी त्यांच्या भेटीला गेलो होतो. त्या वेळी ते थोडे आजारी होते म्हणून नाशिकला जाऊन प्रा. पाटणकर यांच्या घरी राहिले होते. एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मी नोकरीसाठी अर्ज करणार होतो. अर्जासोबत एक प्रशस्ती-पत्रक जोडावयाचे होते. तात्यासाहेबांकडून प्रशस्तीपत्र मला मिळाले तर त्याचा फार चांगला उपयोग होईल असे मला वाटले. आणि म्हणून मी मुद्दाम तात्यासाहेबांना लिहिले. नंतर मी प्रा. पाटणकरांच्या घरी गेलो होतो. त्या वेळी त्यांनी माझी आणि माझ्या वर्गबंधूंची चौकशी केली. श्री. विश्राम बेडेकर हे माझे सहाध्यायी असल्याचे कळताच त्यांना मोठा आनंद झाला. ते म्हणाले, 'तेही चांगले लेखक आहेत, त्यांनी लिहिलेले एक नाटक 'ब्रह्मकुमारी' मी वाचलेले आहे. तुमचेही लेख मी वाचलेले आहेत. तुमची प्रवृत्ती पांडित्याकडे आणि संशोधनाकडे आहे, तर बेडेकरांची प्रवृत्ती स्वतंत्र लेखनाकडे आहे.' आजारी असल्यामुळे तात्यासाहेबांना स्वतः लिहिता येत नव्हते म्हणून त्यांनी मजकूर सांगून इतरांकडून प्रशस्ती-पत्र लिहून घेतले व सही करून मला ते दिले. त्यांच्या या प्रशस्ती-पत्राचा मला चांगला उपयोग झाला हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे अवश्य वाटते.

(पान १६१ वरून)

याचं त्यांना अलीकडे वाईट वाटत असे. सतीश आता कुठं इंग्रजी पहिलीत गेला होता. फक्त दहा वर्षांचा होता. शांताबाई आता ढळता ढळता तरुण दिसू लागल्या होत्या. त्या दोघांना नवेपण येऊ लागले होते. आणि मनोहरराव पिकत होते.

फार उशीरा सुरू केलेला खेळ संपत नव्हता. संपणार नव्हता. ते मात्र थकत होते. पस्तीस चाळीस रुपये पेन्शन मिळत होती. ती आणखी अनेक वर्षं चालू ठेवणं त्यांना आवश्यक होतं. आणि म्हणून जास्त जगायचं होतं. जास्तीत जास्त. तब्येत चांगली ठेवायला हवी होती.

शुभ्र स्वच्छ सकाळ झाली होती. पहाटवारा अजून मधून मधून वाहात होता. झोपेतून उठलेल्या पक्षांचा चिवचिवाट सुरू होता. काही तरुण पोरं त्यांच्याजवळ येऊन पुढे धावत जात होती. मनोहररावांनी मोकळ्या हवेचा एक दीर्घ श्वास घेतला आणि त्यांच्या चित्तवृत्ती प्रसन्न झाल्या. मन धावणाऱ्या तरुणांच्या मागून धावू लागले.

आणि ते सतीशवर जवळजवळ ओरडलेच.

'सतीश अरे पाय उचल. असा काय चाललास म्हाताऱ्यासारखा. तू तर माझ्यापेक्षाही म्हातारा झालास रे!'

संपादकीय

श्री. नानासाहेब जांभेकर यांचा मृत्यु

जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध लेखक, संपादक आणि कार्यकर्ते श्री. गणेश गंगाधर ऊर्फ नानासाहेब जांभेकर यांना ता. ८ जून रोजी पुणे येथे देवाज्ञा झाली, हे कळविण्यास आम्हाला वाईट वाटते. मरणसमयी त्यांचे वय ८२ वर्षांचे होते. गेली पंधरा वर्षे ते निवृत्तावस्थेत असून निरनिराळ्या वार्धक्यजन्य रोगांनी जर्जर अशा अवस्थेत गेली ८–९ वर्षे त्यांनी काढली. त्या दृष्टीने त्यांचा मृत्यु ही रोगमुक्तताच म्हणावी लागेल.

श्री. जांभेकर यांचे सर्व आयुष्य राष्ट्रीय शिक्षण आणि उच्च दर्जाचे साहित्य यांचा पुरस्कार आणि प्रसार करण्यात गेले. त्यांचे वडील जुन्या मुंबई प्रांतातील धारवाड जिल्ह्यात मामलेदाराच्या हुद्यापर्यंत चढलेले होते. त्यामुळे, त्यांनी जर मनात आणले असते, तर त्यांना पदवीधर झाल्याबरोबर वरच्या दर्जाची सरकारी नोकरी सहज मिळाली असती. पण, राष्ट्रसेवेत आयुष्य घालवण्याच्या आकांक्षेने आणि विशेषत: राष्ट्रीय शिक्षणा-विषयीच्या विलक्षण कळकळीमुळे, त्यांनी राजसेवेचा प्रतिष्ठित, सुखकारक मार्ग न पत्करता, राष्ट्रसेवेचा खडतर मार्ग धरला. असहकारितेच्या युगाच्या काळात अमळनेर येथील खानदेश एज्युकेशन सोसायटीचे राष्ट्रीय विद्यालय आणि महाविद्यालय चालविण्याच्या कामात ते प्रमुख होते.

साहित्याच्या क्षेत्रातील कै. नानासाहेब जांभेकर यांची कामगिरी संपादक, प्रकाशक आणि संघटक अशा तिन्ही नात्यांनी संस्मरणीय झाली. राष्ट्रीय शिक्षण आणि राष्ट्रीय विचार यांच्या प्रसारार्थ जुन्या समर्थ विद्यालयातील अग्रगण्य कार्यकर्ते कै. जनार्दन विनायक ओक यांनी काढलेले आणि त्यांच्या अकालमृत्यूनंतर त्यांचे सहकारी कै. जनार्दन सखाराम करंदीकर यांनी काही काळ चिकाटीने चालवलेले जे 'लोकशिक्षण' मासिक मध्यंतरी बंद पडलेले होते, त्याचे १९२८ साली पुनरुज्जीवन करून १९४१ पर्यंत १३ वर्षे श्री. जांभेकर यांनी उत्कृष्ट रीतीने चालवले. त्यावरोबरच, 'लोकशिक्षण लघुग्रंथमाला' काढून राजनैतिक, आर्थिक आणि शास्त्रीय प्रश्नांवरील अभिज्ञांचे उत्तम ग्रंथही त्यांनी प्रसिद्ध केले. 'लोकशिक्षण' मासिकाने जी वैचारिक आणि वाङ्मयीन कामगिरी सतत एक तप केली, ती सुवर्णाक्षरांनी नमूद करण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य या नात्याने, श्री. नानासाहेब चापेकर यांच्या नेतृत्वाखाली, परिषदेला स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रमही उल्लेखनीय आहेत.

साहित्याच्या क्षेत्रातील त्यांची तितकीच महत्त्वाची आणखी एक कामगिरी म्हणजे अव्वल इंग्रजी आमदानीतील महाराष्ट्राचे आद्य विचाराग्रणी कै. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचे त्यांनी लिहिलेले त्रिखंडात्मक चरित्र ही होय. या चरित्रात श्री. नानासाहेबांची काटेकोर संशोधनबुद्धी, अचाट परिश्रमशीलता, कणश: माहिती गोळा करून तिचे संकलन करण्याचे कौशल्य आणि त्याबरोबरच कोपरखळ्या देत देत विवाद्य विधाने करण्याची अनावर प्रवृत्ती यांचे मोठे नमुनेदार प्रदर्शन होऊन गेलेले आहे. किंबहुना, हातात तांबड्या शाईचे फाऊन्टनपेन घेऊन, 'लोकशिक्षणा'कडे येणाऱ्या मोठमोठ्या विद्वानांच्या लेखांचे संपादन आणि दुरुस्ती ज्या बारकाईने आणि चिकित्सकपणाने ते करीत असत, तो सगळा त्यांचा बारकावा आणि चिकित्सकपणा या चरित्रग्रंथात पराकोटीला गेला. कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ मुंबई विद्यापीठात गणिताचे अध्यासन (Chair) स्थापन करण्यातही त्यांना यश मिळाले. त्यांची शेवटली महत्त्वाची कामगिरी म्हणजे मराठी साहित्य

महामंडळाने जे अशास्त्रीय भोंगळ शुद्धलेखन वशिल्याच्या जोरावर राजमान्य करून घेतले आणि मराठी जनतेवर लादले, त्याविरुद्ध त्यांनी केलेला जोरदार शास्त्रशुद्ध प्रचार ही होय.

अशा या थोर कार्यकर्त्याच्या निधनामुळे महाराष्ट्र आणि मराठी वाङ्मय या दोघांचीही हानी झाली आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

आचार्य अत्रे यांचे स्मारक

आचार्य अत्रे यांचे स्मारक त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या त्यांच्या 'शिवशक्ति' या वास्तूत करण्यासंबंधी त्यांच्या कन्या सौ. शिरीष पै आणि जामात श्री. व्यंकटेश पै या दोघांनी जे पत्रक काढलेले आहे, ते पाहून कोणालाही आनंद वाटेल. स्वतःच्या स्मारकासंबंधी आचार्यांनी जे विचार आपल्या हयातीत व्यक्त केलेले होते, तदनुसारच ही स्मारकाची योजना अमलात आणण्यात येणार आहे. आचार्यांची समाधि, त्यांचे साहित्य आणि त्यासंबंधीचे संपूर्ण संदर्भ वाङ्मय, त्यांच्या खाजगी वस्तू, त्यांचे हस्ताक्षर, त्यांना आलेली पत्रे इत्यादी चरित्रसाधने, त्यांची निरनिराळ्या काळातील छायाचित्रे इत्यादी गोष्टींचे प्रदर्शन आणि त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडविणारा चलच्चित्रपट असे या नियोजित स्मारकाचे सर्वांगसुंदर स्वरूप आहे. महाराष्ट्रातील आचार्य अत्रे यांच्यासारख्या थोर झुंजार साहित्यिकाचे स्मारक अशा रीतीने त्यांची हरेक बाबतीतील परंपरा कुशलतेने आणि जबाबदारीने चालविणारी त्यांची कन्या आणि जामात यांनी करावे, हे त्यांना भूषणास्पद आहे.

या स्मारकातील प्रदर्शन विभागाला पूर्णता येण्यासाठी काही सूचना करणे अवश्य वाटते. आचार्यांचे आजेगुरु कै. श्री. कृ. कोल्हटकर आणि गुरु कै. रा. ग. गडकरी या दोघांची चित्रे व त्याबरोबरच त्यांचे साहित्यही प्रदर्शन विभागात ठेवणे इष्ट होईल. त्याचप्रमाणे वृत्तपत्रव्यवसायातील त्यांचे गुरु कै. अच्युतराव कोल्हटकर यांचे चित्र आणि साहित्यही या प्रदर्शनात ठेवण्यात यावे. आचार्यांचे व्यक्तित्व आणि वाङ्मय यांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि टीकाकारांना या साहित्याचा फार उपयोग होईल; व त्यामुळे प्रदर्शनातील संदर्भ ग्रंथालयालाही पूर्णता येईल.

शाहीर अमरशेख यांचे स्मारक

महाराष्ट्रातील नुकतेच दिवंगत झालेले विख्यात लोकशाहीर श्री. अमरशेख यांचे स्मारक करण्यासाठी मुंबई येथे प्रातिनिधिक समिति स्थापन झालेली असून, महाराष्ट्रातील सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि साहित्यिक यांनी या स्मारकाला मदत करण्यासाठी विनंतीपत्रकही काढलेले आहे. हे स्मारक शाहिरी विद्यापीठाच्या रूपाने करण्यात येणार असून, त्यासाठी दोन लाख रुपयांचा निधी जमवण्याचा संकल्प स्मारक समितीने केलेला आहे. महाराष्ट्रातील शाहिरीची परंपरा आणि व्यवसाय ही दोन्ही कायम ठेवण्याच्या आणि त्यात उत्तरोत्तर सुधारणा करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे विद्यापीठ स्थापन होणे अवश्य आहे. मात्र हे विद्यापीठ नगर जिल्ह्यातील बोधेगावसारख्या एका आडगावी स्थापन होणे मुळीच सोयीचे नाही. गोदावरीपासून पंचगंगेपर्यंतचा नाशिक, पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर हा टापू ही मराठी शाहिरीची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. म्हणून नाशिक, सातारा किंवा सांगली या तिहींपैकी कोणत्या तरी शहरी हे विद्यापीठ स्थापन होणे इष्ट होईल. मुंबई, पुणे आणि कोल्हापूर या तीन शहरी आधीच अनेक विद्यापीठे आणि संस्था यांची गर्दी झालेली आहे. त्या दृष्टीने ही तीन शहरे वगळून इतर कोणत्याही शहरात हे विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, असे वाटते. मराठी रसिकांनी आणि जनतेने या स्मारकाला जरूर हातभार लावावा.

संघवार्ता

श्री. मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

श्री. भाऊ समर्थ यांच्या तैलचित्रांचे प्रदर्शन

विदर्भ साहित्य संघाच्या कला केंद्रातर्फे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांच्या तैलचित्रांचे प्रदर्शन कलाकेंद्राच्या आर्ट गॅलरीत व टिळक सभागृहात शनिवार दि. ३० मे ते १ जून ७० पर्यंत भरविण्यात आले.

शनिवार दि. ३० मे रोजी सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सुनील सुभेदार यांनी प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

वरील प्रदर्शन दि. १३ जून ७० पासून मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरविण्यात आले होते.

कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मृतिदिन

संस्थेतर्फे सोमवार दि. १ जून रोजी सायंकाळीं ६-३० वाजता 'युगवाणी'चे संपादक श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध साहित्यिक कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा स्मृतिदिन गडकरी सभागृहात साजरा झाला. श्री. अध्यक्षांनी कै. कोल्हटकरांच्या प्रतिमेला हार अर्पण केल्यावर प्राचार्य वि. प्र. मोहगावकर यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

एम्. ए. (मराठी) च्या परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस अभ्यासमंडळातर्फे 'आचार्य अत्रे पारितोषिक'

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयांतर्गत असलेल्या अभ्यास मंडळातर्फे नागपूर विद्यापीठाच्या एम्. ए. (मराठी) परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या परीक्षार्थीस 'कै. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे' पारितोषिक देण्यात आले. हे पारितोषिक अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी जमविलेल्या रुपये १०१/- च्या रकमेतून-ग्रंथरूपाने-दिले. यंदाच्या पारितोषिकाच्या मानकरी अभ्यासमंडळाच्या सभासद कु. आशा गजानन भवाळकर ह्या आहेत.

उपर्युक्त पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि. १३ जून १९७० रोजी कै. आचार्य अत्रे यांच्या प्रथम स्मृतिदिनी सायंकाळी ६ वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात झाला.

सुरुवातीला कै. आचार्य अत्रे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. अध्यक्षांनी कै. अत्रे यांच्या छायाचित्राला पुष्पहार घातला.

ग्रंथालयाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे व्याख्यान झाले.

श्री. अध्यक्षांच्या हस्ते कु. आशा भवाळकर यांना पारितोषिक देण्यात आले. या प्रसंगी सरचिटणीस श्री. मा. नी. मलगलीकर यांचेही व्याख्यान झाले.

आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे प्रकाशन

अ–मराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता–सहज–सोपे पुस्तक

हिन्दी मराठी भाषा प्रवेशिका

(द्वितीयावृत्ती)

लेखिका—**श्रीमती मालतीबाई श्रीखंडे**

किंमत दोन रुपये

मागणीकरिता संपर्क साधा—

श्री. सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर–१

अनुक्रमणिका

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१

मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१

अनुक्रमणिका